CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मं. द
८२३

8·1

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रथम क...

...चार्य

	लौटानेकी तिथि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री गणेश वर्णी दि. जैन (शोध) संस्थान
नरिया, (का. हि. वि. क्षे.) वाराणसी

मोतीचन्द नानचन्द गांधी यानी

कृपया इस ग्रन्थको निम्नांकित तिथि पर या उसके पूर्व लौटा दें। विलम्बसे लौटानेपर ५ पैसे प्रतिदिन दण्ड देना होगा।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जैनवाङ्मयकुसुममाला पुष्प ८ व

बृहत्कथाकोश

भाग १ ला.

मूळ लेखक

श्रीमत् हरिषेणाचार्य

संपादक

'अज्ञात'

मीत्ति कार्तिक व.॥ ८
वीर सं. २४६२.] किंमत १ रुपाया [आवृत्ति पहिली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशक.
मोतीलाल हिराचंद गांधी
मु. पो. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

मुद्रक
लक्ष्मण भाऊराव कोकाटे
हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ,
पुणें सिटी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निवेदन.

प्रस्तुतचें पुस्तक मालेचें आठवें पुष्प होय. हा ' बृहत्कथाकोष ' श्री. हरिषेणाचार्यांनीं संस्कृत भाषेंतून लिहिला आहे. दिगम्बर संप्रदायांत अनेक विद्वान् आचार्यांनीं लिहिलेले कथाकोश आहेत परंतु उपलब्ध कथाकोष अर्वाचीनच आहेत. अकराव्या शतकापूर्वीचा एकहि कथाकोष उपलब्ध नाहीं. हा कथाकोष संवत् ९८९ मध्यें लिहिलेला आहे म्हणून सध्यां तोच प्राचीन ठरतो.

या कथाकोषाच्या दोन प्रति भांडारकर प्राच्यविद्यामंदिरांत आहेत. त्यापैकीं एक संवत् १५६८ चीं लिहिलेली आहे. ती जयपूरचे गोधाजींचे मंदिरांत लिहिलेली आहे. याची श्लोकसंख्या १२००० असून पत्रसंख्या ३५० आहे. यांत कथा १५७ आहेत. प्रायः हा सर्व ग्रंथ अनुष्टप छंदांत रचलेला आहे. रचना अति प्रौढ व सुंदर तर नाहीं परंतु इतर कथाकोषांहून बरी आहे. याचे कर्ते श्री हरिषेणाचार्य होत. यांनीं आपली गुरुपरंपरा १ मौनीभट्टारक, २ श्रीहरिषेण, ३ भरतसेन व ४ हरिषेण अशी दाखविली आहे. हरिषेण पुन्नाट संघाचे आचार्य होते. दिगम्बर संप्रदायाच्या अनेक आचार्यांनीं या संघाला पांच जैनाभासांपैकीं एक मानला आहे. तरी पण तो एक मोठा भेदच आहे. हे द्राविडसंघाचे नामांतर असावें. हा कथाकोष श्रीजिनसेनसुरीनीं हरिवंशपुराण रचलें त्याच वर्धमाननगरींत लिहिलेला आहे. श्रीजिनसेन देखील पुन्नाटसंघाचे आचार्य होते. तेव्हां हे आचार्यदेखील त्याच्याच शिष्य परंपरेतील एक असावेत. हा कथाकोष विनयपाल नामक राजाचे समयांत लिहिला. पण ग्रंथ प्रशस्तीवरून विनयपालाची राजधानी कोणती याचा खुलासा होत नाहीं. हा ' कोश ' ' आराधना ' नामक ग्रंथाच्या आधारें लिहिल्याचें प्रशस्तींतील आठव्या श्लोकांतील ' आराधनो धृतः ' या पदावरून कळतें. यावरून या ग्रंथांतील कथा श्रीहरिषेणाचार्यांच्या पूर्वीं २००-३०० वर्षें तरी निदान प्रचलित असाव्यांत यांत शंका नाहीं.

दिगम्बर संप्रदायांत ' आराधनाकथाकोष 'नांवाचे दोन संस्कृतकोष प्रचलित असून त्यांपैकीं एक श्रीप्रभाचंद्र भट्टारकाचा गद्यमय आहे व दुसरा श्रीमल्लि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भूषणाचार्यांचे शिष्य ब्रह्मनेमिदत्त यांचा पद्यमय आहे. दुसरा पहिल्याचा पद्यानुवाद होय. हे दोन्हीं कथाकोश या कथाकोशाच्या अपेक्षेनें लहान आहेत. ह्मणून कोणी तरी मुनी लेखकानें याचे मागें बृहत् हे विशेषण जोडलें असावें. कारण ग्रंथकर्त्यानें स्वतः कोठेंच तसा उल्लेख केलेला नाहीं. तो सर्वांत मोठा म्हणून 'बृहत्कथाकोष' हें नांव कांहीं अस्थानी नाहीं आणि म्हणून आम्हीही तेंच नांव या भाषांतरास दिलें आहे.

सन १९२८ सालीं या कथाकोषाच्या दोन्हीं हस्तलिखित प्रती भाण्डारकर प्राच्यविद्यामंदिरांतून आणल्या होत्या. तेव्हां इतर कथाकोषांपेक्षां बऱ्या म्हणून त्याचें भाषांतर जनतेपुढें ठेवण्याचें ठरविलें. स. १९३३ मध्यें तें भाषांतर पूर्ण झालें. ग्रंथ बराच मोठा असल्यामुळें प्रथमतः मराठी भाषांतर व नंतर मूळ संस्कृत प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. मराठी भाषांतरही तितकेंच मोठें तेव्हां त्याचे दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं हा पहिला भाग होय. यानंतर एवढाच मोठा दुसरा भाग होईल. भाषांतर करतांना शब्दशः भाषांतराकडे केवळ लक्ष न देतां मूळ कथेच्या भावार्थाला धरून मूळांतला आशय न सोडितां या कथा भाषांतरिल्या आहेत. मराठींत अद्याप असा कथाकोष नाहीं. तेव्हां वांचकांना याची उणीव भरून निघाली असें वाटल्यास केलेल्या श्रमाचें चीज होईल.

भाषांतराचेवेळीं ज्यांचें ज्यांचें म्हणून मला सहाय्य मिळालें त्यांचा व पुस्तक वेळेवर व सुबक छापून दिल्याबद्दल हनुमान प्रेसचे चालक व मालक यांचा मी आभारी आहे.

मालेच्या इतर पुष्पांप्रमाणें याहि पुष्पाचा वाचक सुवास घेतील व त्यांत अल्पबुद्धीनें व प्रमादामुळें राहिलेल्या चुका सुधारून घेऊन त्याबद्दल क्षमा करतील, अशी आशा बाळगतों. कारण 'नहि सर्वः सर्वं जानाति' इत्यलम्.

कार्तिक शु॥० १
वीर संवत् २४६३

आपला नम्र
" अज्ञात "

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुक्रमणिका.

कथा	१ ली	राजपुत्र सुरदत्त	पान	१ ते ३
,,	२ री	सोमशर्मा ब्राह्मण	,,	३ ते ४
,,	३ री	विष्णुदत्त	,,	४ ते ८
,,	४ थी	शंकित विष्णुदत्त व निःशंकित विद्युच्चोर	,,	८ ते १२
,,	५ वी	चिकित्सक जय आणि अविचिकित्सक विजय	,,	१२ ते १३
,,	६ वी	अधार्शी विषरथ व निरिच्छ यशोरथ	,,	१३ ते १५
,,	७ वी	अमूढदृष्टी रेवतीराणी	,,	१५ ते २२
,,	८ वी	उपगूहनी वैशाख आणि चेलनाराणी	,,	२२ ते २५
,,	९ वी	सम्यक्त्वी श्रेणिकाचे उपगूहनत्व	,,	२५ ते २७
,,	१० वी	कुमार वारिषेण	,,	२८ ते ३६
,,	११ वी	मुनि विष्णुकुमार	,,	३६ ते ४८
,,	१२ वी	प्रभावना प्रख्यात वज्रकुमार अथवा वैरकुमार मुनि	,,	४९ ते ६२
,,	१३ वी	श्रद्धाळू विनयधरराजा	,,	६२ ते ६३
,,	१४ वी	खनिदंक बुद्धमतीराणी	,,	६३ ते ६७
,,	१५ वी	प्रियवीरा	,,	६७ ते ६८
,,	१६ वी	सोमदत्तमुनी	,,	६९ ते ७१
,,	१७ वी	अवेळीं शास्त्रपठण करणाऱ्याची कथा	,,	७२ ते ७३
,,	१८ वी	अवेळीं अध्ययन करणाऱ्याची गोष्ट	,,	७३ ते ७४
,,	१९ वी	मानी सुप्रतिष्ठ व विनयी राजा धरसेन	,,	७४ ते ८१
,,	२० वी	ज्ञानाचरण कथा	,,	८१ ते ८३
,,	२१ वी	ज्ञानबहूमान कथा	,,	८३ ते ८६
,,	२२ वी	गुरुनिन्हव कथा	,,	८६ ते ९०
,,	२३ वी	व्यंजनहीन कथा	,,	९० ते ९३
,,	२४ वी	अर्थहीन कथा	,,	९३ ते ९६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

,,	२५ वी	व्यजंनार्थहीन कथा	,,	९७ ते ९८
,,	२६ वी	व्यजंन अर्थ उभय शुद्धीकथा	,,	९८ ते १००
,,	२७ वी	नागदत्त	,,	१०० ते १०६
,,	२८ वी	शूरसेनाची गोष्ट	,,	१०६ ते १०९
,,	२९ वी	श्रीकृष्ण	,,	११० ते ११३
,,	३० वी	वलिवर्धन राजाची गोष्ट	,,	११३ ते ११५
,,	३१ वी	शिवभूति ब्राह्मण	,,	११५ ते ११८
,,	३२ वी	घुवड आणि हंस यांची गोष्ट	,,	११८ ते १२०
,,	३३ वी	चक्रवर्ती राजा हरिषेण	,,	१२१ ते १३२
,,	३४ वी	गुणग्राहकता	,,	१३२ ते १३४
,,	३५ वी	ब्रह्मदत्त चक्रवर्ती	,,	१३४ ते १३७
,,	३६ वी	पाशकद्यूतकथा	,,	१३७ ते १३८
,,	३७ वी	सर्षपादीधान्यकथा	,,	१३८
,,	३८ वी	धान्यकथा	,,	१३९
,,	३९ वी	द्युतकथा	,,	१३९ ते १४०
,,	४० वी	कपर्दक द्युतकथा	,,	१४० ते १४१
,,	४१ वी	नरजन्मप्रातीदुर्लभता	,,	१४१
,,	४२ वी	मनुष्यभवप्राप्तिकथा	,,	१४२
,,	४३ वी	चंद्रकवेध	,,	१४३
,,	४४ वी	नंदकासव	,,	१४४ ते १४६
,,	४५ वी	सोमक बालक	,,	१४६ ते १४८
,,	४६ वी	क्षपणसंस्तराचें वर्णन	,,	१४८ ते १५१
,,	४७ वी	असत्यभाषणी संघश्री	,,	१५१ ते १६२
,,	४८ वी	जिनधर्मभक्त नागदत्त	,,	१६२ ते १६४
,,	४९ वी	प्रेमानुरागी वसुमित्र	,,	१६४ ते १६५
,,	५० वी	जिनदत्त व सोमदत्त	,,	१६५ ते १६६
,,	५१ वी	धर्मप्रेमी राजपुत्र लकुच	,,	१६६ ते १६८
,,	५२ वी	जिनभक्त पद्मरथ	,,	१६८ ते १७०
,,	५३ वी	चक्रवर्ती ब्रह्मदत्त	,,	१७० ते १७२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

,, ५४ वी	सम्यक्त्वी जिनदास श्रेष्ठी	,,	१७२ ते १७३
,, ५५ वी	रुद्रदत्त व जिनमति	,,	१७४ ते १७८
,, ५६ वी	राजा श्रेणिक	,,	१७८ ते १९६
,, ५७ वी	करकंडु	,,	१९६ ते २२०
,, ५८ वी	रोहिणीव्रत कथा	,,	२२० ते २४६
,, ५९ वी	विनयी क्षीरकदंब	,,	२४७ ते २४९
,, ६० वी	सम्यक्त्वी धन्वंतरी व तापसी विश्वानल यांचें धर्मपरीक्षण	,,	२५० ते २५६
,, ६१ वी	सम्यक्त्वविभूषण सुदर्शन श्रेष्ठी	,,	२५७ ते २६६
,, ६२ वी	यमसुनि	,,	२६६ ते २७०
,, ६३ वी	चोर दृढसूर्य	,,	२७० ते २७३
,, ६४ वी	सम्यक्त्व कौमुदी	,,	२७४ ते ३२०
,, ६५ वी	बोकडाची–कथा.	,,	३२० ते ३२३
,, ६६ वी	नृगसेन–धीवर.	,,	३२४ ते ३३०.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुद्धिपत्र.

पान	वरून ओळ	अशुद्ध	शुद्ध.
१७	२	चातुर्वणगर्णाधिप	चातुर्वर्णगणाधिप
२९	१२	श्रोणिक	श्रेणिक
३०	४	उभारण्यांत	उगारण्यांत
३२	४	मोथं	मोक्षं
४६	१६	सक्रुत्सक्रुत	सकृत्सकृत्
५३	१९	देण्यासाठीं	घेण्यासाठीं
५४	१३	लागले	लावले
६५	७	पण आतां	आतां
६९	१३	प्रहृण	ग्रहण
१२१	६	द्वादशाव्रताचें	द्वादशव्रताचें
१२३	२३	मुभिनीरानीत:	मुनीभिरानीत:
१२९	१७	भचा	भाचा
१६१	१	चक्रवर्ती राजा हरिषेण	असत्य भाषणी संघश्री.
१७७	१	सोमक बाळक	रुद्रदत्त व जिनमति
२०३	७	बुद्धीप्रमाण	बुद्धीप्रमाणें
२१०	४	आहे	करीत आहे
२३८	८	चंद्रकवध	चंद्रकवेध
२४३	२१	मूळही	फळही
२४७	२३	वेधकवाण	वेधकवाण

नोटः— या शिवाय असणाऱ्या चुका सुधारून वाचणें इष्ट.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बृहत् कथाकोष.

कथा १ ली.

राजपुत्र सूरदत्त.

जिनचंद्र नांवाचा सत्‌शील, दानी, प्रतापी, राजा भद्रपुरांत राज्य करीत असे. जिनदत्ता व जिनमति नांवांच्या त्याच्या दोन राण्या अत्यंत सुंदर व मधुरस्वभावी होत्या. जिनदत्तेपासून सूरदत्त व जिनमतीपासून जिनदत्त असे दोन पुत्र त्यास झाले. सूरदत्त मोठा शूर, सत्वशील व शस्त्रविद्येंत निपुण होता. जिनमतीचा मुलगा जिनदत्त हा अश्वविद्येंत पारंगत पण भोगोपभोगापासून विरक्त होता. जिनचंद्र अशा रीतीनें सुखानें कालक्रमण करीत असतां त्याचे नगरींत दुष्ट शत्रूंनीं—म्लेंच्छांनीं—येऊन वेढा दिला. त्यापासून आपलें रक्षण करण्याकरितां राजानें जिनदत्ताला पाठविलें. पण म्लेंच्छांनीं त्यास गराडा घालून त्याच्या सैन्याची दाणादाण करून टाकिली. शेवटीं तो रणांगणांतून पळून नगरीस आला. जिनचंद्राला जिनदत्त परतलेला पाहून मोठी चिंता उत्पन्न झाली. पण सूरदत्तानें पुढें येऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्लेंच्छावर चढून जाण्याची—चालून जाण्याची— आज्ञा मागितली. राजानें त्यास मोठ्या प्रेमानें निरोप दिला. म्लेंच्छराजाकडे येऊन सूरदत्तानें त्याची निर्भत्सना केली. तेव्हां चिडून जाऊन म्लेंच्छाधिपतीनें त्यास गराडा घातला. पण सूरदत्तानें खड्गाच्या जोरावर शत्रुपक्षाचा पाडाव केला. त्यानें त्यांना जिंकलें. तो विजयी झाला. ही विजयाची बातमी नगरांत पसरतांच जिकडे तिकडे तोरणें, गुड्या उभारण्यांत आलीं. विजयोत्सव होऊं लागला. मोठ्या सन्मानानें वाद्यांच्या गजरांत सूरदत्तानें नगरींत प्रवेश केला. जिकडे तिकडे त्याच्या विजयाचा जयजयकार करण्यांत येऊं लागला. तो शत्रुजित बनला. राजानें सर्व राजांच्या समक्ष त्याचा गौरव करून सुवर्ण कलशांत भरलेल्या पाण्यांनीं अभिषेक केला व त्यास युवराजपद अर्पण केलें. त्यामुळें त्याच्या शौर्याची सर्व लोक जेव्हां तेव्हां कथा गाऊं लागले. एकदां तर राजसभेंत एकानें सूरदत्तासारखा कोणी शूर आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंहि होणार नाहीं असें उद्गार काढलें. त्याची चीड येऊन जिनदत्त म्हणाला 'म्लेंच्छांना-जिंकण्यांत त्यानें विशेष काय केलें ? त्यांत शौर्य कोणतें दाखविलें ? जर खरा शूर असेल तर त्यानें क्रोध, मान, मद, माया, लोभ, काम, या षड्रिपूंना आणि सामान्य लोकांना सहज जिंकतां न येणाऱ्या घोर परिषहांना जिंकून, तो पुण्यवान्, महाशीलवान्, विमलयशी, गुणी, स्वहित—तत्पर बनेल तरच तो खरा शूर होय ! बाकीचें शूरत्व काय कामाचें ? तें असून नसल्यासारखेंच ! हें जिनदत्ताचें भाषण सुरदत्ताचे मनावर परिणाम करतें झालें. तो विरागी बनला. तात्काळ त्यानें श्रीधर मुनीकडे जाऊन जिनदीक्षा ग्रहण केली. युद्धांत ज्या-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रमाणें कौशल्य दाखवून त्या राजकुमारानें विजयश्रीस माळ घालण्यास लावलें त्याचप्रमाणें भयंकर खडतर तपश्चरण करून मोक्षलक्ष्मीस वरलें व तो शेवटीं मोक्षास गेला.

तात्पर्यः— स्वहित साधण्याची ज्यांना लालसा उत्पन्न होते त्यांनीं संतोषानें सम्यग्दर्शन ज्ञानचारित्रतपरूपी आराधना ध्वज सतत फडकत ठेवावा. त्यांतच त्यांचें कल्याण आहे.

कथा २ री.

सोमशर्मा ब्राम्हण.

या भरतक्षेत्रांत फार प्राचीन काळीं मथुरा नगरीं गगनचुंबी, रम्य अशा जिनमंदिरांनीं गजबजलेली होती. त्याच नगरींत चारित्र-संपन्न, गुणी, शीलवान्, नंदिमित्र नांवाचें एक आचार्य राहात असत. बागडादि देशांहून सोमशर्मा नांवाचा एक गर्विष्ठ ब्राह्मण मथुरेस आला. जैनमंदिरांत गेल्यानंतर त्या प्रशांतधी आचार्यास पाहून त्यांचें जवळ दिगंबरत्वाची दीक्षा ग्रहण करण्याची मनीषा त्यानें प्रगट केली. विशुद्धहृदयीं, ज्ञानी आचार्यांनीं त्यास विधिपूर्वक जैनधर्माची दीक्षा दिली. त्यास मंत्राचा उपदेश दिला. पुष्कळ पढविलें पण त्यास 'नमःसिद्धं' या पदाचा अर्थ समजेना. तेव्हां तुला केवळ मातृ-पदाचाच अर्थ कळत नाहीं. तर तूं तप तें कसलें करणार? असें म्हणून त्यांनीं त्याचा धिःकार केला. सोमशर्म्यास अत्यंत वाईट वाटलें. तो जीवाला कंटाळून मुनी बनला व दुसऱ्या आचार्याकडे जाऊन त्यानें उत्कृष्ट मरणप्राप्तीचा मार्ग कोणता म्हणून विचारणा केली. आचार्यांनीं त्याचा उत्तम भाव जाणून शांतमनानें,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्मल अंतःकरणानें सांगितलें कीं, चार प्रकारची आराधनाशुद्धि करून चतुर्धाहारविमोचन करून पूर्वेकडे अथवा उत्तरेकडे तोंड करून पर्यंकासनानें अथवा कायोत्सर्गानें उभें राहून, चंद्रप्रभजिनाचें एकचित्तानें चिंतवन कर म्हणजे तुझें इच्छित प्राप्त होईल. नंतर त्यानें मंदिराला त्रिवार प्रदक्षिणा घालून जिनबिंबाचें दर्शन घेतलें. व मुनींना नमस्कार करून तो जवळच्या अरण्यांत गेला. तेथील वटवृक्षाखालीं एका मोठ्या विस्तीर्ण शीलेवर तो कायोत्सर्गानें पर्वतासारखा निश्चल उभा राहिला. शरीर व आहाराचा यावज्जीवन-पर्यंत त्याग करून चंद्रप्रभजिनाची मूर्ति हृदयांत स्थापन केली व त्याचें ध्यान करूं लागला. शुद्धांतःकरणानें आराधना करीत असतां दोनच दिवसांत मरून तो देवलोकीं महर्दिक देव झाला.

तात्पर्यः— प्रथमतः जरी त्याचा मार्ग चुकला होता; त्यास कांहीं कळत नव्हतें तरी पण पूर्वपुण्याईनें मार्ग प्राप्त झाला. कोण-त्याहि तत्त्वास अंतःकरणपूर्वक चिकटल्यानें त्याची प्राप्ती होतेच. तरी प्रत्येकानें सोमशर्म्याप्रमाणें आराधनेची कांस धरावी यांतच त्याचं कल्याण आहे.

कथा ३ री.

विष्णुदत्त.

जम्बूद्वीपांतील या भरतक्षेत्रांत अवंती नांवाचा अत्यंत धनधान्य-संपन्न मोठा देश होता. त्या देशांत उज्जयनी नगरी होती. ती नगरी अति रम्य, सुंदर, मोठमोठ्या जिनमंदिरांनीं, राजवाड्यांनीं, हवेल्यांनीं आणि बागबगिच्यांनीं गजबजलेली होती. व्यापाराची त्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काळची ती चालू पेठ होती. नगरीच्या एका भागाला दीन, दरिद्री आंधळ्यांची मोठी वस्ती होती. त्यांची सर्वस्वीं उपजीविका भीक मागून पोट भरण्यानें होत असे. त्या आंधळ्यांच्या संघांत विष्णुदत्त नांवांचा एक आंधळा राहात असे. त्याची भार्या सोमिल्ला मोठी कजाग, दुष्ट स्वभावाची, निर्दयहृदयीं होती. विष्णुदत्त हा नेहमीं दगडांनीं डोक्याला, छातीला मारून घेऊन, कधीं दांतांत गवताची पेंडी धरून, तर कधीं मनोहर गीतें गाऊन लोकांचें मनरंजन करी व मोठ्या कष्टानें आपलें व आपल्या कुटुंबाचें उदरंभरण करी.

एके दिवशीं दगडानें डोक्याला मारून घेतल्यामुळें त्याचे डोक्यास जखम झाली. त्या वेदनेनें तो दुसरें दिवशीं भीक मागण्यास न जातां घरींच राहिला. त्याला झोंपडींत कण्हत पडलेला पाहून, सोमिल्ला त्यास पायानें ठोकारून म्हणाली, " निर्लज्जा ऊठ ! निजलास काय ? माझ्या मुलांना भूक लागली असून तूं येथेंच ! जा, ऊठ ! त्यांना खाण्यासाठीं घेऊन ये जा.' तेव्हां तो विचारा स्वतःचें दुःख बाजूस सारून त्यांच्या आहारासाठीं भिक मागण्यास निघाला. खरोखरी सत्वशील, थोरहृदयीं मुलाबाळांचें पोषण करण्यांत स्वतःचें दुःख देखील विसरतात. पण जातां जातां त्या बायकोच्या निष्ठुर वाक्प्रहारांबद्दल तो एवढेंच म्हणाला, संकटसमयीं मनोरम भार्या, मुलगी, बहीण, कांचन, पदरीं असलेलें धनधान्य देखील उपयोगी पडत नाहीं. त्यांतून माझी अवस्था दारिद्र्याची ! तशांत माझ्या डोक्यास लागलेलें. त्यामुळें मला चैन पडत नाहीं. तुला व तुझ्या मुलांसाठीं भिक्षा मागण्यास जाण्याची मला शक्ति नाहीं. तेव्हां ती म्हणाली, " मग मला काय त्याचें ? आपणांला दुःख झालें तरी मला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परवा नाहीं. आपण भिक्षेसाठीं गेलेंच पाहिजे. !" सोमिल्लेचें हें उत्तर ऐकून तो बिचारा मुलाला बरोबर घेऊन नगराबाहेर पडला. तो जीवास अगदीं कंटाळून गेला होता. नगराबाहेर येतांच त्यानें मुलासहि सोडलें व स्वतः एकटाच जिकडे मार्ग फुटेल तिकडे झपाट्यानें जाऊं लागला. अशा रीतीनें झपाट्यानें जात असतां रस्त्यांत झाडाची फांदी डोक्यास लागून तो जमिनीवर पडला. डोकें रक्तबंबाळ झालें. त्यामुळें तो बेशुद्ध पडला. ह्या स्थितींत थोडावेळ गेल्यानंतर तो शुद्धीवर आला. त्यास आपली दृष्टी आल्याचें कळून आलें. तो आश्चर्यानें चकित होत्साता सभोंवतालीं पाहूं लागला. तों आपल्यापासून कांहीं अंतरावर एक सुवर्णकलश असल्याचें त्याला आढळून आलें. ती रत्नखचित घागर पाहून त्याचा आनंद गगनांत मावेना. आपण पाहतो हें सारें सत्य-सृष्टींत आहे किंवा स्वप्नांत आहे किंवा आपणांस भ्रम तर होत नाहींना याचा त्यास उलगडा होईना. आपण पूर्वी आंधळे होतो. आणि आतां ही दृष्टी आपणांस कोठून प्राप्त झाली ! बरें उठावें तर अंगांत जोम नाहीं. आतां काय करावें ? याची त्यास मोठी काळजी पडली. त्याला पूर्वीचें सारें आठवलें. धन नव्हतें त्यावेळीं बायकोनें दुःखांत झिडकारिलें. लाथेनें लाथाडलें. आतां तर आदर करील. प्रेम दाखवील. संसारच असा आहे. ही सारी आपलीच पापपुण्याई. लोकांस दोष देऊन काय उपयोग ? असा विचार करून तो मोठ्या कष्टानें उठला व तो सुवर्णकुंभ डोक्यावर घेऊन घराकडे येण्यास निघाला. कुंभ घेऊन विष्णुदत्त असलेला पाहून सोमिल्लेला मोठा आनंद झाला. ती हंसत हंसत त्याला सामोरी गेली. त्याचें प्रेमानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वागत करून तिनें त्याचे डोक्यावरील कुंभ उतरून घेतला. व झोंपडींत एका कोंपऱ्यांत आणून ठेवला. त्याची आदरानें पूजा केली. नंतर त्यास जेऊं घातलें. जेवणोत्तर तिनें त्या घागरीचा वृत्तांत विचारला. त्यानें घरून निघाल्यापासूनचा सारा वृत्तांत तिला निवेदन केला. हें ऐकून तिला अतिशय आनंद झाला व पुढें त्याच्याशीं ती मोठ्या प्रेमानें वागूं लागली.

कांहीं दिवस लोटल्यानंतर एकदां त्यानें आपल्या पूर्वींच्या व्यवसायबंधूना त्यांच्या परिवारांसह भोजनास बोलाविलें. भोजनसमारंभ मोठ्या थाटांत पार पडला. त्या वेळीं त्या उभयतांनीं परिधान केलेलीं वस्त्रें, आभूषणें व त्याच्या घरांतील गायी, म्हशी, घोडे वगैरे संपत्ति पाहून त्या अंधकांच्या बायकांना विस्मय वाटला व ते त्याच्या पुण्याईची महति गात विचार करूं लागले कीं, आपण पै, पैश्यास महाग असतां, व तो आपणांपैकींच एक असतां एकाएकी याजवळ इतकें धन कोठून आलें ? शेवटीं त्याचा उलगडा करून घेण्याच्या इराद्यानें त्यांनीं सोमिल्लेला विचारणा केली. तिनें आनंदून जाऊन "मी त्यांचा तिरस्कार केल्यानें ते कंटाळून रानांत निघून गेले. जातां जातां रस्त्यांत त्यांच्या डोक्यास वृक्षाच्या फांदीचा मार लागून ते बेशुद्ध झाले. मार लागल्यामुळें डोक्यांतून सारख्या रक्ताच्या धारा वाहात होत्या. पण तिकडे लक्ष्य न देतां ते डोळसासरखे आजुबाजूस पाहूं लागले. तों त्यानां आपली दृष्टी परत आल्याचें दिसून आलें. जवळच एक सुवर्णकुंभ असल्याचें दिसलें." ही हकिकत मोठ्या प्रेमानें व पाल्हाळानें तिनें सांगितली. तेव्हां त्या स्त्रियालांहि आशा सुटली. आपणांस तें प्राप्त होईल असें त्यानां वाटूं लागलें. द्रव्याची आशा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोणास नाहीं ? जीवनच तें ? त्यांतून त्या भोळ्याबाभड्या बाया ! झालें ! लगबगीनें घरीं येऊन आपापल्या नवऱ्यांस त्यांनीं ही हकिकत सांगितली. त्यांनाहि पाणी सुटलें. त्याप्रमाणें करण्याचें ठरवून लगबगीनें ते घरांतून बाहेर पडले. सगळेच आंधळे. त्यामुळें कोणी विहिरींत, तर कोणी सरोवरांत, कोणी नदींत तर कित्येक हौदांत पडून मेले. तर कित्येक झाडाच्या, दगडाच्या आघातानें मरण पावले. आर्तध्यानांत मरण पावल्यामुळें कोणी श्वभ्रगतीस तर कोणी तिर्यंकगतीस गेले. विष्णुदत्ताला धन मिळालें. तसें आपणांलाहि मिळेल या आशेनें आपल्या पुण्याईचा सारासार विचार न केल्यामुळें शेवटीं त्यानां दुःख परंपराच भोगावी लागली.

तात्पर्य:— केव्हांहि जगांतील सगळ्या जीवांची सारखी पुण्याई नसतें. जसें ज्यानें करावें तसें त्यास प्राप्त होतें. त्याला मिळालें म्हणून आपणांलाहि मिळेल ही भावना फोल. अंधानुकरण केव्हांहि इष्ट नसतें.

कथा ४ थी.

शंकित सोमदत्त व निःशंकित विद्युच्चोर.

मगध देशांत राजगृह नांवांची एक अत्यंत धनाढ्य नगरी होती. त्या नगरीचा राजा मोठा शूर. त्यानें आपल्या शौर्यानें सर्व शत्रूंना जिंकून आपल्या यशाचा झेंडा साऱ्या जगांत रोंवला होता. त्या प्रजाहितदक्ष राजाची भार्या कनका अत्यंत सुंदर, जणुं स्वर्गीय देवताच होती. त्याच नगरींत अति धनाढ्य असा जिनदास श्रेष्ठी राहत असे. तो जिनभक्त होता. आपला सर्व काळ जिनाची पूजा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करण्यांत व भक्ति करण्यांत घालवी. त्याची भार्या जिनदत्ता ही देखील त्याच्याचप्रमाणें जिनभक्तिपरायण होती.

एकदां आरणेंद्रदेव-धन्वंतरीचरानें-जिनदासाला प्रसन्न होऊन "पाठ-सिद्धि" मंत्र दिला,त्या मंत्राच्या साहाय्यानें जिनदासानें असमर्थ,आवा-लवृद्धांना असाध्य अशी आकाशगामिनी विद्या साध्य करून घेतली. व तो त्या विद्येच्या साहाय्यानें कृत्रिमाकृत्रिम जिनचैत्यालयाचें वंदन करून पुन्हां परत आपल्या घरीं येई.पुढें धर्मपुत्र सोमदत्तानें—सोमिल्ला-वल्लभानें—जिनदासाला आपण " हे तात, अष्टमी चतुर्दशीला कोठें जात असतां," असें सहज एकदां कौतुकानें विचारलें. तेव्हां श्रेष्ठीनें विनयानें, प्रेमळ अंतःकरणानें उत्तर दिलें. "पुत्रा! मी माझ्या मित्रानें दिलेल्या मंत्राच्या साहाय्यानें प्राप्त झालेल्या आकाशगामिनी विद्येनें स्वर्णमय कृत्रिमाकृत्रिम जिनचैत्यालयाचें वंदन करण्यासाठीं जात असतो व त्याचें दर्शन घेऊन परत येतो." सोमदत्ताला हें ऐकून आनंद झाला. त्यानें जिनदासाला " आपण ती विद्या मला शिकवा म्हणजे मीही आपणांप्रमाणें त्या चैत्यालयाचें दर्शन घेत जाईन" अशी विनंति केली. पण जिनदास म्हणाले. "बाळा! ही 'पाठसिद्धि' विद्या मला देवानें शिकविली आहे. ती असमर्थांना, कमकुवत मनाच्या जीवांना साधणें दुःसाध्य. तेव्हां तूं या भानगडींत न पडतां भक्तिभावानें येथीलच जिनबिंबाचें दर्शन घेत जा. आणि तेंच तुझ्या-सारख्यास हितकारक होय." पण सोमदत्तास हें बोलणें आवडलें नाहीं त्यानें " दुःसाध्य असली तरी त्याची मला पर्वा नाहीं. आपण मला शिकवाच." असा आग्रह धरला. तेव्हां नाईलाजास्तव जिनदास म्हणाले " ऐक जिनभक्ता! प्रथम षट् आवश्यक क्रिया पाळ! इंद्रिय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निग्रही वन. नंतर निर्भयपणें वद्यपक्षांतील चतुर्दशीच्या दिवशीं स्मशानांत जा. तेथें एक विस्तृत वटवृक्ष पाहून त्याच्या डाहाळीला एकशें आठ दोऱ्यांचें एक शिंकें घट्ट बांध. त्या शिंक्याखालीं वर तोंडें करून तीक्ष्ण धारेच्या, तरवारी वगैरे हत्त्यारें बांध. नंतर शिंक्याची पूजा गंधाक्षतांनीं करून " ओं नमः सिद्धेभ्यः " हा मंत्र त्रिवार म्हणून त्या शिंक्यांत बैस. नंतर मग " सिद्धांना नमस्कार असो " हा मंत्र म्हणत म्हणत शिंक्याची एकेक दोरी आपल्या हातांतील तरवारीनें तोड. याप्रमाणें त्या सर्व दोऱ्या तुटून तें शिंकें अधर राहील. तेव्हां तुला ती आकाशगामिनी विद्या साध्य होईल व तिच्या योगानें तूं कृत्रिमाकृत्रिम जिनमंदिरांचें दर्शन घेऊं शकशील. " विद्याभिलाषी सोमदत्ताला आनंदाचें भरतें आलें. याप्रमाणें कृति करण्याचें ठरवून तो वागूं लागला.

नंतर एके दिवशीं ठरल्या तिथीस तो रात्रीला स्मशानांत आला. वडाचे फांदीस शिंकें बांधून त्याच्या खालीं वर धारा करून अति तीक्ष्ण आयुधें त्यानें बांधलीं, व त्याची पूजा केली. नंतर त्रिवार मंत्र म्हणून तो शिंक्यावर चढला. पण शिंक्याची दोरी तोडण्यापूर्वीं त्याचें मनांत विचार आला कीं, जर आपण एकेक दोरी तोडीत तोडीत सर्वच दोऱ्या तोडून टाकूं तर खात्रीनें आपला प्राण याखालीं लोंवत असलेल्या तीक्ष्ण हत्यारावर पडून निघून जाईल. मग ती विद्या आपणांस कोठून आणि कशी साध्य होणार? संशयी विचारांनीं त्याला घेरले. झालें! तो झटकन खालीं उतरला. पण पुन्हां भावी आशेनें वर चढला. पण तीच शंका पुन्हां डोंकावली. भयानें घावरला व परत खालीं उतरला. प्रथमपासूनच तो संशयी. त्यांत मनानें उचल खाल्लेलीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झाला त्याचा त्यावरील विश्वास उडाला व विचारांत पडला. इतक्यांत तिकडून येणाऱ्या विद्युच्चोरानें हा सर्व प्रकार पाहिला. त्यानें "हे मित्रा तूं हें काय आरंभिलें आहेस" असें त्यास विचारलें. सोमदत्त उत्तरला, " आर्या, मी ही आकाशगामिनी विद्या साध्य करून घेत आहे. अर्हत् सिद्धादि मंत्राचें त्रिवार पठण करून या शिंक्याची एकेक दोरी तोडली असतां शेवटीं सर्व दोऱ्या तुटल्यानंतर आकाशमार्गानें जातां येतें. पण याबद्दल संशय वाटतो. " संशयंकुर्वतो पुंसां न किंचित्सफलं भवेत । " संशयग्रस्ताचें कार्य केव्हांहि पुरें होत नाहीं." विद्युच्चोराला ही विद्या साध्य करून घेण्याची इच्छा झाली. त्यानें सोमदत्ताला तुला ही विद्या कोणी शिकविली असा प्रश्न केला. तेव्हां सोमदत्त उत्तरला ' मला ही विद्या जिनभक्त जिनदासानें सांगितली. ' तेव्हां विद्युच्चोर मनांत विचार करूं लागला कीं खरोखरी हा भ्याड आहे. यत्किंचितशा देखील कीटकांना दुःख न पोंचविणाऱ्या जिनभक्त धर्मप्रेमी जिनदासानें धर्मपुत्र म्हणून ही विद्या त्यास शिकविली. आणि हा मूढ त्याविषयीं संशय घेतो. खरोखरी संशयाचें घर खालींच असतें. जिनदासासारखा दयाळु, विशुद्धहृदयीं कोणीच नाहीं. आणि त्यानें शिकविलेल्या विद्येविषयीं संशय ! ! असो !

नंतर तो त्यास बाजूस सारून स्वतःच त्या शिंक्यावर बसला. इकडे सोमदत्त आपले प्रयत्न निष्फळ झाले असें समजून आपल्या अंगरक्षकांसह घरीं परतला. चोरानें त्याप्रमाणें मंत्र म्हणून एक एक दोरी तोडण्यास सुरुवात केली. शेवटीं सर्वच दोऱ्या तुटून तें शिंकें अधर राहिलें. तो आकाशगामिनी विद्येनें जिनचैत्यालयाची वंदना करीत करीत सिद्धवरकुटाची वंदना करून, तो जिथें जिनदास मुनीसह

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बसले होते त्या ठिकाणीं येऊन त्यास वंदना करतां झाला व आपल्याच कृपाप्रसादामुळें मला व्योमगामिनी विद्या प्राप्त झाली आहे असें म्हणाला. जिनदासाला प्रथम त्यास विद्या साध्य झाली म्हणून आनंद वाटला पण हा अट्टल चोर येथील सुवर्णमय रत्नांच्या मंदिराची तर चोरी करणार नाहीं ना ! अशी त्यास भीति उत्पन्न झाली. तेव्हां त्यानें तुला ही विद्या कशी प्राप्त झाली असें विचारलें. विद्युच्चोरानें नम्रपणें सर्व हकिकत सांगितली. जिनदासाला आनंद झाला. तात्काळ त्यानें मुनीजवळ नेले व त्यास कर्मनाशिनी दिगंबरी दीक्षा घेण्यास सांगितलें. मुनींनीं योग्य उपदेश केला. नंतर ते म्हणाले, "तुझी एवढ्या वयांत तपाकडे बुद्धी झाली खरोखरच तूं धन्य आहेस. यानें तुझ्या जीविताचें कल्याण होणार आहे. तरी तूं या धर्माचा अंगीकार कर." तेव्हां विद्युच्चोरानें संसारसागरतारक जिन–दीक्षा मुनिवर्याकडून ग्रहण केली. भयंकर तपश्चरण करून समाधिमरणानें मरून तो महर्द्धिक देव झाला.

तात्पर्य:— शंकेखोर विप्राला सिद्धी प्राप्त करून घेतां आली नाहीं. पण निःशंकित चोरानें एकाकी साध्य करून घेतली. संशयरहिताचें सर्व कांहीं औरच असतें.

कथा ५ वी.

अघाशी विषरथ व निरिच्छ यशोरथ.

या जम्बुद्वीपांतील भरतक्षेत्राच्या दक्षिणेला धनधान्यपूर्ण व जनसमृद्ध असा अवंती देश आहे. त्या देशांत उज्जयनी नांवांची एक अत्यंत रम्य, कुलवान्, शीलवान् लोकांनीं गजबजलेली नगरी होती.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूर्वीं तेथें राजा विषधर राज्य करीत होता. हा मोठा प्रतापी शूर व बलिष्ठ होता. त्याची राणी कनकमाला कनकाप्रमाणें तेजस्वी, सुंदर व सद्गुणी होती. त्यांना यशोरथ व विषरथ अशीं दोन मुलें होतीं. मुलें मोठी, स्वभावानें प्रेमळ व आनंदी होती. तीं आपला काळ नदी-वर, खेळण्यांत व रानावनांत फिरण्यांत घालवींत. एकदां ते उभयतां बंधू खेळत खेळत आपल्या गोकुळवाड्याला गेले. गोकुळनाथानें आपल्या स्वामींचीं मुलें म्हणून त्यानां मोठ्या आदरानें स्वगृहीं नेलें व उत्तम खिरी वगैरें गोड गोड पक्कानें त्यानां खाऊं घातलीं. नंतर ते दोघेहि आपल्या स्वघरीं आले. विषरथ थोडासा खादाड होता. त्या-वेळीं त्यानें मागचा पुढचा विचार न करतां भोजनावर यथेच्छ ताव मारला होता. तरीं घरीं येऊन पुनः जेवला. वाजवीपेक्षां जास्त भोजन केल्यामुळें त्यास विसूचिका रोग झाला व त्याच रोगानें तो मरण पावला.

विषधर राजाला संसाराच्या अनित्यत्वाबद्दल विचार आला. जीवित हें जलबिंदूसारखें असून मानवाचें प्रेम स्वप्नासारखें आहे; संपत्ती दुष्ट, अनिष्टकारक आणि पाण्यांत उठणाऱ्या तरंगासारखी चंचल, ललनांची प्रीति संध्यारागासारखी, शरीराचें यौवन केळीच्या गाभ्यासारखें निःसार आहे असें जाणून ज्येष्ठ पुत्र यशोरथाला त्यानें राज्य दिलें व आपण नंदनमुनीकडे जाऊन दीक्षा ग्रहण केली. खादाडपणानें मागचा पुढचा विचार न करतां भोजन केल्यामुळें विषरथाला संसारांत भयंकर दुःखें भोगावीं लागलीं व शेवटीं त्यांतच त्याचा अंत झाला. पण यशोरथाला आपल्यां अल्पसंतुष्टवृत्तीमुळें राज्याचा अधिकार मिळाला. तो आपला काळ सुखानें घालवूं लागला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ६ वी.

चिकित्सक जय आणि अचिकित्सक विजय.

प्राचीनकाळीं उज्जयनी नगरींत गगनचंद्र राजा आपल्या गगनश्री राणीसह राज्य करीत असे. सिंहलद्वीपाचा धीमान् राजा गगनादित्य हा गगनचंद्राचा मित्र होता. त्याची भार्या गगनसुंदरी नांवांची अतिशय सुंदर, कमललोचना व चंद्रमुखी होती. त्यानां जय व विजय असे दोन पुत्र होते. जय हा विद्वान् पण अति गर्विष्ट व विजय शूर, धीर होता. कांहीं काळ सुखांत लोटल्यानंतर गगनादित्य मरण पावला. त्याच्या मृत्युची वार्ता ऐकून गगनचंद्राला अत्यंत दुःख झाले. तेव्हां त्यानें आपल्या मित्राच्या मुलांना आपल्या नगरीस आणवून घेतलें. त्यांना समजुतीच्या चार गोष्टीं सांगून त्यांचें शांतवन केलें व त्यांचा यथायोग्य आदर केला. त्यांना तांबूल वगैरे वस्त्रे-भूषणें नजर केलीं व आपणांजवळ बसवून घेतलें. नंतर आचाऱ्यास बोलावून आणून ' विषान्न ' नांवाचें मिष्टान्न तयार करण्यास सांगितलें. आज्ञेप्रमाणें स्वयंपाक तयार होतांच त्या दोघांनीं भोजन केलें. भोजनोत्तर ते शयनमंदिरांत गेले. निजतांना जय विजयास म्हणाला, " विजया, माझी जीभ जड पडली आहे. माझें शरीर कांपूं लागलें आहे. तुला कांहीं होत नाहीं काय ? विजय उत्तरला" " मला तसें होण्याचें कारणच नाहीं ?" त्यावर जय म्हणाला, "बंधो, तुला स्मरत नाहीं काय ? येथें आपण आल्यानंतर राजानें आपणांसाठीं " विषान्न " तयार करण्यास आचाऱ्यास सांगितलें. विषमिश्रित अन्न तें विषान्न असें ज्ञाते म्हणतात. आणि तें आपण खाल्लें. त्यामुळें माझी ही अशी स्थिति झाली आहे." हें त्याचें मूर्खपणाचें बोल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ऐकून तो विचक्षण विजय म्हणाला, "जया, कदाचित् जाड्य झालें असेल आणि त्यामुळें तुझें अंग कांपत असेल. जीभ जड झाली असेल. कारण मीहि तेंच अन्न खाल्लें आहे. पण तें अन्न मात्र त्या प्रकारचें नाहीं. ते विषाचें नाहीं. तें नानाप्रकारच्या उत्कृष्ट पदार्थांच्या रसापासून बनविलेलें असतें. आणि त्यालाच शहाणे विषान्न म्हणतात. त्याच्या भक्षणानें शरीर धष्टपुष्ट होतें. तेजस्वी बनतें आणि तेंच आपण खाल्लें आहे. कारण म्हटलें आहे:—

त्वच्छासनरसज्ञानां विदुषां मोक्षकांक्षिणां ।
विषान्नमिव भोक्तृणां श्रुतिरन्या न रोचते ॥

तेव्हां तूं व्यर्थ संशय घेऊं नकोस. ही असली विचिकित्सा बरी नव्हे. संशय टाक. निर्भय बन." भावाचा उपदेश त्यास पटला नाहीं. त्याचा संशय जाईना. शेवटीं त्या संशयांत तो मरण पावला. ज्यांत भयंकर मानरूपी सुसरी आहेत अशा क्रोधजलांनीं भरलेल्या, मायाकल्लोलांनीं युक्त, अशा घोर संसारांत—संसारसागरांत—अगणित योनींतून जय भटकत फिरूं लागल्यामुळें त्यास अत्यंत दुःख भोगणें प्राप्त झालें. विजय तेथून परत आपल्या नगरीस आला. पुष्कळ दिवस सुखानें त्यानें राज्य केलें. नंतर सर्वसंगपरित्याग करून त्यानें शेवटीं जिनदीक्षा घेतली. विचिकित्सक बुद्धीचा असा तो द्रव्यकालभावें करून तप करून चिरकाल अशा मोक्षपदास प्राप्त करून घेतां झाला.

कथा ७ वी.

अमूढदृष्टी रेवती राणी.

पांड्यदेशांत धनधान्यसंपन्न जिनायतनांनीं मंडित अशी मथुरा नगरी होती. त्या नगरीचा राजा पांड्य मोठा प्रजाहितदक्ष होता.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याची शीलसंपन्न, रूपिणी, मृदुभाषिणी, सुमति राणी आपल्या गुणांनीं, रूपानीं सगळ्या जगांत प्रसिद्ध होती. त्याच नगरींत मुनी गुप्ताचार्य राहात असत. ते सर्व शास्त्रांत पारंगत, दिव्यज्ञानी व तपी होते. एकदां मनोवेग नांवाचा विद्याधर—कुमार मथुरेस आला. जिनमंदिराला त्रिवार प्रदक्षिणा घालून त्यानें समस्त दु:खहारी जिनांना नमस्कार केला. नंतर गुरुभक्ति करून गुप्ताचार्य व इतर मुनींना नमस्कार करून तो त्याचे जवळ वसला. धर्माचें श्रवण केल्यानंतर तो भक्ति-पुर:सर भावानें मुनींना म्हणाला "महाराज मी श्रावस्ती नगरीस यात्रेसाठीं जात आहे. तरी आपला शुभाशिर्वाद द्यावा." मुनि म्हणाले, "तूं अवश्य जा व हे श्रावका! तेथील जिनमंदिराची प्रशस्तपणें वंदना कर! आणि तूं तिकडे जातच आहेस तेव्हां धर्मपरायण, सम्यक्त्वशाली श्राविका रेवतीराणीस माझा शुभाशिर्वाद सांग." हें ऐकून त्यास मोठा विस्मय वाटला. तो मनांत म्हणूं लागला कीं, "कोणत्याहि श्रावकांला किंवा मुनींना नमस्कार न सांगतां फक्त एकट्या रेवती-लाच सांगतात याचा अर्थ काय? तिची अशी योग्यता ती कोणती? कीं खास स्मरणानें तिलाच आशिर्वाद सांगावा!" पण यावद्दल त्याची खात्री होईना. त्यास थोडीशी शंका आली व त्यानें हें खरें किंवा खोटें हें पाहाण्यासाठीं त्यांना पुन्हां विचारलें पण त्यावर मुनींनी तेंच उत्तर दिलें. तेव्हां त्या संशयी, वक्रहृदयी विद्याधराला राग आला व वाईट वाटलें. व पुन्हां मुनीवर्यास म्हणाला "भगवन्! मी पुन: पुन: आपणांस विचारतो. तरी आपण कोणत्याहि श्रावकांना किंवा इतर मुनींना आशिर्वाद न सांगतां फक्त रेवतीलाच सांगतां. तेव्हां असे तिचे गुण तरी कोणते आहेत कीं आपणांसहि ती वंद्य वाटावी;

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांतून तेथें एक अकरा अंगाचें धारी भव्यसेन चातुर्वणगर्णाधिप महातपी, सर्व जीवाच्या संशयाचें उच्चाटण करणारे असतांना आपण त्यांना चुकूनही वंदना सांगूं इच्छित नाहीं. हें कसें!" यावर गुप्ताचार्य उत्तरले. "विद्याधरा! त्याची पृथ्वीकाय जीवांवर श्रद्धा नाहीं. तो त्याचें अस्तित्वच मानीत नाहीं. म्हणून तो मिथ्यात्वी आहे. आणि मिथ्यात्वी जीव संसारार्णवांत नेहमींच भटकत राहतो म्हणून मी त्यास वंदना सांगितली नाहीं. पण हे खेटा! रेवती सम्यग्दर्शनसंपन्न, जिनधर्मानुसारिणी, पांखडविरहित आहे. ती नेहमीं जिनांनीं प्रतिपादिलेला मोक्षधर्मच आचरतें. तिचा तो मार्ग अहिंसाधर्मांनीं युक्त आहे. ती सच्चारित्रयुक्त निग्रही आहे. आणि याच तिच्या गुणांमुळें मी तिला आशिर्वाद सांगितला. याशिवाय दुसरें कांहीं कारण नाहीं." पण विद्याधराचें पूर्णतः समाधान झालें नाहीं. मुनींनांदेखील कषाय बाहुल्य घेरतें. त्यामुळें ते रेवतीला शुद्ध सम्यक्त्वी श्राविका ठरवून समस्त आगमसंवादी महायोगी मुनींना मिथ्यादृष्टी ठरवितात. आतां व्यर्थ तर्कवितर्क करण्यांत काय फायदा आहे? आपण समक्ष जात आहोंत. परीक्षून पाहूं असा विचार करून तो त्यांना नमस्कार करून श्रावस्तीनगरीकडे येण्यास निघाला.

श्रावस्तीनगरीजवळ येतांच त्यानें आपल्या विद्यावलानें पूर्व दिशेकडे चतुर्मुखी, मुखानें वेदघोष करणाऱ्या, यज्ञोपवीत, कमंडलुयुक्त, ब्रह्मदेवाचें; दक्षिणेकडे शंख, चक्र, गदाधारी, गरूडासनावर वसलेल्या विष्णूचें; पश्चिमेला वृषभारूढ पण कामासक्त दृष्टीनें पार्वतीकडे पहात आहे असें शंकराचें आणि उत्तरेकडे योगाभ्यासरत, शांत, गंभीरवृत्तीच्या बुद्धाचें रूप प्रगट केलें. हा आश्चर्यकारक देखावा पाहून, भाविक लोक चोहोंबाजूंनीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वंदन करण्यास जमले. त्यांत भव्यसेनहि आपल्या शिष्यपरिवारांसहित आला होता. पुष्कळसें श्रावक-श्राविकांहि जमल्या. पण विद्याधराला त्या समुदायांत कोठें रेवती दिसली नाहीं. तेव्हां तो विचारांत पडला. आपलें स्वरूप त्या रेवतीनें खात्रीनें ओळखलें असलें पाहिजे. नाहीं-तर तीहि या लोकांप्रमाणें येथें आली असती. पण ती आली नाहीं. या अर्थीं तिला सर्व कळून चुकलें असावें. तेव्हां आपण आतां इतर अन्यमति देवांचीं रूपें न घेतां प्रत्यक्ष तीर्थंकराचेंच रूप घ्यावें. असा विचार करून त्यानें पुन्हां अष्टप्रातिहार्यांनीं विभूषित पंचविसाव्या तीर्थंकराचें रूप धारण केलें. पंचविसावें तीर्थंकर आल्याचें ऐकून भव्यसेनमुनि आपल्या शिष्यवृंदांसह तीर्थंकर समवसरणांत आले. पुष्कळशा श्राविकांहि जमल्या. श्रावक मंडळी गोळा झाली. तेव्हां भव्यसेनानें कांहीं स्त्रियांना रेवतीकडे बोलावण्यास पाठविलें. त्या स्त्रिया तिजकडे येऊन म्हणाल्या— " श्राविके ! पंचविसावे तीर्थंकर समवशरणांसाहित आले आहेत. नगरीचे सारे लोक जमले आहेत. तेव्हां तूंहि दर्शनासाठीं चल. सर्वांनीं पूजासाहित्य बरोबर घेतलें असून ते तुझीच वाट पाहत आहेत. तरी तूं असली सुवर्ण संधि दवडूं नकोस !" पण रेवती त्यांना म्हणाली ' स्त्रियांनों ! मला गृह-कृत्यामुळें, गृहधर्मबाहुल्यामुळें वेळ नाहीं त्यामुळें मला येतां येत नाहीं. आपण खुशाल जा. ' तेव्हां त्या साऱ्यांजणीं तिला म्हणाल्या 'रेवती तूं स्वतःला जिनभक्तिपरायण म्हणवितेस ! आणि अमूल्य दर्शनाची संधि दवडवितेस ! या तुझ्या परस्परविरोधी कृत्याला काय म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. ' तेव्हां ती त्यांना शांतपणानें उत्तरली "स्त्रियांनों, हा तुमचा भ्रम आहे. आजपावेतों कधींहि पंचवीस तिर्थंकर झालें नाहींत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व पुढेंहि होणार नाहींत. कारण जिनशास्त्रांची अशीच आज्ञा आहे कीं, तीर्थंकर चोविसच होतात. पंचवीस तीर्थंकर होणार असें कोठेंच उल्लेखिलेलें नाहीं व तसेंच मला माझ्या गुरूंनीं पण सांगितलेलें आहे. तेव्हां तुम्हीं म्हणतां ते तीर्थंकर खरे नसून कोणीतरी कपटानें त्याचें रूप धारण करून आलें असावे व अशांचें दर्शन मी घेण्यास येणार नाहीं व आपणहि जाऊं नका. मिथ्या गोष्टींचें दर्शन जिनधर्मबाह्य होय." पण हें त्या स्त्रियांना पटलें नाहीं. त्या परत आल्या तशा गेल्या. सर्व लोक वंदना करून परत फिरले.

त्यावेळीं मनोवेगानें आपली दृष्टी सर्व समुदायांवर फिरविली. पण त्याची पूर्वीप्रमाणेंच निराशा झाली. तेव्हां त्यास गुप्ताचार्यांचें म्हणणें खरें वाटूं लागलें. पण पूर्णपणें खात्री होईना. तेव्हां त्यानें परीक्षणार्थ भयंकर व्याधिग्रस्त क्षुल्लकाचें रूप आपल्या विद्येच्या सामर्थ्यानें घेतलें व भर बाजारांत विव्हळत पडला. त्यास ओकाऱ्या, हगवणी होऊं लागल्या. तो मोठमोठ्यानें उसासे टाकूं लागला. प्रत्येक वेळीं रेवतीचें नांव घेऊन आरडूं ओरडूं लागला. कोणी एकानें ही हकीकत रेवतीस कळविली. तात्काळ रेवती त्या ठिकाणीं आली व मुनींना हातांला धरून घरीं घेऊन गेली. घरांत येतांच तो मायावी, मला अत्यंत भूक लागली आहे. भोजनास लवकर दे असें रेवतीस म्हणाला. रेवतीनें उत्तम प्रकारच्या पात्रामध्यें मोठ्या आदरानें भात वाढला. पण जसजसा ती भात वाढी तसतसा तो खाऊन फस्त करी. तेव्हां तिनें पुन्हां घृतपुऱ्या वाढल्या. पण त्यानें तात्काळ खाऊन टाकल्या. चक्कादहीं वाढलें. त्यानें तें भाताशिवायच खाल्लें. तूप साखर वाढली. पण ती मंडकाशिवायच खाल्ली. जें जें म्हणून ती वाढी तें तें सर्व तो क्षणांतच खाऊन फस्त करी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व पुन्हां ती काय वाढतें याकडे लक्ष्य देई. त्याची तृप्ति होईना. तेव्हां रागानें तिला म्हणाला 'मी तुझ्या कीर्तीचें पोवाडे ऐकून आलों. पण तुझ्या हातून माझी भूक शमविणें देखील होईना. मग तूं इतर काय पुरविणार हें उघडच दिसतें. हेंच कां तुझें धर्मप्रेम! तेव्हां माझ्या मनाची तृप्ति होईल असें भोजन तयार करून आण जा तरच माझ्या मनाची तृप्ति होईल.' रेवतीला थोडा विषाद वाटला. पण तो बाहेर न दाखवितां तिनें पुनः पुष्कळसा भात, पुऱ्या, घृतपुऱ्या, मांडे, घेवर, मोदक वगैरे उत्तम पदार्थ आणून वाढले. ते त्यानें क्षणार्धांत खाऊन फस्त केलें व वरून यथेच्छ पाणी प्याला. पाणी पितांच तो हागूं, ओकूं लागला. त्यामुळें सगळें अन्न बाहेर पडलें. सगळीकडे घाण सुटली. रेवतीनें स्वतः हातानें ती सगळी घाण काढून टाकली. त्याचें उत्तम रीतीनें वैयावृत्त केलें. हा तिचा विनय, धर्मप्रेम पाहून गुप्ताचार्यांच्या म्हणण्याची प्रचीति त्याला आली. त्यानें आपलें रूप प्रगट केलें. तें दिव्य मनोहर (स्वर्णकुंडल घातलेलें गळ्यांत हार घातलेलें) रूप पाहून रेवती आश्चर्यानें चकित झाली. तिनें आपण कोण, कोठून आणि कां आलांत? असें आदरानें विचारलें. तेव्हां तो खेचर उत्तरला. 'हे मनस्विनी! माझें नांव मनोवेग विद्याधर, मुनी गुप्ताचार्यांकडून मला तुझी कीर्ति समजली. त्यांनीं तुला 'मी इकडे येणार, असें सांगतां' मला आपला आशिर्वाद कळवावयास सांगितलें होतें. भव्यसेनांना कांहीं निरोप न दिल्यामुळें, मला तें त्यांचें करणें पटलें नाहीं. भव्यसेनापेक्षां त्यांना तुझीच किंमत अधिक वाटली, याचा मला त्यावेळीं राग आला. तेव्हां तुझी परीक्षा करण्यासाठीं प्रथम मी रुद्रादि रूपें धारण केलीं. पण तूं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपल्या जिननियमांपासून चलायमान झाली नाहींस. नंतर मी क्षुल्लकाचें रूप घेऊन तुला छळलें. पण त्यांतहि तूं सत्यास उतरली. गुप्ताचार्यांचें वचन मला आतां पटलें. खरोखरी तूं श्रेष्ठ व वंदनीय आहेस. तुला माझें नमन असो. असें म्हणून तो तेथून गुप्त झाला.

नंतर भव्यसेनाची परीक्षा घेण्यासाठीं तो ते जेथें बसले होते त्या मंदिरांत आला. प्रथम जिनांना नमस्कार करून, भव्यसेनास नमस्कार केला. भव्यसेन त्यावेळीं शास्त्रनिरूपण करीत होते. तोहि ऐकण्यास बसला. श्रावक वगैरे बरीच मंडळी जमली होती. शास्त्रार्थ झाल्यानंतर मुनी बहिर्वृत्तीसाठीं बाहेर गेले. ही संधि पाहून खेटानें आपल्या विद्येच्या सामर्थ्यानें विटकरीच्या तुकड्याचें अगदीं कोणासहि न ओळखतां येईल इतकें बारीक पीठ तयार केलें. भव्यसेन बाहेरून आल्यानंतर एका श्रावकास त्यांनीं मृत्तिकाचूर्ण आणण्यास सांगितलें. श्रावकानें तें विटकरीचेंच चूर्ण त्यांना दिलें. मुनींनींहि फारशी चौकशी न करतां तें मृत्तिकाचूर्ण समजूनच उपयोगांत आणलें. वास्तविक श्रावकाला मृत्तिकाचूर्ण न मिळाल्यामुळें त्यानें त्यांना दिलें. पण मुनींनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. आणि नंतर ते मनोवेगाकडे वळून म्हणाले कित्येक आचार्य यांत जीव आहेत असें मानतात. पण तें मिथ्या होय. असें म्हणून त्यांनीं हात धुतले. मनोवेगाची खात्री झाली. रेवती खरोखरीच सम्यक्त्वी होय. हा पृथ्वीकायिक जीवांबद्दल संशयी दिसतो. त्याला आतां संशयच उरला नाहीं. तो तेथून निघून गुप्ताचार्यांकडे आला व त्यांना घडलेली साग्र हकिकत सांगितली व त्यांचें दर्शन घेऊन आपल्या घरीं गेला.

तात्पर्यः—जगांत मिथ्यात्वाचा पुरस्कार करणें म्हणजे सम्यक्त्व नष्ट

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करणें होय. कारण विष व अमृत कधींच एका स्वरूपाचें नसतें. ज्ञान, मुनी, सिद्ध, चारित्र, साधु, भीरू, धर्मप्रेमी हीं जीवाचीं आयतनें होत तद्विरुद्ध दुःखस्वरूपीं अनायतनें होत. जिनधर्मप्रेमी, खरी सम्यक्त्वी, रेवती विद्याधराच्या अंत पाहण्यानें, विटंबनेनें स्वधर्मापासून यत्-किंचितहि चलायमान् झाली नाहीं. डगमगली नाहीं. म्हणून ती लौकिकास पात्र झाली.

कथा ८ वी.

" उपगूहनी वैशाख आणि चेलनाराणी "

या पृथ्वीतलावर विद्वज्जनसंपन्न स्वर्गतुल्य पाटलीपुत्र नांवाची नगरी होती. त्या नगरीचा राजा विशाख मोठा शूर, त्यानें आपल्या शौर्यानें हजारों वेळां शत्रूंना रणांगणांतून पळवून लावलें होतें. व आपल्या यशाचा झेंडा कायम फडकत ठेवला होता. त्याची राणी विशाखा अति सुंदर, रेखीव बांध्याची, कमलनयना, मोहक चेहऱ्याची, गंभीर होती. त्यांचा मुलगा वैशाख विनयी, गुणी व बापाप्रमाणेंच शूर होता. या त्याच्या गुणांमुळें सर्वांचा तो आवडता बनला होता. वैशाखाची प्रिया कनकश्री नांवाला शोभेल अशीच गुणानें रूपानें होती. एकदां वैशाख आपल्या महालांत कनकश्रिये-बरोबर प्रेमालाप करीत असतां त्याच्या बाळपणींचा मित्र मुनीदत्त भिक्षेसाठीं आपल्याच मंदिराकडे येत असलेला त्यास दिसला. तत्काळ तो कुमार प्रियेला सोडून त्यांना भक्तिभावानें सामोरा गेला. त्यांचें यथायोग्य पूजन, वंदन करून त्यानें त्यांना आपल्या मंदिरांत नेलें व यथाविधि आहार दिला. आहारोत्तर मुनी जाण्यास निघाले

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असतां तोहि आपल्या प्रियेला विचारून त्याचेबरोबर जाण्यास निघाला. पुढें हा संसार असार, हें शरीर रोगी व नाशिवंत जाणून मुनीदत्ताजवळ त्यानें जिनदीक्षा ग्रहण केली व तो तपश्चरण करूं लागला. ही गोष्ट कनकश्रीस समजली. तिला त्वेष चढला. ती मिथ्यात्वी बनली व मरून व्यंतरी झाली. आपल्या विभंगज्ञानानें वैशाखमुनींना विहार करतांना पाहून तिला पूर्वींच्या द्वेषाची स्मृति झाली. " आपणांला यौवनावस्थेंत एकटीला सोडून देऊन, हा निर्लज्ज पाषाणहृदयी तप करतो आहे म्हणे ! कसलें हें तप ! दुष्ट कुणीकडचा, पाहूं आतां कसें तप करतो तें ! " असा विचार करून तिनें ते मासोपवासानंतर आहारासाठीं गेले असतां उपसर्ग केला. त्यामुळें त्यांना उपवास घडला. पुढें महिना लोटल्यानंतर ते फिरत फिरत उपवासाचें पारणें सोडण्यासाठीं राजगृहीं नगरींत आले. उपवासांनीं ते श्रांत झाले होते. मुनीराज आल्याचें ऐकून चेलना त्यांना पाचारून घेण्यासाठीं आपल्या दारीं उभी राहिली विधि-पूर्वक तिनें त्यांना आहारास पाचारिलें.

इकडे मुनी चेलनाराणीच्या घरीं आहारास गेलेले आपल्या विभंगज्ञा-नानें जाणून घेऊन ती व्यंतरीहि तेथें आली व त्यांना उपसर्ग करण्याच्या इराद्यानें तिनें इंद्रियवर्धन केलें. चेलनेनें हा उपसर्ग होतो असें जाणून घेऊन त्यांना अंतराय न घडावा म्हणून त्याचवेळीं पडदा टाकला. मुनींनीं शांत चित्तानें भोजन केलें व ते निघून गेले. पुढें ते विपुलाचल पर्वतावर ध्यान करूं लागले. ध्यानानें त्यांच्या सर्व घातीकर्मांचा क्षय झाला. त्यांना केवळज्ञान प्राप्त झालें. तों इकडे इंद्राचें आसन कंपायमान झालें. तेव्हां वैशाखमुनींना केवळ ज्ञान प्राप्त झालें आहे असें कळल्यामुळें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इंद्र देवांसह त्यांना वंदना करण्यास आला. देवांनीं मोठ्या भक्तीनें त्यांची गंधाक्षतांनीं पूजा केली. स्तुति गायिली. राणी चेलना-हि त्यांचें दर्शन घेण्यासाठीं तेथें आली होती. त्यांना नमस्कार करून सर्व देवांसमोर तिनें विचारलें ' भो, मुनिवर्या ! आपण आहारासाठीं माझें घरीं आलां असतां आपणांस उपसर्ग तो कोणी केला होता ? आणि तो कां झाला ? हें सांगण्याची कृपा करावी. तेव्हां मुनीवर उत्तरले " पूर्वीं मी वैशाख असतां कनकश्रिया माझी भार्या होती. एकदां दोघे आम्हीं आपल्या मंदिरांत प्रेमालाप करीत असतां माझा पूर्वींचा मित्र मुनिदत्त आहारासाठीं आला. तेव्हां मी तेथून उठून त्यांना आहार दिला. भोजनोत्तर मी त्यांचें बरोबर जाऊन दीक्षा घेतली. ही गोष्ट कनकश्रियेस समजतांच तिला क्रोध चढला व मिथ्यात्वानें मरून ती व्यंतरी झाली. आपल्या विभंगज्ञानानें मी तप करीत आहे हें जाणून, पूर्वींच्या द्वेषाचा सूड उगविण्याच्या भावनेनें ती इंद्रियवर्धन करून पारण्याच्या वेळीं उपसर्ग करूं लागली. मासोपवासानंतर मी तुझ्या येथें पारणें सोडण्यासाठीं आलों असतां तिनेंच इंद्रियवर्धन करून उपसर्ग केला. पण हे चेलने ! तूं सावधपणें पडदा टाकून दूर केलास. माझा आहार निर्विघ्नपणें पार पडला. नंतर मीं या पर्वतावर येऊन कायोत्सर्गानें ध्यान करूं लागलों. ध्यानामुळें माझीं सर्व घातीं कर्मैं जळून गेलीं. लोकालोक प्रकाशक असें केवळ ज्ञान प्राप्त झालें. लग्नोत्तर सातच दिवसांनीं मी संसाराचा त्याग करून दीक्षा घेतल्यामुळें माझी प्रिया रागाऊन व्यंतरी झाली. हे भद्रे, तूंच त्या उपसर्गाला दूर सारून उपगूहनांग निर्मळ-पणें पाळलेंस. " हा वृत्तांत ऐकून सर्व देवांना विस्मय वाटला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनींचें पूजन, वंदन करून ते सगळे देवलोकांस निघून गेले. पुढें त्यांनीं खडतर तप आचरून अशेष कर्मांचा नाश केला व शेवटीं मुक्तिपद प्राप्त करून घेतलें. चेलनाराणीनें जसें उपगूहनांग पाळून धर्माचें रक्षण केलें. तद्वतच करणें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

कथा ९ वी.

सम्यक्त्वी श्रेणिकाचें उपगूहनत्व.

मगध देशांत कुबेरनगरीसारखी धनसंपन्न राजगृही नगरी होती. तेथील राजा श्रेणिक हा सम्यग्दृष्टी, शूर व विशुद्धहृदयीं होता. त्याची राणी सम्यक्त्वी, रुपयौवनसंपन्न नीलोत्पलदललोचना होती.

एकदां सौधर्मस्वर्गांत देवांच्या सभेंत देवांदेवांमध्यें शिळोप्याच्या गोष्टी चालल्या असतां एकानें उद्गार काढलें कीं, 'सध्यां मृत्युलोकांत श्रेणिकासारखा क्षायिक सम्यक्त्वी कोणीच नाहीं.' श्रेणिकाच्या सम्यक्त्वाची प्रशंसा केलेली पाहून, एका संशयी देवानें त्याची परीक्षा करण्याचें ठरवून तो राजगृहींत आला. नगरींतील एका सरोवराचें कांठीं मुनीचें रुप धारण करून तो पाण्यांत मासे धरण्यासाठीं जाळें टाकून बसला. त्या रस्त्यानें जात असतां श्रेणिकाच्या दृष्टीस हें दृश्य पडलें. त्यावेळीं मुनिराज मासे धरून एका पेटाऱ्यांत भरीत आहेत हें पाहून तो आश्चर्यानें विमूढ झाला. तात्काळ तो आपल्या हत्तीवरून खालीं उतरून सरोवराचें कांठीं आला. त्यानें मुनीराजांना भक्तिपुरःस्सर तीन प्रदक्षिणा घालून साष्टांग नमस्कार केला व शांतपणें म्हणाला 'महाराज! हा वेष मोक्षमार्गप्रवर्तक आणि आपण संसारवर्धक असें हे मासे धरण्याचें कार्य करीत आहांत हें आपणांस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उचित नाहीं. आपण आज्ञा देत असाल तर मी हे पेटाऱ्यांतील सारे मासे पुन्हां पाण्यांत परत सोडून देतो. पण मुनींनी कांहीं एक उत्तर न देतां पुन्हां पाण्यांत जाळें टाकलें. राजानें त्यांना परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. शेवटीं त्रासल्यासारखें दाखवून मुनी राजास म्हणाले 'बरं मला माशांशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं. चल, मी तुझ्या घरीं येण्यास तयार आहे.' तेव्हां श्रेणिकानें ते सारे मासे पाण्यांत सोडून दिले आणि मुनींना घेऊन राजवाड्यांत आला.

राजा आपल्या सिंहासनावर बसला असतां त्यानें सामंताचे उद्गार लोकांच्या तोंडून ऐकलें कीं, 'मासे धरणारा तो मुनि कसा? आणि त्याची राजा भक्ति करतो. ही काय भक्ति म्हणावी ? राजा आहे म्हणून कोणी बोलत नाहीं. वास्तविक हा शुद्ध वेडेपणाच. हा धर्म म्हणावा काय ? थोरांना कोण नांवें ठेवणार ?' राजास या जिनद्वेषी सामंताच्या बोलण्याचा राग आला. पण तो बाह्यतः न दाखवितां तो आपले दरबारचे कामास लागला. नंतर देशदेशच्या शासनपत्रिका लिहून त्यावर विष्ठेचा लेप करून त्या जिनशास्त्रसाधुनिंदक नृपतींच्या स्वाधीन केल्या. जरी त्यांना दुर्गंधी येत होती तरी त्या आज्ञा–पत्रिका सामंतानें घेऊन त्यावर पुष्पगंधाक्षता लावून मस्तकांशीं धरल्या. विष्टेनीं वेष्टित अशा शासन पत्रिका–हुंडिकांना–लवून नमस्कार केलेला पाहून श्रेणिक त्यास म्हणाला " आपली ही कृति कसली ! आणि मलाच नांवें ठेवतां ? आपणही प्रत्यक्ष विष्टावेष्टित पत्रिकेचें वंदन करीत आहांत ! या आपल्या कृतीला काय म्हणावें ? तेव्हां तो म्हणाला ' नरवरा ! तुझ्या प्रसादानें आम्हांला ही विष्टा कुंकुमाप्रमाणेंच होय.' सामंताचें हें उत्तर ऐकून श्रेणिक-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजा त्यांना म्हणाला आपणाला जशी माझी आज्ञा—प्रमाणपत्रें-मग ती शुद्ध असोत वा अशुद्ध असोत आदरणीय, वंदनीय वाटतात तद्वतच हें मीनबंधनासक्त वेषधारी मुनीच्या वंदनेसंबंधीं होय. जिनधर्मप्रभावामुळें त्याची आज्ञा मला शिरसावंद्य मान्य आहे म्हणून मी हें केलें. आणि त्यांतून हें पत्रिकेवरील विष्टेच्या वेष्टणा-सारखें हें वेष्टण रूपाचें आहे. बाकी खरें रूप औरच आहे. श्रेणि-काचें याप्रमाणें सभेंत विवेचन होत आहे तोंच देवानें आपलें दिव्य रूप प्रगट केलें व हंसून राजास म्हणाला 'राजा ! तुझ्या शुद्ध, निष्कलंक सम्यक्त्वाची वाखाणणी देवाचे सभेंत एका देवानीं केली, पण ती मला अतिशयोक्ती वाटली. ह्यासाठीं प्रत्यक्ष तुझी परीक्षा करावी या हेतूनें मी येथें आलों होतो. तुझ्या या अचलधर्मप्रेमानें माझा संशय दूर झाला. तूं खरोखरी माझे कसोटीस उतरला आहेस. मला अतिशय आनंद होत आहे. मी हा तुला दिव्य हार देतो. त्याचा तूं स्वीकार कर ! असें म्हणून त्यानें एक दिव्य मुक्ताहार श्रेणिकास दिला व तो स्वर्गास निघून गेला. भूंवर श्रेणिकाची इंद्रानीं केलेली स्तुति ऐकून व त्यास त्याच्या भक्ती-बद्धल देवांनीं दिलेला हार पाहून कित्येक बाह्याभ्यंतरपरिग्रहाचा त्याग करून महाव्रतधारी बनले. कित्येकांनीं श्रावकधर्म ग्रहण केला. तर कित्येकांनीं सम्यक्त्व ग्रहण केलें. कित्येक जिनशासनाचें अंगि-करण करते झाले.

तात्पर्य— आपल्या शुद्ध सम्यक्त्वामुळें सुरेंद्राकडून जसा श्रेणिक पूजनीय ठरला तद्वतच प्रत्येकांनीं—भव्यांनीं पूजनीय बनण्याचा प्रयत्न करावा हें इष्ट होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १० वी.

' कुमार वारिषेण. '

श्रीमान् श्रेणिक राजा आपल्या गुणी राणी चेलने सह राजगृहींत राज्य करीत होता. वारिषेण त्याचा एक पुत्र अत्यंत गुणी, सम्यक्त्वी होता. एकदां तो चतुर्दशींच्या दिवशीं प्रोषधोपवास ग्रहण करून रात्रीच्या समयाला स्मशानांत ध्यानस्थ बसला होता. त्याच नगरींत विद्युच्चोर नांवाचा एक प्रख्यात चोर राहात होता. त्याला अंजनादिकसिद्धि प्राप्त झाल्या होत्या आणि तो गुटिका-कोविद होता. गणिका, कामलता हें त्याचें आवडतें प्रेमपात्र होतें. ती कुशल वेश्या होती. आपल्या मधुर भाषणांनीं ती आपल्या प्रियकरांना आपल्या पूर्णपणें कह्यांत ठेवी. एकदां राणी चेलना राजोद्यानाकडे जात असतां तिच्या गळ्यांतील अमूल्य तेजस्वी मुक्ताहारावर तिची नजर गेली. तो तिच्या मनांत भरला व आपणांस तसा हार मिळावा अशी तिला इच्छा उत्पन्न झाली. त्या चिंतेनें ती बेभान झाली. तिला कांहीं सुचेना. दुःखानें ग्रस्त होऊन ती अचेतनवत् पलंगावर जाऊन लवंडली. तिचें डोकें भणाणून गेलें. तिला कांहीं सुचेनासें झालें. इतक्यांत चोर घरीं आला. प्रियेला अस्वस्थस्थितींत मंचकावर पहुडलेली पाहून तो म्हणाला, “ लाडके, तूं अशी अस्वस्थ कां दिसतेस ! तुला कांहीं झालें आहे काय ? किंवा कशाची कमतरता पडली बोल ! हा तुझा सेवक एका पायावर तुझी मनीषा पूर्ण करण्यास तयार आहे. कां माझ्या हातून प्रिये ! तुझा एखादा अपराध घडला ? बोल प्रिये ! बोल ! हा तुझा सेवक-दास आज्ञा ऐकण्यास तयार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे." "नाथा, आपणांवर माझा मुळींच राग नाहीं पण आज राणी चेलनेच्या गळ्यांतील हार पाहिला तेव्हांपासून प्रियकरा ! मला मुळींच चैन पडेनासें झालें आहे. तरी तो आपण मला आणून द्या. त्याशिवाय माझ्या जीवास चैन पडणार नाहीं." प्रिये तूं अगदीं निश्चित ऐस ! मी लवकरच तो हार तुझ्या सेवेंत आणून हजर करतो. विनाकारण तूं शोक करूं नकोस." असें सांगून तो आल्या पाऊलींच बाहेर पडला. व्यसनाधीन, वेश्याधीन मनुष्य काय नाहीं करणार ?

राजवाड्याभोंवतीं पहारा करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यानें आपल्या विद्येच्या सहाय्यानें मूर्छित करीत करीत राजवाड्यांत प्रवेश केला. शेवटीं चेलनाराणी निजली होती त्या मंदिरांत—श्रोणिक-मंदिरांत-तो आला. त्यानांहि मूर्छित करून त्यानें आकाश-भूतलाला प्रकाशित करणारा दिव्य मुक्ताहार हस्तगत केला व तो राजवाड्या-बाहेर पडला. पण हाराच्या प्रकाशामुळें ते मूर्छित राजसेवक शुद्धी-वर आले. त्यांनीं त्यास हार घेऊन जातांना पाहिलें व त्याचा पाठलाग सुरूं केला. लोकांच्या भीतीनें तो हार घेऊन धांवत स्मशानांत शिरला. तेथें वारिषेण ध्यानस्थ बसले होते. आतां बाजू अंगावर येणार हें पाहून त्यानें तो हार वारिषेणाच्या पुढ्यांत टाकून दिला व त्यांतून निसटला. राजसेवक प्रकाशाच्या अनु-रोधानें अगदीं वारिषेणापुढें आले. वारिषेण त्यावेळीं कायोत्सर्गानें ध्यान करीत होते. त्याच्यापुढें तो हार पाहून शिपायांनीं जाऊन ही हकिकत श्रेणीकांस कळविली. श्रेणिकानें तात्काळ स्वतःचा मुलगा होता तरी त्यास फाशीवर चढवा अशी आज्ञा सेवकांस दिली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आज्ञेप्रमाणें त्याचा शिरच्छेद करण्याची तयारी केली. तलवार हातांत घेऊन 'तलार' सज्ज झाला. डोकें उडविण्यासाठीं तरवार त्याचेवर उभारण्यांत आली पण चमत्कार असा कीं, तरवारीचें हारांत रूपांतर झालें व तो हार गळ्यांत पडला. त्याचवेळीं वरतून देवांनीं पुष्पवृष्टि केली. दुदुंभी वाजूं लागल्या. देव त्याची स्तुति गाऊं लागले. राजसेवक दिंगमूख होऊन गेले. त्यांनीं राजांस येऊन हीं हकिकत सांगितली. श्रेणिकास आनंद झाला. तो प्रियेस म्हणाला, "पहा आपलाच तो पुत्र ! अशी कुळाला बट्टा लावणारी गोष्ट तो कशी करील ? मी मनांत कल्पना केलीच होती पण आपला मुलगा चोर होता तरी त्यास आपला म्हणून सोडून दिलें या लोकापवादाला भिऊन मी मागचा पुढचा विचार न करता तशी आज्ञा केली होती. पण आतां तो आपल्याच पुण्याईनें वाचला एवढेंच नव्हें तर देवांकडूनही मान्यता पावला !" एवढें भाषण चाललें आहे तों प्रभातभेरी वाजूं लागल्या. पहाट झाली. नंतर श्रेणिकराजा चेलनेसह वारिषेणाकडे आला. वारिषेण कायोत्सर्ग सोडून खालीं बसला होता. उभयतांनीं त्याची क्षमा मागितली व त्यास अर्जवून घरीं चलण्याबद्दल सांगितलें. तेव्हां तो त्यांना गद्गद् स्वरानें म्हणाला, "माझा उपसर्ग क्षमेनेंच दूर होत असेल तर मी आतां माझ्या उपवासाचें पारणें पाणिपात्रानेंच अन्न घेऊन करीन." मुलाचा हा दृढनिश्चय पाहून श्रेणिक आपल्या परिवारांसह घरीं परतला. वारिषेणानें सर्व परिग्रहाचा त्याग करून धर्मसेनगुरुजवळ दीक्षा घेतली.

एकदां पलासग्रामांत राहात असणाऱ्या सोमदत्तानें—वारिषेणाच्या मित्रानें—वीरजिनाचें वंदन करण्यास जात असतां वारिषेणास

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाहिलें. तेव्हां तो ऊठून त्यांना सामोरा गेला. यथाविधी त्यांना पडघावून घेऊन त्यानें विधिपूर्वक त्यांना आहार दिला. आहारोत्तर वारिषेणहि जाण्यास निघाले. तोहि आपल्या प्रियेला विचारून मुनीवरोबर निघाला. मार्गांत तो वारिषेणाला सरोवराचें, झाडाचें, सृष्टीसौंदर्याचें निरीक्षण करून त्याचें वर्णन सांगूं लागला व पूर्वींच्या बाळपणींच्या गोष्टींचें स्मरण करून देऊं लागला. पण मुनी त्याच्या भाषणाकडे लक्ष्य न देतां आपला मार्ग निस्पृहतेनें कंठित होते. शेवटीं ते दोघेहि वीर समवशरणांत येऊन दाखल झाले. महावीराची स्तुति करून त्यांनीं तेथील सर्व दिगंबर मुनीवरांना नमस्कार केला. नंतर योग्य आसनावर वारिषेण जाऊन बसले. सोमशर्माहि त्यांचें जवळ बसला. वारिषेणाजवळ बसलेले पाहून कोणी एक साधु वीर सभेंत म्हणाला ' खरोखर हा पुण्यात्मा विशुद्ध हृदयीं दिसतो. आणि ज्या अर्थीं वारिषेणाबरोबर आला आहे. त्या अर्थीं बहुतेक तप–दीक्षा घेण्याच्या इच्छेनेंच आला असावा. तें त्याचें भाषण ऐकून जवळच बसलेला एक साधू ब्राह्मण उत्तरला ' हा मूढ कसलें तप घेणार? याला आगमाचें ज्ञान देखील नाहीं. केवळ मूर्ख आहे. नंतर हातांत वीणा घेऊन किन्नरानें किन्नरीसह मधुर गीत गाण्यास सुरूवात केली—

कुवलय नवदलसमरुचिनयने ।
सरासिजदल निभव करचरणे ॥
श्रुतिसुखकरपरभृतवचने ।
कुरु जिन नुति मयि साखि विधुवदने ।
बहु मत्त मलिन शरीरा मलिन कुचेलाधि विगत तनु शोभा ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तद्गमनदग्धहृदया शोका तपशुष्कमुखकमला ॥
विगता गत लावण्या वरकांति कलाकलावषीरमुक्ता ।
किं जीविष्यत्यवनिका नाथेपि गतेऽवयं मोयं ॥

सोमदत्ताच्या मनांवर गाण्याचा परिणाम झाला. त्यास आपल्या प्रियेची आठवण झाली व तो घराकडे जाण्यासाठीं उठून उभा राहिला. वारिषेणानें तात्काळ ताडलें कीं, हा सारा किन्नरगीताचा परिणाम. आतां हा परत संसारांत गुरफटणार. यास परत या मार्गावर आणलें पाहिजे. असा विचार करून तोहि त्याचे बरोबर जाण्यास उठला. जातां जातां त्यास म्हणाला मित्रा, प्रथम आपण दोघेहि माझ्या घरीं जाऊं. नंतर तेथून तुझ्या घरीं जाऊं. मित्रानें तें कबूल केलें. ते दोघेही प्रथम आपण ठरविल्याप्रमाणें वारिषेणाचे घरीं आले. मुलाला परत आलेला पाहून चेलनेच्या मनांत संशय आला—शंका आली—कीं हा कदाचित् चारित्रभ्रष्ट झाला असावा. पण तो भाव तिनें व्यक्त न करतां त्याचें मोठ्या आदरानें स्वागत केलें व त्याची परीक्षा पाहाण्यासाठीं तिनें त्यांना बसण्यासाठीं एक रंगीत व दुसरें साधें अशीं दोन आसनें टाकिलीं. साध्यावर वारिषेण बसला व तो विमूढधी रंगीत आसनावर बसला. चेलनेची शंका थोडी दूर झाली. नंतर तीहि त्याचे समोर बसली. (चेलनेच्या हृदयांत प्रकाश पडला व यांत कांहीं तरी गुह्य आहे असें तिचें मन तिला सांगू लागलें.) कुशलोत्तर समाचार झाल्यानंतर वारिषेण मातेस म्हणाला 'माते, माझ्या वधुवरांना बोलावणें पाठवा' त्याप्रमाणें चेलनेनें दासीवर्गास त्यांना बोलावण्यासाठीं पाठवून दिलें व नंतर वारिषेणाकडे वळून म्हणाली 'मुनिवरा! वधुवरांना बोलावणें धाडलें आहे. त्या येईपर्यंत आपण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आम्हांस धर्मकथा ऐकवावी. वारिषेण उत्तरला माते! तूंच आम्हांस धर्मकथा श्रवण करीव. नंतर मग तुम्हांला आम्हीं ऐकवूं! मुलाच्या आज्ञेप्रमाणें चेलना सांगूं लागली महाराज! "कोण्या एका गांवांत सुभद्रा नांवाची स्त्री राहात असे. तिला सुभद्र नांवांचा मुलगा होता. तो गुराख्याचा धंदा करीत असे. ते दरिद्री कुटुंब होतें. एकदां तो सरोवरांकांठीं गुरें चारित असतां त्यास त्याच्या व्यवसायबंधूंनीं खीर खाण्यास दिली. ती त्यास फार आवडली. कारण त्यानें कधींच तसलें पक्वान्न खाल्लें नव्हतें. सायं-काळीं गुरें घेऊन तो परत घरी आला. दुसरा दिवस उजाडला. तेव्हां तो आईस म्हणाला 'आई, आई, मला आज खीर करून दे' तेव्हां आई त्यास म्हणाली 'बाळ आपण गरीब माणसें आपल्या रे घरीं कोठून दूध साखर असणार! आणि त्या शिवाय तर खीर होत नाहीं. तेव्हां असा भलतांच हट्ट धरणें तुला योग्य नाहीं.' पण तो ऐकेना. व म्हणूं लागला 'जर तूं मला खीर करून देणार नाहींस तर मी मुळींच गुरें हांकण्यास जाणार नाहीं.' मातेला आपल्या परिस्थितीबद्दल रडूं आलें. मुलगा पडला एकुलता एक. तिचा जीव राहवेना. शेवटीं शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून उसणवारी तिनें दूध, साखर, वगैरे मागून आणून खीर करून मुलास वाढली. त्यानें हावरेपणानें खाण्यांस सुरवांत केली. शेवटीं त्यानें इतकी खाल्लीं कीं, त्यास उलट्या झाल्या. पुन्हांही त्यानें खीर मागितली. पण खीर संपून गेली होती. तेव्हां मातेनें त्यास ती उलटून पडलेली खीर वाढली. ती त्यानें मोठ्या आनंदानें खाल्लीं." तेव्हां हे मुनीवरा! त्या गुराख्याचें करणें योग्य होतें काय? सांगा! कारण एके-ठिकाणीं म्हटलें आहे कीं—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यानीह दत्तानी पुरा नरेंद्रैः ।
दानानि धर्मार्थ यशस्कराणि ॥
निर्माल्यवत्तत्प्रतिमानि तानि ॥
को नाम साधुःपुनराददीत ।

राणी चेलनेनें आपली सांगितलेली कथा ऐकून वारिषेण आपली गोष्ट सांगूं लागले " माते! प्राचीन काळीं उज्जयनी नगरींत राजा वसुपाल आपल्या सुंदर वसुमति राणीसह राज्य करीत होता. त्यांना एक गुणमति नांवाची रूपवान्, गुणवान्, मुलगी होती. एकदां ती आपल्या शयनमंदिरांत निजली असतां कोणी एक दुष्ट सर्प येऊन तिला डसला. डसतांक्षणींच त्याचें विष तिच्या सर्वांगांत भिनलें व त्यामुळें ती अचेतन होऊन पडली. ही गोष्ट राजास कळतांच त्यानें मांत्रिकांना बोलावणें पाठवलें. राजाज्ञेप्रमाणें सर्व मांत्रिक गोळा झाले. त्यांना यथायोग्य आसनावर बसविल्यावर राजानें हकिकत सांगितली. तेव्हां तेथें जमलेल्या सर्व मांत्रिकांनीं राजकन्येस पाहिलें पण त्यांच्या बुद्धीच्या आंवाक्याबाहेर ही गोष्ट असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यांनीं आमचे हातून आपली कन्या उठणें शक्य नाहीं असें राजास निक्षून सांगितलें. तेव्हां तेथेंच एक मांत्रिक बसला होता. तो सर्वांच्या पुढें येऊन म्हणाला 'राजा तुझी आज्ञाच असल्यास मी तुझ्या मुलीस उठवूं शकतो. एवढेंच नव्हें तर ज्यानें तुझ्या कन्येला दंश केला त्या सर्पासही मी माझ्या मंत्राच्या सहाय्यानें बोलावून आणूं शकतो. तुझी आज्ञा असावी.' वसुपालानें त्यास मोठ्या आनंदानें अनुमति दिली. नंतर त्या धन्वंतऱ्यानें आपल्या मंत्रविद्येच्या सहाय्यानें, अनंत, वासुकी, कर्कोट, तक्षक, पद्म, महा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पद्म, कुलिक, आणि शंखपालक ह्या आठहि नागांना बोलावून आणलें. नंतर एक मंडळ तयार करून त्यांना म्हणाला ज्यानें या राजकन्येस दंश केला असेल त्यानें फक्त ह्या मंडळांत राहावें बाकी सर्वांनीं आपल्या स्थानाला निघून जावें. तेव्हां कुलिकाशिवाय करून बाकीचे इतर सर्व निघून गेले. नंतर तो धन्वंतरी त्यास म्हणाला 'दुष्टा ! तूं आपलें विष तरी परत घे. नाहींपेक्षां या प्रज्वलित अग्निकुंडांत उडी मारण्यास तयार हो.' कुलिक आपलें वीष घेण्यास तयार नव्हता. तेव्हां त्यानें विचार करून अग्निकुंडांत प्रवेश केला." कोणी एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं—

वरं प्रविष्टे ज्वलिते हुताशने ।
न चापि भंगी चरसंचितं व्रतं ॥
वरं ही मृत्युः सुविशुद्धकर्मणां ।
न शीलवृत्तस्खलितं हि जीवितं ॥

अर्थात् आपल्या वृताचा भंग करण्यापेक्षां पेटलेल्या अग्नींत उडी टाकणें बरें ! पण शीलव्रताचा भंग झाल्यानंतर जीवंत राहाणें इष्ट नव्हें.

इतक्यांत आपल्या स्वरूपांनीं ज्यांनीं शत्रूंच्या वधुजनांना जिंकलें आहे, आपल्या पायांतील झकांरांनीं दशादिशा बधिर करून टाकल्या आहेत असा अंतःपुरांतील वधूजनसमूह चेलनेजवळ आला व मुनींना नमस्कार करून एका बाजूस बसला. त्यांना पाहून वारिषेण सोमशर्म्यास म्हणाला 'मित्रा, तुझ्या स्त्रीपेक्षां या स्त्रीया कितींतरी पटीनें सुंदर आहेत. हें माझें सारें धन तुझ्या हवाली करतो. तूं याचा यथेच्छ उपभोग घे.' वारिषेणाच्या भाषणानें आपलें कार्य केलें. तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ओशाळला. त्यास उपरति झाली. पश्चात्ताप झाला. तो मुनीना म्हणाला 'आपलें धैर्य अलोट आहे. आपला त्याग, आपलें तप खरोखरीं श्रेष्ठ आहे. आपण सत्यवीर आहांत. धन्य आहांत. आपण वैभवशाली शीलसंपन्न आहांत. आपल्यासारखे मित्र मिळाले हें माझें भाग्य. आपणच मला या मूढमार्गापासून रत्नत्रयमार्ग दाखविला. मी चलायमान होत होतों पण आपणच उपदेशानें मला स्थिर केलें. धन्य आपली. आतां लवकर वीरजिनाकडे चला व मला दीक्षा द्या.'

तदनंतर आपल्या मातेला वंदन करून वारिषेण सोमदत्तासह निघाला तो थेट महावीरसमवसरणांत आला. तेथें योग्य उपदेश ऐकून वारिषेणानें सोमशर्म्यास दीक्षा देवविली. ज्याप्रमाणें वारिषेणानें स्त्रीनादिष्ट सोमशर्म्यास योग्य उपदेशानें तत्वज्ञान करून देऊन जिनधर्म पाळण्यांत स्थिर बनविलें तद्वतच प्रत्येक वीर जिनानुयायी जीवांनीं सम्यक्त्वापासून च्युत झालेल्या जीवांना पुन्हां धर्मांत स्थिर करणें त्याचें परम कर्तव्य होय.

———

कथा ११ वी.

मुनि विष्णुकुमार.

प्राचीन काळीं अवंतीदेशांतील उज्जयनी नांवाच्या नगरींत श्रीधर्म राजा राज्य करीत होता. त्याची राणी श्रीमती गुणी, कलाकोविद होती. राजा प्रजाहितदक्ष व न्यायी होता. त्याचे बलि, बृहस्पति, प्रल्हाद आणि नमुची असे चौघे मंत्री होते. हें मंत्रिमंडळ राजाचें आवडतें होतें पण जैनधर्मद्वेष्टे होतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काहीं काळ गेल्यानंतर त्या नगरीस विहार करीत करीत श्रुतसागरज्ञ अकंपनाचार्य आपल्या शिष्यवृंदासह राजोद्यानांत येऊन उतरले. तेथें येतांक्षणींच अकंपनाचार्यमुनिवरांनीं आपल्या ज्ञानानीं येथील राजापासून उपसर्ग होणार ही गोष्ट जाणून घेतली. तेव्हां त्यांनीं आपल्या सर्व शिष्यांना मौनव्रत दिलें.त्यावेळीं त्याचेपैकीं नुकतेच झालेले एक मुनी गांवांत आहारासाठीं गेले होते. त्यांना ही गोष्ट विदित नव्हती. मुनी उपवनांत आल्याची खबर कळतांच शहरवासी लोक आपल्या परिवारासह मुनिदर्शनास जाण्यास निघाले. राजा आपल्या मंत्रिमंडळासह सौधावर बसला होता. जनसमूह वनाकडे जात असलेला पाहून मंत्रिवर्गास उद्देशून म्हणाला, 'कोणत्याहि प्रकारचा उत्सव नसतां हा जनसमूह राजवनाकडे कां बरें जात आहे?' तेव्हां बली उत्तरला राजन्, 'तुझ्या उद्यानांत नग्नश्रमणांचा संघ आला असून त्याच्या वंदनेसाठीं हा जनसमूह गंधाक्षता घेऊन तिकडे जात आहे.' तेव्हां राजाला मुनीदर्शनाची उत्कट इच्छा झाली. तो बलीस म्हणाला 'चला, आपणहि तिकडेच जाऊं या व त्या थोर पुरुषाचें वंदन करून व धर्म श्रवण करून पावन होऊं.' पण ही गोष्ट त्या मिथ्यात्वी बलीस रुचली नाहीं. तो राजास म्हणाला राजन्, वेद हा सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म आहे. तो लोकमान्य आहे. श्रुतीला वेद आणि धर्मशास्त्रांना स्मृति म्हणतात आणि या सर्वांत मीमांसाधर्म श्रेष्ठ आहे. जो स्मृति श्रुतींच्या ठिकाणीं निष्ठा ठेवतो, त्याप्रमाणें आचरण करतो त्यासच इहपर सुखाची प्राप्ती होते असें वेदांत म्हटलें आहे आणि तेंच सुखावह आहे. आपली इच्छाच असेल तर मी आपणांला आनंदानें त्या निर्मल यथार्थ धर्माची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

योग्य कल्पना करून देतों. श्रुति स्मृति यांनीं नग्नमुनीवर बहिष्कार घातला आहे. त्यामुळें तें कोणालाच मान्य नाहींत. तरी आपणहि तेंच मान्य ठेवा व तिकडे जाण्याचें रहित करा.' पण राजानें त्याच्या म्हणण्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. मला गेलेंच पाहिजे असें त्यांना उत्तर दिलें. बलीचा नाइलाज झाला. तरी तो जातां जातां म्हणाला 'राजा, आम्हीं मुनीवर्यांना वादांत जिंकू. तूं मध्यस्थी ऐस म्हणजे झालें!' राजाला त्याच्या म्हणण्यावर हंसूं आलें. पण तें बाहेर प्रगट न करतां आपल्या परिवारासह तो मुनिदर्शनास जाण्यास निघाला.

वनांत आल्यानंतर त्यांनीं भक्तिभावानें नमस्कार केला. परंतु सर्वांनींच मौन धरल्यामुळें कोणीहि बोललें नाहीं. राजानें ते ध्यानस्थ असल्यामुळें बोलत नसतील हे जाणून घेऊन तो स्वस्थ बसला. पण ते मंत्री मुनीस प्रश्न विचारून बेजार करूं लागले. त्यांनाहि उत्तर मिळेना. तेव्हां ते राजास उद्देशून म्हणाले 'राजन्,आम्हीं यांना वादांत परास्त करूं हें जाणूनच हे मूक राहिले आहेत. ते आम्हांस भितात हें उघड होय. आणि आमच्या प्रश्नास उत्तर न देणें म्हणजे ते वादांत हरले असेंच समजणें योग्य. तेव्हां येथें आतां जास्त वेळ थांबण्यांत काय अर्थ? आम्ही तुला सांगत नव्हतो कीं त्यांना सहज जिंकूं म्हणून. तरी चला आपण जाऊं या. राजा आपला मूळ उद्देश साध्य करून चुकला होताच. तोहि त्याचेबरोबर जाण्यास निघाला. रस्त्यांत दुरून एका नग्नमुनीला येत असलेलें पाहून बळी राजास म्हणाला " राजा, पहा हा एक नागडा, लठ्ठ, शृंगहीन, गलेलठ्ठ, गर्दभ साधु येत आहे. साधूंनीं हें मोजकें शब्द ऐकून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घेतलें. यावरून तें आपल्याविषयींच वादविवाद करतात हें जाणलें. ते आपला भाव न बदलतां शांतपणें म्हणाले. ‘आपण कोठून आलांत?’ बळी हंसून उत्तरला ‘आपणांला एवढेंसुद्धां माहीत नाहीं कीं आम्हीं आपणांपुढेंच नगरांतून बाहेर आलों. आपण आपणांस ज्ञानी म्हणवितां आणि एवढी क्षुल्लकदेखील गोष्ट आपणांस ओळखतां येत नाहीं.’ यावर मुनी शांतपणें म्हणाले, ‘तें मी जाणतों. आणि आपणांस मी त्याबद्दल विचारीत नाहीं. पण आपण मनुष्य, नरक, पशु, किंवा देव यांपैकीं कोणत्या गतींतून आलांत? हेंच मी आपणांस विचारीत आहें. तरी आपण सांगण्याची कृपा करावी. माझा म्हणण्याचा हाच उद्देश आहे.” बळी उत्तरला ‘ यते ! या जन्मांतील गोष्टीं कोणीहि जाणूं शकत नाहीं. तर पुढील जन्माच्या किंवा गत जन्माच्या गोष्टी कोण सांगूं शकणार? तेव्हां श्रुतसागर म्हणाले ‘तुझी इच्छाच असेल तर मी तुझ्या मागील जन्माची हकीकत सांगतों ती ऐक. “ यांच नगरांत रुद्र व कपिल नांवांचे दोन ब्राह्मण राहात असत. त्यांपैकीं रुद्राचा मुलगा रुद्राणी (म्हणजे तुझा जीव) व कपिलाचा मुलगा कपिल. या दोघांमध्यें पैशासंबंधानें तंटे होऊन भयंकर मारामारी झाली. त्या मारामारींत कपिलानें मारलेल्या तरवारीच्या आघातानें रुद्राणी गतप्राण झाला व मरून पहिल्या नरकास गेला. तेथील भयंकर दुःखमय आयुष्य भोगून पूर्वपुण्याईनें जंगलांत हरीण होऊन जन्मला. गाण्याच्या नादानें तो आपल्याच नादांत गुंग असतां व्याधानें त्यास ठार केलें आणि तोच तुझा जीव देवकीच्या पोटीं मिथ्यात्वी बली नामें जन्मला. पुढें तूं आपल्या गुणांनीं या राजाचा मंत्री झालास. ही तुझी पूर्वीची कथा. श्रुत-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सागराच्या मुखांतून बलीचें पूर्वभवांतर ऐकून राजास आनंद झाला. नंतर तो मंत्र्यासह घराकडे मुनींना नमस्कार करून परतला.

इकडे मुनींना त्या उन्मत्तांना वादांत परास्त केल्यामुळें आनंद होत होता. पण ते मंत्री तिकडे त्याच्यावर रागानें जळफळत होते. त्यांनीं येऊन अकंपनाचार्यगुरूस ही हकीकत सांगितली. मुनींनीं त्यांना दोष दिला. आपण वाईट केलेंत. याचा परिणाम आतां सर्व संघाना भोगावा लागेल. तरी आतां या संघापासून आपण दूर राहा. गुरुच्या आज्ञेप्रमाणें ते मुनी नगराजवळच जेथें प्रथमतः वाद झाला त्याच जागेवर जाऊन कायोत्सर्गानें ध्यान करीत राहिले. रात्रीच्या वेळीं ते चौघे आपल्या अपमानाचा सूड उगविण्यासाठीं हातांत तरवारी घेऊन तेथें आले. मुनींना त्यांनीं चोहोंबाजूंनीं घेरलें व एकदम वार करण्यासाठीं आपले हात वर उगारले. ही गोष्ट नगर-देवतांना समजली. त्यांनीं तात्काळ तेथें प्रगट होऊन त्यांना स्तंभित केलें. त्यामुळें त्यांचें हातपाय मूळ जागेवरून मुळींच हालेनात. अशा स्तंभित स्थितींत सारी रात्र दुःखांत गेली. पहाट होतांच ही गोष्ट राजाचे कानावर गेली. तो त्या ठिकाणीं आला. त्यावेळीं देवतांनीं मोठ्यानीं नाद करून सांगितलें कीं, हे राजा माझ्या क्षेत्रांत-हद्दींत राहणाऱ्या मुनींनां हे तुझे मंत्री ठार मारण्यास उद्युक्त झाल्यामुळें त्यांना अशी शिक्षा दिली आहे. आतां आम्हीं यांचा तुझ्या समक्ष शेवट लावतों. देवतांचीं वाणी ऐकून राजा त्यांना नम्रपणें म्हणाला देवींनों! असा कोप करूं नका. माझ्यासाठीं त्यांना सोडून द्या. जीव दान द्या. राजाच्या म्हणण्यावरून देवींनीं त्यांना सोडून दिलें. नंतर तात्काळ राजानें त्यांची निर्भत्सना करून, गाढवावरून त्यांची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वरात काढवली व त्यांना आपल्या राज्याबाहेर हाकलून दिलें. तो चमत्कार पाहून कित्येकांनीं श्रावकाची तर कित्येकांनीं माध्यस्थ भावाची दीक्षा घेतली आणि नंतर सारेजण त्यांना वंदन करून आपापल्या घराकडे निघून गेले. याप्रमाणें श्रुतसागरमुनी उपसर्ग सहन करून निर्दोषी बनले व आपल्या गुरूच्या संघांत येऊन दाखल झाले.

आतां याच्या आनुषंगिक दुसरें एक कथानक येथें सांगणें प्राप्त आहे तें असें:—

हस्तिनागपूर शहरांत राजा महापद्म आपल्या लक्ष्मीमती राणीसह राज्य करीत असे. तो अत्यंत धार्मिक व प्रजाप्रिय होता. त्याला पद्मकुमार व विष्णुकुमार नांवांचें दोन पुत्र होतें. ते विनयाचार संपन्न, प्रतापी व शूर होते. एकदां विहार करीत करीत श्रुतसागरचंद्र-मुनी त्या शहरास आले. मुनी आल्याची वार्ता समजतांच आपल्या पुत्रांसह राजा महापद्म वंदन करण्यासाठीं राजवनांत गेला. मुनी-मुखांतून धर्मश्रवण केल्यामुळें राजाला उपरति झाली. त्यानें पद्म-कुमारास राज्यकारभार सोंपवून आपण विष्णूकुमारांसह दीक्षा घेतली व तपश्चरण करूं लागले.

इकडे राजा श्रीधर्मानें हांकलून दिलेले मंत्री, हस्तिनागपुरास आले. त्यावेळी पद्मकुमार राज्य करीत होता. त्यानें आपले मंत्री म्हणून त्यांना ठेवून घेतले. कोटनाथाचा राजा सिंहबल मोठा परा-क्रमी होता. तो व्याघ्र, सिंह वगैरे क्रूर प्राणी राहतात अशा निबड अरण्यांतील पर्वताच्या गूहेमधून राहात असे. यानें पद्मकुमार राज्या-वर आल्यानंतर हस्तिनागपुरावर छापा घालून पुष्कळशी संपत्ति

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धन, धान्य, हत्ती, घोडे, लुटून नेले व तो एका भयंकर किल्ल्यांत दडून राहिला. त्यावेळेपासून पद्मकुमार राजा काळजींत पडला. काळजीमुळें तो उदास दिसे. बळी मोठा धूर्त होता. मंत्रीपदांवर येतांच त्यानें ही गोष्ट जाणून घेतली. एके दिवशीं संधि साधून राजाला विचारलें ' राजन् आपण दिवसे दिवस उदास कां दिसतां ? आपल्या चिंतेचें कारण सांगितल्यास मी शक्य असल्यास त्या गोष्टीचा प्रवंध करीन. मला आज्ञा व्हावी. ' तेव्हां राजानें सिंहबलाच्या लुटालुटीची हाकिकत सांगितली. बलीनें राजास त्यास धरून आणतों असें आश्वासन देऊन तो तयारीस लागला. नंतर एके दिवशीं शुभमुहूर्तावर रात्री बलीनें प्रस्थान ठेवलें. चित्रविचित्र रंगांच्या उत्तम पुष्कळशा गोण्या तयार करविल्या व त्यांत उत्तम उत्तम हत्यारें भरून एक एक मनुष्यहि बसविला व ती गोणीं मस्त रेड्यावर लादण्यांत आली. अशा पुष्कळशा गोण्या बरोबर घेऊन तो मजल दर मजल करीत सिंहबलाच्या नगरींत येऊन कोटांत प्रवेश करतां झाला. नंतर सर्व गोण्या फडाफड फाडून टाकून आपलीं सर्व माणसें त्यानें सज्ज केलीं. अशा रीतीनें आकस्मिक परचक्र आलेलें पाहून सिंहबल थोडा गांगरला. रागानें लाल चोळ झाला. दांत ओंठ खाऊं लागला. पण आतां लढाईस तोंड दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें जाणून तो आपल्या चपळ घोड्यावर विराजमान झाला व आपल्या सैन्यासह त्यांस सामोरा गेला. उभयपक्षांत भयंकर लढाई जुंपली. पण छापा अचानक असल्यामुळें सिंहबलाची पडती दिसूं लागली. शेवटीं बलीनें सिंहबलास मोठ्या युक्तीनें कैद केलें. अशा तऱ्हेनें विजय मिळवून तो सिंहबलासह हस्तिनागपुरांस आला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजसभेंत पद्मकुमार बसला असतां त्यानें सिंहवलास त्याच्या पुढें आणून उभें केलें. सिंहवलाला आपल्या पुढें पाहून राजाचा आनंद गगनांत मावेना. तो सिंहवलाकडे वळून म्हणाला 'बोल! तुला कोणती शिक्षा देऊं?' सिंहवल आपलें ब्रीद न सोडतां म्हणाला 'कुमारा, तुझी इच्छा असेल त्याप्रमाणें तूं कर! मी तयार आहे. हें ऐकून राजास फार आनंद झाला व त्यानें आपल्या हातांतील कंकण काढून त्यास दिलें व सांगितलें कीं जा, तुला मोकळें केलें आहे. तूं कोठेंहि जा! अथवा येथें राहून माझी सेवा कर! मी तुला बंधमुक्त केलें आहे.' नंतर तो बलीकडे वळून म्हणाला 'तुझ्या कामगिरीनें मी अत्यंत खूष झालों आहे. तुला जो कांहीं वर मागावयाचा असेल तो खुषीनें मागून घे. मी तो पुरविण्यास तयार आहे.' बली उत्तरला 'हे राजा! मी आपला फार आभारी आहे. मला तूर्त कशाची गरज नाहीं. दिलेला वर मला प्रसंग येतांच मी तो मागून घेईन. तुझ्या कृपेनें मला तूर्त कशाचीहि कमतरता नाहीं.'

या गोष्टीला कांहीं वर्षें झालीं. उज्जयनीहून विहार करीत करीत अकंपनाचार्यमुनी आपल्या सातशें शिष्यांसह हस्तिनागपुराच्या राजोद्यानांत येऊन उतरले. बलीला ही वार्ता समजली. 'त्याचा त्यांचेवर राग होतांच. आपणांला यांच्याच सांगण्यावरून उज्जयनींतून हांकालून देण्यांत आलें व आपली निर्भत्सना करण्यांत आली. आतां पाहूं येथून ते आपणांस हांकालून लावतात कीं, आपण त्यांना हांकालून लावतो तें. आतां चांगलेच आपलें हातीं सांपडलें. चांगलांच सूड उगविला पाहिजे.' असा विचार करून तो तात्काळ राजाकडे गेला. त्यानें राजास आपल्या पूर्वींच्या वराची आठवण करून दिली. व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणाला आतां मला वराप्रमाणें मी मागतो तें मला द्यावें. त्यानंतर राजा म्हणाला ‘ बली, तुला जें कांहीं हत्ती, घोडे वगैरे जी कांहीं संपत्ती लागेल ती किंवा कांहीं जाहागिरी पाहिजे असेल ती मागून घे.’ तेव्हां तो उत्तरला ‘ राजा! मला यांपैकीं कांहींच नको आहे! आपण आपलें राज्य फक्त मला सात दिवसच द्यावें, आणि हीच माझी मागणी आहे.’ राजास बलीच्या कपटाची जाणीव नव्हती व त्याचे उपकारांचें ओझें त्याचेवर होतें आणि त्यांतून वचनबद्ध झाला असल्यामुळें तो कांहींहि एक चकार शब्द बोलला नाहीं. त्यास सात दिवसांसाठीं राज्य कारभार सोंपवून तो अंतःपुरांत जाऊन राहिला. बलीला आपला सूड उगविण्यास पूर्णपणें फावलें. त्यानें तात्काळ मुनीच्या चोहोंबाजूला यज्ञशाला तयार करविल्या. भटभिक्षुकांना पाचारण केलें. आणि मोठमोठे यज्ञ सुरूं केले. यज्ञकुंडांत ब्राह्मणांकडून मोठमोठे रेडे, बकरे वगैरे जीव होमण्यास सुरूवात केली. पशूंना बली देतांना होणारे करुण रुदन मुनीच्या कर्णपटलांवर पडून त्यांना उपसर्ग होऊं लागला. जिकडे तिकडे त्या यज्ञकुंडाचा धूर पसरल्यामुळें मुनींना त्यापासून त्रास होऊं लागला. दशदिशा दुर्गंधानें भरून गेल्या. मुनींना भयंकर त्रास होऊं लागला. पण तो त्यांनीं शांत चित्तानें सहन करण्यास सुरूवात केली आणि जोपर्यंत उपसर्ग होत राहील तोपर्यंत आहार-त्यागाचा नियम घेऊन ते कायोत्सर्गानें ध्यान करूं लागलें.

इकडे मिथिला नगरीत विष्णुकुमाराच्या गुरूना आकाशाकडे पाहात असतां श्रवण नक्षत्र व नक्षत्रमालिका कंपायमान होत असतांना दिसल्या. तें दृश्य पाहून ते आपल्या शिष्यांना म्हणाले

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'कोठेंतरी महामुनीना घोर उपसर्ग होत असला पाहिजे. नव्हे, होत आहे.' गुरुमहाराजांचें भाषण ऐकून पुष्पदंत क्षुल्लक म्हणाला "आचार्यवर्य! कोणास व कोठें उपसर्ग होत आहे हें आपण आपल्या दिव्य ज्ञानानें जाणून सांगा म्हणजे तो उपसर्ग दूर करण्याचा प्रयत्न करूं.' तेव्हां विष्णुगुरूंनीं उत्तर दिलें. 'शिष्य! पद्मकुमार राजाच्या बली वगैरे चार मंत्र्यांनीं अंकपनाचार्य व त्याच्या संघाला उपसर्ग देण्यास सुरूवात केली असून तो उपसर्ग वैक्रियिकऋद्धिधारी मुनीशिवाय टळणारा नाहीं. ही ऋद्धि विष्णुकुमार मुनीनांच प्रांप्त झालेली आहे आणि तेंच हा उपसर्ग निवारूं शकतील. तरी तात्काळ त्यांना जाऊन कळीव.' विष्णुकुमारमुनी त्यावेळीं धरणीधरपर्वताच्या गुहेंत तपश्चर्या करीत होते. क्षुल्लक पुष्पदंत त्वरित तेथें गेला. त्यांना वंदन करून त्यानें सारी हकिकत सांगितली. व म्हणाला 'महाराज, आपणांशिवाय कोणाचेंहि हातून हा उपसर्ग दूर होणार नाहीं. कारण आपणच वैक्रियिक ऋद्धीचें धारक आहांत. आपणांसच ती ऋद्धि प्राप्त झालेली आहे. तरी आपण येऊन तो उपसर्ग दूर करावा.' क्षुल्लकाचे तोंडची हकिकत ऐकून मुनीवर्यांना मोठें आश्चर्य वाटलें. कारण त्यांना आपणांस ऋद्धि प्राप्त झाल्याचें माहितच नव्हतें. तेव्हां ती अजमावून पाहाण्यासाठीं सहज त्यांनीं आपला हात लांबविला तो इतका लांबला कीं, ती गुहा छेदून तो बाहेर पडला. हल्लीहि ती गूहा भग्नावस्थेंत आहे. नंतर ते उपसर्ग दूर करण्यास तयार झाले व हस्तिनागपुरास आले. प्रथम पद्मकुमारास भेटले. कारण पूर्वाश्रमीचा तो त्याचा भाऊ होता. त्यास भेटून म्हणाले, 'राजा, आपल्या कुलाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लांछनास्पद अशी गोष्ट आरंभिली आहेस, हें कांहीं उचित नाहीं. असलें दुष्कृत्य अद्यापपावेतों आपले कुलांत कोणी केलेलें नाहीं. तूं हें काय आरंभिलें आहेस ? तूं नीतीधर्मज्ञ ! तुला ही कृति शोभत नाहीं. जिनधर्मभूषण आपण यामुळें तुझ्या राज्याचा, देशाचा आणि स्वतः तुझा नायनाट होईल. तरी तूं हा प्रकार आवरतां घे. सत्पुरुषांना त्रास दिल्यानें रौरव नरकांत पडावे लागेल याचा विचार कर. सावध हो.' विष्णुकुमारमुनींचें भाषण ऐकून राजास अतिशय वाईट वाटलें. पण वचनबद्ध झाल्यामुळें त्याचा उपाय चालण्यासारखें कांहींहि नव्हतें. तो मुनींना म्हणाला, ' मुनीवर्या आपलें म्हणणें मला सर्वस्वी मान्य आहे. पण बलीच्या वचनांत गुंतल्यामुळें तो सध्यां राज्यावर आहे. माझें कांहीं एक चालण्यासारखें नाहीं. नंतर त्यानें त्यांना आपली मागील सर्व हकिकत सांगितली. आणि म्हणाला:—

" सकृज्जल्पंति राजानः सकृज्जल्पंति साधवाः ।
सकृत्कन्या प्रदीयंते । त्रीण्येत्तानि सकृत्सकृत ॥

राजे लोक एकदांच बोलतात. साधू एकदांच बोलतात; एकदांच कुमारिकेचीं लग्नें होतात. नव्हे हीं तीन्हीं कार्यें एकदांच होत असतात. तेव्हां मला आतां बोलतां येत नाहीं. कळत असूनहि फसल्या सारखें झालें आहे. पण वचनास बाध न येऊं देणें आपलें कर्तव्य आहे.

मुनी येथून परत फिरले. त्यांनीं वामनाचें रूप धारण केलें. व ते होमहवनाचें जागीं येऊन दाखल झाले. ब्राह्मण मुखानें वेदमंत्र उच्चारीत होते व हातांनीं माला फेरित होते. बली होमाच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सभास्थानीं बसला होता. त्यांनीं तेथें येऊन बलीला तीन पाऊलें जागेची भिक्षा मागितली. बलीनें मोठ्या आनंदानें आपणांस तीन पाऊलें जागा दिली, असें सांगितलें व त्यासाठीं हातांतून उदक सोडलें. तेव्हां मुनीनीं आपलें शरीर वैक्रियिकऋद्धीच्या योगानें मोठें करून एक पाय मेरुपर्वतावर तर दुसरा पाय मानुषोत्तर पर्वतावर ठेवला. आणि तिसरा अधांतरीं लटकत ठेवला. नंतर बलीकडे वळून म्हणाले, ' बोल ! हा तिसरा पाय कोठें ठेवूं ? तीन पाऊलें जमीन देण्याचें वचन दिलेंस दाखीव, ती कोठें आहे ? हा प्रकार पाहून किन्नर खेट घाबरून गेले. त्यांनीं निरनिराळ्या सुवर्णकलशांनीं त्यांची पूजा, आराधना करण्यास सुरुवात केली. यज्ञयागाचा धुव्वा उडविला आणि मुनीचा उपसर्ग दूर केला. बली वगैरे मंत्र्यांच्या मुसक्या बांधून त्यांच्या अंगांस राख फांसून त्यांची गाढवावरून धिंड काढली ! नंतर वामनांना आपला तिसरा पाय आंखडता घेण्याविषयीं देव विनवूं लागले. घोषा, सुघोषा, महाघोषा, या तीन वीणांच्या सुरेल गोड आवाजानें व आपल्या सुस्वर गाण्यांनीं त्यांची आराधना केली. तेव्हां आपला पाय परत घेऊन ते त्वरेनें विजयार्द्धपर्वतावरील सिद्धकूटजिनालयाकडे निघून गेले. देवहि आपल्या स्थानाकडे जाण्यास निघाले. जातांना त्यांनीं त्या वीणा विद्याधरांना देऊन टाकल्या. विद्याधरांनीं त्या वाजवून स्तुति स्तोत्रें गायिलीं व तेहि निघून गेले.

या प्रकारें अकंपनाचार्य मुनीवरील उपसर्ग दूर झाला. नंतर राजा पद्मकुमारानें मंत्री बली वगैरे सर्व परिवारांसह अकंपनाचार्य मुनीवरांकडे जाऊन क्षमा याचली. त्यांचें पूजन केलें. हा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अतिशय पाहून कित्येकांनीं महाव्रतें तर कित्येकांनीं श्रावकत्व पतकरलें. कित्येक जैनधर्माची प्रशंसा करूं लागले तर कित्येकांनीं जिनधर्माची दीक्षा घेतली. उपसर्ग सहन केल्यानंतर अकंपनाचार्य मुनीनीं घोर तपश्चरण मोक्षपदाची प्राप्ती करून घेतली.

नंतर विष्णुकुमारांनीं आपल्यावरील दोष टाळण्यासाठीं गुरूजवळ आलोचना केली व तपश्चरण करून त्यांनींहि शेवटीं मोक्ष प्राप्ति करून घेतली. या सातशें मुनींनां त्यांच्या उपसर्गांपासून वांचविल्यामुळें त्या दिवसाची पुण्य स्मृति म्हणून रक्षाबंधनाच्या नांवांखालीं तोच दिवस साजरा करण्यांत येत असतो. अजूनहि ती रूढी कायम आहे. पण फक्त परधर्मियांकडून हातांत रेशमी दोरा बांधून घेण्यापलिकडे कोणीहि त्याचें महत्त्व अधिक समजत नाहीं. हा कालाचा व परधर्मियांच्या संस्काराचा परिणाम होय. मूळांत सत्य कोणतें हें वरील कथेवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. अशा प्रकारें विष्णुकुमारांनीं जैनधर्मीय मुनीवरांची रक्षा करून आपलें नांव जगांत अजरामर करून ठेवलें आहे. त्याचप्रमाणें प्रत्येकांनीं कांहींना कांहीं तरी जैनधर्मप्रसाराचें—रक्षेचें—कार्य त्या सुदिन दिवशीं त्या थोर पुरूषांची स्मृति म्हणून करावयास पाहिजे. यामुळें अष्टांगांपैकीं एका वात्सल्यांगाचें पालन केल्याचें श्रेय लागणारें आहे.

———

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १२ वी.

प्रभावनाप्रख्यात वज्रकुमार अथवा वैरकुमार मुनी.

पूर्वी नागपुरांत नाग नांवाचा राजा राज्य करीत असे. त्याची भार्या बालश्री अत्यंत सुंदर होती. ह्या नरपतीचा रुद्र नांवाचा पुरोहित होता. त्याची भार्या सोमिल्ला सुभूतीची बहिण होती. त्याचा मुलगा सोमदत्त अतिविद्वान्, सर्वशास्त्रशस्त्रविद्या पारंगत होता. आपल्या विद्वत्तेमुळें तो सर्वांचा चाहता बनला होता.

अहिच्छत्रपुरीचा राजा दुर्मुख नामक होता. त्याची राणी दुर्मुखी कलाकोविद व गुणज्ञ होती. याच नगरींत सोमिल्लेचा भाऊ सुभूति राहात असे. त्याचाहि व्यवसाय पुरोहितपणाचा होता. तो राजाचा पुरोहित होता. त्याच्या भार्येचें नांव काश्यपी व मुलाचें नांव सोमभूति होतें. यज्ञदत्ता नामक त्याची एक बहिण चतुर, शाहणी, कलासंपन्न, गुणी व रूपलावण्य संपन्न होती.

पुढें कांहीं दिवसानंतर सोमदत्त अहिछत्रपुरास मामाच्या घरीं आला. कुशलप्रश्नानंतर त्यानें भोजन केलें. प्रवासाच्या श्रमामुळें तो अगदीं दमून गेला होता. त्या दिवशीं त्यानें पूर्ण विश्रांति घेतली. दुसरें दिवशीं तो आपल्या मामांस म्हणाला ' मामा, आपल्या राजास मला भेटावेंसें वाटतें. तरी आपण मला त्यांची भेट करवा. कारण मला त्यांच्या पदरीं असलेल्या मंत्रिपंडितांबरोबर वादविवादांत उतरावयाचें आहे. ' सुभूतीला भाचाची योग्यता, विद्वत्ता माहित होती. त्याचें मनांत द्वेष उत्पन्न झाला. कदाचित् आपण याची आणि राजाची भेट करून दिल्यास हा आपल्या विद्वत्तेनें त्यास पूज्य होईल. मग आपली प्रतिष्ठा राहाणार नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या विचारांनें घेरल्यामुळें विचारलेल्या प्रश्नास त्यानें उत्तर दिलें नाहीं. सोमदत्तानें मामाचा भाव जाणला. त्यानें आपण स्वतः प्रत्यक्षपणें राजास भेटण्याचें ठरविलें. ओळखीशिवाय राजदरबारांत प्रवेश मिळणें कठीण म्हणून त्यानें वेड्याचें सोंग घेतलें व राज-वाड्यांत प्रवेश करून घेतला. राजा त्यावेळीं राजसभेंत आपल्या मंत्री वगैरे परिवारांसहित बसला होता. त्यास अचानकपणें तेथें आलेला पाहून औपचारिकपणें आपण कोण ? कोठून आलांत ? म्हणून राजानें विचारलें. तेव्हां सोमदत्त नम्रपणें राजास म्हणाला 'हे राजा ! मी हस्तिनापुराचा रहणारा, माझें नांव सोमदत्त, तुझ्या दरबारीं कोणी शस्त्रशास्त्रकोविद असतील तर मला त्यांच्याशीं वादविवाद करण्याची-शस्त्रशास्त्र परीक्षेंत उतरण्याची-इच्छा आहे ' हें त्याचें उत्तर ऐकून सभेंत बसलेल्या राजपंडितांनीं त्याचें आव्हानन स्वीकारलें. पण सोमदत्तापुढें कोणाचाहि इलाज चालेना. त्यानें त्यांना धनुर्विद्येत, शास्त्राच्या वादांत सहजासहजीं जिंकलें. त्याची विद्वत्ता पाहून राजा अति संतुष्ट झाला. त्यानें त्यास महामंत्र्याचें पद दिलें. सुभूतीस हा वृत्तांत ऐकून आनंद झाला. त्यानें यज्ञकेशीशीं त्याचें लग्न लावून दिलें. लग्नोत्तर तें दांपत्य आपला काळ सुखानें घालवूं लागलें. याप्रमाणें सुखानें संसार करीत असतां त्यांच्या संसारवृक्षास फळ लागण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. याज्ञिकेला गर्भ राहिला. ती दिवसेंदिवस कृष दिसूं लागली. चेहरा निस्तेज पडला. एकदां सहज ते दोघे आपल्या महालांत बसले असतां सोमदत्तानें विचारलें प्रिये ! लाडके ! तूं अलिकडे अशी दुःखी, कष्टी कां दिसतेस ? तुला होतें तरी काय ? ती उत्तरली नाथा ! मला डोहाळे लागले असून अलिकडे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मला आम्रफल खाण्याची इच्छा होऊ लागली आहे.' वास्तविक ते दिवस पावसाळ्याचे होते. सोमदत्ताला मोठा विचार पडला. आंबे मिळाले तर शोधून पहावे म्हणून तो घराबाहेर पडला. गांवाजवळ नदीतीरांवर असणाऱ्या आंबराईत तो आला. प्रत्येक वृक्ष बारकाईनें तो न्याहाळून पाहूं लागला. पण त्यास कोठेंहि आम्रफल दिसेना. शेवटीं एका वृक्ष्याकडे त्याचें लक्ष्य गेलें. तेथें एक दिगंबरमुनी ध्यानस्थ वसलेले दिसले. तें झाड फळांनीं अगदीं लकडून गेलें होतें. तें दृश्य पाहून तो आश्चर्यानें चकित झाला. आंबे मिळाले म्हणून त्यास आनंद झाला. त्यानें कांहीं आंबे तोडून घेतले व मनुष्याकरवीं घरीं पाठवून दिलें. हा सारा मुनींच्या तपाचा प्रकार. हें जाणून त्याचेविषयीं त्याचे मनांत आदर उत्पन्न झाला व त्यानें मुनीना प्रदक्षिणा घालून नमस्कार केला व मुनीमुखांतून धर्म श्रवण करण्यासाठीं तेथें बसला. अगोदरच मुनींविषयीं त्याचें मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला होता. त्यांतून धर्मप्रवचनानें आपलें काम केलें. त्याचे मनावर संसाराच्या निःसारतेचा परिणाम झाला. तो विरक्त बनला. तात्काळ त्यानें मुनीजवळ संसारार्णवतारिणी दीक्षा ग्रहण केली. पुढें ते मगधदेशांतील सोमार गांवीं विहार करीत करीत आले. तेथें सोमदत्त मुनींनीं आगमाचें परिपूर्ण ज्ञान करून घेतलें. तदनंतर ते एकटेंच नाभिपर्वतावर जाऊन घोरतपश्चरण करीत राहिले.

इकडे याज्ञिका प्रसूत झाली. तिनें एका दिव्य मुलास जन्म दिला. सोमदत्त घरीं अद्याप पावेतों आलेलें न पाहून तिला चिंता उत्पन्न झाली. पुढें सोमदत्ताच्या दिक्षेची वार्ता तिला समजली. सोमत्ताचा राग आला. त्याला ती दोष देऊं लागली. नंतर आपल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बांधवासह मुलास बरोबर घेऊन सोमदत्ताच्या शोधास निघाली. शोध करीत करीत सोमदत्त ध्यानस्त होते त्या पर्वतावर ते सर्व आले. त्यांना पाहून तिच्या अंगाचा भडका उडाला. ती हवे ते टाकून त्यांना बोलूं लागली. शेवटीं त्यांच्या चरणांजवळ त्या लहान अर्भकास लोटून ती आपल्या बांधवांसह परतली. ती दुःखातिरेकामुळें अगदीं निष्ठूर बनली. पण कितीहि केलें तरी तें स्त्रीचें हृदय! रागाच्या आवेशांत हा प्रकार घडून गेला. मुनींचें ध्यान सरलें. त्यांना मोठी चिंता उत्पन्न झाली. त्यांनीं जोपर्यंत हा उपसर्ग दूर होणार नाहीं तोपर्यंत आहार पाण्याचा, शरीराचा त्याग असो; अशी प्रतिज्ञा केली व पुनः ते ध्यानस्थ झाले.

इतक्यांत तिकडून दिवाकर—देव विद्याधर आपल्या भार्येसह मुनींचें दर्शन करण्यासाठीं तेथें आला. कोणीतरी दुष्टानें मुनीना उपसर्ग देण्याच्या हेतूनीं हें कृत्य केलें असें वाटून त्यास विषाद वाटला. त्यानें मुलास उचलून घेतलें. मुलाचें दिव्य रूप पाहतांच त्याच्या मनांत प्रेम भावना उत्पन्न झाली. त्यानें तात्काळ तें मूल आपल्या प्रियेच्या स्वाधीन केलें. त्यांनाहि संतति नव्हती. तेव्हां असलें दिव्य पुत्ररत्न पाहून कोणास बरें आनंद वाटणार नाहीं. नंतर त्यांनीं भक्तिभावानें विधिपूर्वक मुनींची पूजा केली. त्याच ठिकाणीं मुलाचा नामकरण विधि केला. त्याचें नांव वैरकुमार ठेवलें. मुनीनां नमस्कार करून ते आनंदी जोडपें आपल्या नगरीस परतलें. मुलाचें उत्तम प्रकारें पालनपोषण करूं लागलें. जसजसें त्याचें वय वाढूं लागले तसतसें त्याचें गुण तेज फाकूं लागलें. मुलाचें पाय पाळण्यांत दिसतात म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. तो जात्याच सुंदर, मोहक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असल्यामुळें तो सर्वांचा आवडता बनला. पुढें त्यास पांचवें वर्ष लागलें. तेव्हां दिवाकरदेवांनीं त्याच्या विद्याध्ययनासाठीं त्यास आपला मेहुणा विमलवाहन याचेकडे पाठवून दिले.

विमलवाहन हा कनकपुरीचा राजा होता. भाच्याच्या आगमनानें त्यास अत्यानंद झाला. त्यानें त्याच्या शिक्षणाची सोय उत्तम प्रकारें लावली. दिवसेंदिवस तो एकेका विद्येंत पारंगत होऊं लागला. ही त्याची बुद्धिमत्ता पाहून राजास अतिशय आनंद झाला. मोठमोठ्या अध्यापकांकडून त्यास शिक्षण मिळूं लागलें. शेवटीं तो सगळ्या विद्येंत व कलेंत प्रविण झाला. जात्याच सुंदर व गुणी असल्यामुळें तो विद्येनें अधिक शोभूं लागला. त्या नरेंद्राची एक अत्यंत सुंदर इंद्रमती नांवांची कन्या होती. वैरकुमार आपला काळ तिच्याशीं खेळण्यांत घालवी. ते दोघेहि वयस्क होते. इंद्रमती गुणी व रूपवान होती त्या दोघांचें एकमेकांवर प्रेम जडलें. त्यांचें हें एकत्र खेळणें बोलणें त्यांच्या मातापित्यांना आवडलें नाहीं. त्यांनीं त्यांना एकमेकांपासून दूर केलें. त्यामुळें त्यांचें भेटणें बोलणें बंद झालें. असो!

गरुडवेग विद्याधराची कन्या पवनवेगा अत्यंत लावण्यसुंदरी गुणी होती. ती एकदां हीमंतपर्वतावर 'प्रज्ञप्ति' नांवांची विद्या साध्य करून देण्यासाठीं आली. व ध्यानानें ती विद्या साध्य करण्याचा प्रयत्न करूं लागली पण वाऱ्याच्या झोंतासरशीं तिच्या डोळ्यांत बोरीचा कांटा शिरल्यामुळें तिचें चित्त स्थिर होईना. ती बराच प्रयत्न करी पण त्यांत तिला यश येईना. तरीहि ती आपल्या प्रयत्नाची शिकस्त करीत होती. पण जमेना. इतक्यांत वैरकुमारहि आपल्या विद्याधर मित्रासमवेत फिरत फिरत तेथें आला. वैर कुमा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राची नजर त्या विद्याधरीवर गेली. तिला अस्वस्थ स्थितींत पाहून तिच्या डोळ्यांत कांहीं तरी गेलें असावें अशी त्याची कल्पना झाली. तात्काळ तो तिच्याजवळ गेला. त्यानें तिच्या डोळ्यांतील तो कांटा मोठ्या युक्तीनें बाहेर काढला. निःशल्य झाल्यामुळें विद्याधरी एकाग्र झाली. व एकाग्रचित्तानें ध्यान केल्यामुळें तिला विद्या साध्य झाली. विद्या साध्य झाल्यामुळें तिला अति आनंद झाला. नंतर ती वैरकुमारांकडे वळून म्हणाली ' आपल्याच कृपा-प्रसादें करून मला ही विद्या साध्य झालेली आहे. मी आपणांवर प्रसन्न, खूष झाले आहे. आपणांस जें पाहिजे असेल तें मागून घ्या. मी आपले मनोरथ पुरवीन. मजवर आपले फार उपकार झाले आहेत. आपल्या उपकाराची फेड मी कशी करूं ?" ह्या विद्याधरीनें गोड, सुमधुर भाषणानें वैरकुमाराला तिचें वेड लावले. त्यानें ती विद्या तिच्यापासून सात दिवसासाठीं मागून घेतली. पवनवेगेच्या मनांत कुमाराविषयीं प्रेमभाव उत्पन्न झालाच होता. तेव्हां प्रेम काय करणार नाहीं. तिनें मोठ्या आनंदानें विद्या त्यास दिली. पूर्वी दिवाकरदेवाला त्याच्या कनिष्ठ भावानें कपटानें राज्यावरून हाकालून देऊन आपण स्वतः अमरावतीचा राजा बनला होता. तेव्हां दिवाकर-देव राज्यविरहितच होता. वैरकुमाराला ती विद्या प्राप्त झाल्यामुळें तें राज्य हस्तगत करून घेण्याची त्यास प्रबळ इच्छा झाली. त्या विद्येच्या सहाय्यानें त्यानें पुष्कळसें सैन्य तयार केलें. व तो चुलत्यावर चाल करून गेला. उभयपक्षांत तुंबळ युद्ध झालें. युद्धांत वैरकुमारानें आपल्या चुलत्याचा पराभव करून आपलें राज्य परत मिळविलें. नंतर आपल्या पित्यास त्यानें मोठ्या थाटानें वाद्या-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

च्या गजरांत राज्यावर बसविलें. गरुडवेगांस आपल्या प्रियेकडून हीं सारी हकिकत समजली. अर्थात् पवनवेगानें पर्वतांवर घडलेला सारा वृत्तांत आपले आईस निवेदन केला होता. त्यांनाहि आनंद झाला. त्यांनीं मोठ्या थाटानें वैरकुमाराशीं आपल्या कन्येचें लग्न लावून दिलें. आपल्या प्रेमळ नूतन पत्नीच्या सहवासांत वैरकुमार आपला काळ श्वशुर घरीं घालवूं लागला. कांहीं काळ लोटल्या-नंतर तो आपल्या श्वशुराचा निरोप घेऊन अमरावतीस परत आला.

एकदां घरांत कांहीं क्षुल्लक कारणावरून माता जयश्री त्यास टाकून बोलली. त्याचा पराक्रम, कीर्ति, तिला सहन होत नव्हती हेंच त्याचें वास्तविक कारण होतें. मागेंपुढें आपल्या मुलाला राज्य न मिळतां हाच पुढें राजा होणार या भीतीनें तिच्या मनांत द्वेषाग्नि धुमसत होता. तो तिनें बाहेर यावेळीं सोडला. वैरकुमाराला त्याची आंच तीव्रतर जाणवली. तात्काळ त्यानें दिवाकर देवांस जाऊन विचारलें तात ! मी आपला मुलगा नव्हें कां ? जें कांहीं खरें असेल तें मला निवेदन करा. दिवाकरदेवांना वाईट वाटलें. असला गुणी मुलगा आतां आपल्याला अंतरणार हें पाहून त्याचें हृदय प्रेमानें भरून आलें. त्यांनीं हकिकत सांगण्याची टाळाटाळी केली. वैरकुमाराच्या आग्रहापुढें त्यांचा नाईलाज झाला. त्यांनीं सारी पूर्वींची हकिकत सांगितली. तिचा परिणाम जयश्रीस पाहिजे होता तसा झाला. त्याच्या हृदयांत उदासिनतेचें साम्राज्य माजलें. मनानें उचल खाल्ली. तो म्हणाला 'आतां आपण मुनीकडे जाण्याची मला परवानगी द्या. मला या संसाराचा वीट आला आहे तेव्हां येथें राहण्यांत काय उपयोग ? तरी मजवर कृपा करून मला परवानगी द्या.' दिवाकर-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देवाच्या जीवांवर आलें. त्यांनीं त्याला निश्चयापासून परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. पण वैरकुमार आपल्या निश्चयापासून रेसभरहि ढळला नाहीं. माता, बंधू, इष्टमित्रांनी देखील त्यास बरेंच समजावलें. पण एक ना दोन. शेवटीं सर्व थकले. नंतर सर्व विद्याधर त्याचे बरोबर मुनीमहाराजाचें दर्शनास जाण्यास विमानांतून निघाले.

मथुरेजवळील क्षंदिका नांवाच्या गुहेंत सोमदत्त मुनी तपश्चर्या करीत होते. तेथें ते विद्याधर वैरकुमारांबरोबर आले. भक्तिभावानें मुनींना नमस्कार करून यथास्थानीं बसले. नंतर दिवाकरदेव विनम्रभावानें त्यांना म्हणाले 'महाराज ! पूर्वीं आम्हीं आपलें दर्शनासाठीं आलों होतों. त्यावेळीं आपल्या चरणांजवळ पडलेल्या नंदनाला आम्हीं घेऊन गेलों होतों. आतां त्यास सुविद्य करून परत आपल्या चरणांजवळ सोडण्यासाठीं आलों आहोंत. तरी आपण त्यास पदरांत घ्या.' यावर मुनींनीं तथास्तु म्हणून त्यांना धर्माशीर्वाद दिला. नंतर वैरकुमार हात जोडून नम्रपणें म्हणाला, हे स्वामी ! 'मला या संसाराचा वीट आला आहे. तरी आपण मला या संसारसागरांतून पैलतीरास नेणारी व क्रमानें स्वर्गमोक्षाचें सुख प्राप्त करून देणारी दैगंबरी दीक्षा द्यावी. मुनींनीं त्यास मुनीधर्माचें ज्ञान करून दिलें. नंतर त्यास दिक्षा दिली. हा विधि झाल्यानंतर दिवाकरदेवादि विद्याधरांनीं मुनीमहाराजाची यथाविधि पूजा केली व ते विमानांत बसून अमरावतीस परत गेले.

धनधान्यसंपन्न विख्यात अशा मथुरा नगरींत राजा पूतिगंध राज्य करीत होता. तो अति विद्वान्, नीतिमान् गुणी व विद्वानांचा चाहता होता. त्यानें आपल्या पराक्रमाचा ध्वज कायम फडकत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ठेवला होता. त्याची राणी उर्मिला रूपलावण्यसंपन्न व गुणी होती. तिचें आचरण नेहमीं धर्मानुसार असे. आपल्या आयुष्याचा बहुतेक काळ ती धर्म ध्यानांत समक्त्वाचें पालन करण्यांत घालवीत असे.

याच नगरींत सागरदत्त नांवाचा एक श्रेष्ठी राहात असे. त्याच्या भार्येचें नांव समुद्रदत्ता होतें. त्याची मुलगी दरिद्रा. दरिद्रा जन्मास आली तेव्हांपासून त्यांच्या घरण्यास उतरती कळा लागली. दिवसेंदिवस त्याचें धन नष्ट होऊं लागलें. शेवटीं ते इतके निर्धन बनले कीं, आपली उपजीविका करण्याची त्यांना मारामारी पडूं लागली. याचा परिणाम सागरदत्ताच्या मनावर झाला. दिवसेंदिवस तो खंगत जाऊन त्यांतच मरण पावला. कर्तासवर्ता गेल्यामुळें त्यांच्या उपजीविकेचें साधन तुटलें. शेवटीं दरिद्रेवर भीक मागून आपली व आपल्या आईची पोट भरण्याची पाळी आली. दुःखें येऊं लागलीं म्हणजे एकामागून अशीं सारखीं येतात. दरिद्रेच्या जन्मांपासून दारिद्र्य तिच्या आईबापांच्या पाठी हात धुवून लागलें. पोटाची खळगी भरण्यासाठीं ती गांवांत फिरून भिक्षा मागून पोट भरूं लागली. अर्थात् तिला दुसऱ्याचीं उष्टी शितें खाऊन पोट भरावें लागे व वेळेवर पोटभर देखील अन्न मिळत नसे. कधीं उपासमार तर कधीं पोटभर अशी दुर्धर स्थिती त्यांची झाली. दारिद्र्य हात धुवून पाठीस लागलें होतें. दारिद्र्याचें हाल कुत्रा खाईना.

या रीतीनें दारिद्र्यावस्थेंत दरिद्रा आपला काल व्यतीत करीत असतां नंदन व अभिनंदन नांवाचे दोन मुनी आहारासाठीं मथुरेंत आले. दरिद्रिका उच्छिष्ट खात फिरत होती. तिची ती केविलवाणी स्थिति पाहून कनिष्ट मुनी अभिनंदनास म्हणाले! 'पहा, एवढ्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अल्प वयांत तिला हें असें दुःख भोगावें लागत आहे. डोक्याचे केस सारे विसकटलेलें आहेत. अंगास धड वस्त्र देखील नाहीं. खाण्यासाठीं सारा गांव पालथा घालावा लागतो आणि शेवटीं लोकांच्या उष्ट्या पत्रावळीवरच काम भागवून न्यावें लागतें. दुर्दैव विचाराचें ! कर्माची गति अघटित आहे ? अभिनंदन मुनी दिव्य-ज्ञानी होते. नंदनाचें भाषण ऐकून ते म्हणाले नंदना ही मुलगी दरिद्री दिसते खरी पण हीच येथील राजाची आवडती पट्टराणी होणारी आहे.' हा त्या उभयतांचा संवाद भिक्षेसाठीं रस्त्यांतून जाणाऱ्या बौद्धभिक्षूच्या कानीं पडला. 'जैन साधूची वाणी कधींच खोटी ठरत नसते. याचा त्यांस प्रत्यय होता. तेव्हां त्यानें आपल्या भावी इच्छा सफळ होण्याच्या आशेनें तिला आपल्या मठांत नेले. उत्तम प्रकारें तिला स्नान घालून सुंदर कपडे घालण्यास दिलें. गोडगोड पदार्थ खाण्यास दिले. भोजनोत्तर मोठ्या प्रेमानें तिला विचारलें बाळे तूं कुणाची ? तुला कोण कोण आहेत ? दरिद्रा उत्तरली ' मला या जगांत आतां एकट्या आईवांचून कोणी नाहीं. नंतर तो तिला घेऊन सागरदत्तेकडे आला सागरदत्ता घरांत बसली होती. तिला पाहून तो म्हणाला अक्का ! ही माझी भाची आहे. विनाकारण तूं आपलें दिवस कां असे दुःखांत घालवितेस ' चल, माझ्या आश्रयाला येऊन राहा. मी तुमच्या दोघांचाहि परिपोष करीन. तूं मला माझ्या बहिणीप्रमाणें होय. नाहीं म्हणूं नकोस.तुझी ही दशा मला पाहवत नाहीं. तरी कृपाकरून मजजवळ येऊन रहा ! तुला व तुझ्या मुलीला कोणत्याही प्रकारें कमतरता पडूं देणार नाहीं. सागरदत्ता अगोदरच दारिद्र्यानें गांजून गेली होती. तिला हा परमे-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्वरच भेटल्यासारखें वाटलें. पण ती एकदम होय म्हणाली नाहीं. तिनें आपल्या सर्व बांधवांचा विचार घेतला. आणि नंतर ती त्याच्या बरोबर जाण्यास तयार झाली. ती मठांत येऊन राहूं लागली. भिक्षू दरिद्रतेची फार काळजी घेई. तिला कोणीतीहि उणीव भासूं देत नसें. तिला रोज रोज सुगंधी तेलें लावण्यास देई. वमनकारक औषधी पाजून तो तिचा कोठा साफ ठेवी. रुचकर, पथ्यकर. पौष्टिक पदार्थ तिला खाण्यास देई त्यामुळें तिचें शरीर दिवसेदिवस वृद्धिंगत होऊं लागलें. मुळचीच सुंदर त्यांत खाण्यापिण्याचे सौख्य लाभल्यामुळें ती अत्यंत तेजस्वी दिसूं लागली. बाल्यावस्था संपून तिनें तारुण्यांत प्रवेश केला. “ प्राप्ते षोडशे वर्षे रासभ्यप्यप्सरा भवेत ” आणि ती त्यांत बोलून चालून सुंदर. त्यामुळें ती अधिक खुलून दिसूं लागली.

एकदां ती हिंदोळ्यावर बसून झोंके खातखात आपल्या मधुर सुरेल आवाजांत गात होती. तिकडून राजा आपल्या चतुरंग सेनेसह जात होता. त्याच्या कानीं ते गोड आलाप पडले. तो गाण्यानें मुग्ध होऊन गेला. कोण गाणें गाते म्हणून तो आजुबाजूस पाहूं लागला. तो त्याच्या दृष्टीस दरिद्रेचे रूप पडलें. तो तिच्या रूपानें वेडा झाला ही किन्नरी कीं खेचरी याचा त्यास उलगडा होईना. त्यांस मूर्च्छा आली. शुद्धीवर आल्यानंतर आपल्याजवळ बसलेल्या लोकांना तो म्हणाला ‘ ती कोणाची मुलगी बरें ! ’ तेव्हां ते म्हणाले ‘ राजा ! ती सुंदरी बौद्धकन्या आहे. नंतर तो अस्वस्थ स्थितींत घरीं परतला. त्याच्या जीवाला चैन पडेनासे झाले. तात्काळ त्यानें आपल्या मंत्रीवर्गास बुद्धधर्माकडे जाऊन मागणी घालण्यास पाठविले. त्यानें मोठ्या खुषीनें अनुमति दिली. प्रथमपासून याच प्रेरणेनें त्यानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या मुलीस सांभाळलें होतें. मग चालून आलेली संधि कोण दवडणार! त्यास आपला कार्यभाग झाल्याचें पाहून आनंद वाटला. एका गोरज मुहूर्तावर त्याचें मोठ्या थाटानें लग्न लागले. विवाहोत्तर राजानें दरिद्रेला सर्व राजांच्या समक्ष पट्टराणी पद दिलें. व दरिद्रेसह तो आपला काळ सुखानें घालवूं लागला.

उर्मिला जिनधर्मभक्त होती. ती आपला काळ धार्मिक प्रभावना करण्यांत घालवीत असे. हें वरतीं सांगितलेंच आहे. पुढें फाल्गुनमास आला. नंदीश्वरपर्व सुरूं झालें. शुद्ध अष्टमीला नित्याप्रमाणें तिनें रथाची मिरवणूक काढण्याची तयारी केली. ही गोष्ट दरिद्रेच्या कानीं आली. तिला ईर्षा उत्पन्न झाली. मी पट्टराणी असतां माझा रथ निघाला पाहिजे. असें तिला वाटूं लागलें. बुद्धधर्मीय बुद्धाभिक्षूंच्या मठांत ती वाढल्यामुळें बुद्धधर्मानुयायी बनली होती. तात्काळ तिनें उर्मिलेस कळविलें कीं, तसें होणें नाहीं. माझ्या बुद्धधर्माचा रथ अगोदर गांवांतून फिरेल नंतर तूं आपला मणिकांचननिर्मित जिनरथ गांवांतून फिरव.' आपल्या धार्मिक कार्यांत हें अकल्पित विघ्न उपस्थित झालेलें पाहून उर्मिलेला अतिशय वाईट वाटलें. पतिराजांकडे दाद मागण्याची तिला आशाच नव्हती. कारण राजा दरिद्रेच्या प्रेमानें वेडावून गेला होता. उर्मिलेच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिलें. पण तिनें धैर्य सोडलें नाहीं. तात्काळ ती सोमदत्त मुनीकडे गेली. त्यांना नमस्कार करून म्हणाली 'महाराज! आजच्या रथाच्या मिरवणूकीला विघ्न आलें आहे. तेव्हां आपण तें आपल्या मंत्रतंत्राच्या साहाय्यानें दूर करावें. मुनी वैरकुमारांकडे वळून म्हणाले, 'कुमारा! आपल्या प्रभावानें तूं हा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उपसर्ग दूर कर ! भगवानाच्या रथास विघ्न आलें आहे. तेव्हां जिनधर्मप्रभावना करणाऱ्यांना मदत करणें व आपण जिनधर्मप्रभावना करणें हें आपलें कर्तव्य होय. तरी आपल्या मंत्रतंत्रांच्या, विद्येच्या सहाय्यानें तें संकट दूर कर !' गुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानून तात्काळ वैरकुमार अमरावतीस आला. दिवाकरदेवांदि इतर विद्याधरांनीं त्यास नमस्कार केला. त्यांचें कुशलोत्तर विचारून वैरकुमारानें मिथिला नगरींत जिनेश्वर पूजेंत विघ्न आल्याचें सांगितलें. सर्वांना क्रोध चढला. ते सगळे सोमदत्त मुनीकडे प्रथम गेले. त्यांना नमस्कार करून ते मिथिला नगरीस आले. त्या नभश्चरांनीं सारें आकाश भरून गेलें. त्यांनीं बुद्धांचा रथ मोडून तोडून टाकला. त्यामुळें राजा वगैरे भीतीनें गांगरून गेले. नंतर सुवर्णमंडित, रत्नजडित, ऊर्मिलेच्या रथाची मिरवणूक मोठ्या आनंदानें वाद्याच्या गजरांत सर्व गांवांतून मिरविण्यांत आली. स्वच्छ जलांनीं, दुधानीं, तुपानीं, दहि वगैरे पदार्थांनीं पूजा करण्यांत आली. सुगंधित वस्तूंचा लेप करण्यांत आला. पंचवर्णांच्या पुष्पांनीं वृष्टि करण्यांत आली. देव मृदंग वगैरे वाद्यें वाजवून जिनाची स्तुति गाऊं लागले. पंचाचार पाळणाऱ्या, पंचेंद्रियनिग्रही योग्यांना त्यांनीं नमस्कार केला. नंतर सर्व लोकांना ओरडून जो कोणी जिनधर्माच्या कार्यांत विघ्न आणील त्यांना याप्रमाणें आम्हीं कडक शिक्षा करूं असें सांगितलें. राजांनीं व नगरवासीयांनीं मुनींना नमस्कार केला. नंतर वैरकुमारांना वंदन करून देव विमानांत बसून आपल्या नगरीस निघून गेले. हा जिनधर्माचा प्रभाव पाहून दरिद्रीकेनेंहि आनंदानें जिनधर्माचा स्वीकार केला, तर कित्येकांनीं श्रावकधर्म ग्रहण केला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्मकथा सांगणारा ज्ञानी, निमित्तज्ञ, वादी, नैमित्तिक व तपस्वी हे पांच पूजनाचे उद्भासक मानले आहेत. वैरकुमारमुनींनीं ज्याप्रमाणें धर्म प्रभावना केली त्याप्रमाणें धर्मेच्छु लोकांनीं करणें त्यांचें आद्यकर्तव्य होय.

कथा १२ वी.

" श्रद्धाळू विनयंधर राजा "

कुंभीपुरांत श्रीमान् राजा विनयंधर आपल्या प्रेमळ विनयमती राणीसह राज्य करीत होता. ऋषभदास नांवांचा राजश्रेष्ठि होता. त्याची भार्या ऋषभदासी फार प्रेमळ स्त्री होती. संसाराचा गाडा सुखानें हांकीत असतां त्यांना एक पुत्ररत्न झालें. त्याचें नांव जिनदास ठेवण्यांत आलें. जिनदास स्वभावानें ममताळू होता. त्याच्या पूर्व-पुण्याईनें तो जें कांहीं काम हातीं घेत असे त्यांत त्याला यश हटकून येत असे. म्हणून त्यास लोक सिद्धार्थ या नांवानें ओळखीत. विनयंधर राजाला महारोग झाला. त्यामुळें त्यास अतिशय त्रास होई. त्या रोगाच्या वेदनेनें त्यास रात्रंदिवस चैन पडत नसे. पुष्कळशा वैद्यांनीं उपचार केले पण तें सर्व व्यर्थ ठरलें, तेव्हां सिद्धार्थ राजाला एके दिवशीं म्हणाला ' हे राजा, तूं जर माझ्या म्हणण्याप्रमाणें वागशील तर मी तुझा रोग खात्रीनें बरा करीन ! राजाला आनंद झाला. तो उत्तरला ' सिद्धार्था ! तूं माझ्या हितासाठींच सांगत आहेस तेव्हां मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागेन एवढेंच नव्हें तर तूं मला मागशील तर माझें राज्यदेखील तुझ्या हवाली करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. नव्हे जीवित देखील तुला अर्पण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करीन. पण या दुर्धर रोगांतून मला मुक्त कर.' तेव्हां राजाला बरोबर घेऊन तो जिनमंदिरांत आला. जिनबिंबाची स्तुति करून त्यानें मोठ्या वाद्याच्या गजरांत जल, दूध वगैरेनीं महापूजा केली. सर्वौषधी, असें दिव्य गंधोदक राजास प्राशन करण्यास दिलें. राजानें मोठ्या भक्तिभावानें तें प्राशन केलें. एका क्षणांत त्याचा महारोग नष्ट झाला. तो पूर्ण निरोगी बनला. आपल्या रोगनिवारणाचें कारण प्रत्यक्ष पाहिल्यामुळें राजाची जैनधर्मावर दृढश्रद्धा बसली. तात्काळ त्यानें श्रावकाची दीक्षा घेतली व स्वतः जिनाची महापूजा केली. जिनदासाला त्याच्या उपकाराबद्दल शंभर गांवें दान दिलीं. केवळ श्रद्धा ठेवून गंधोदकाचें प्राशन केल्यामुळें सर्व व्याधि नष्ट झाल्या. तेव्हां धर्मामृतपानी साधूंनीं आपले जन्ममरणाचे फेरे चुकविण्यासाठीं आणि मुक्ति प्राप्त करून घेण्यासाठीं श्रद्धेनें धर्माचें सेवन करणें योग्य. त्यांतच त्यांचें कल्याण आहे.

कथा १४ वी.

" स्वनिंदक बुद्धीमती राणी. "

फार प्राचीनकाळची गोष्ट ! वाराणसी नगरींत राजा विशाखादत्त आपल्या कनकप्रभा राणीसह राज्य करीत होता. तेथें विचित्र नांवांचा एक चितारी राहात असे. तो अत्यंत कुशल चित्रकार होता. त्याची मुलगी बुद्धिमती अति सुंदर श्यामवर्णी व चतुर होती. 'विशाल' जिनमंदिरांतील चित्रशाळेंत हा चितारी रोज जाऊन चित्रें काढीत असे. एके दिवशीं बुद्धिमती आपल्या पित्यासाठीं भोजन घेऊन आली. विचित्र त्यावेळीं अति सुंदर एक मयूरपिंछींचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चित्र काढीत होता. तें इतकें सुंदर वठलें होतें कीं, सहज कोणीहि त्यास फसेल ! इतक्यांत राजाहि चित्रशाळेंत आला. मोराची पिंछी समजून ती उचलून घेण्यासाठीं तो खालीं वांकला. तों बुद्धीमतीच्या तोंडून किती हा मूर्ख ! असे सहज उद्गार निघाले. राजाचें तोंड खरकन् उतरलें. त्यास बुद्धीमतीचा राग आला. पण त्यानें तो गिळला.

दुसरा दिवस उजाडला. विचित्र निरस्थाप्रमाणें त्या चित्रशाळेंत येऊन चित्रें काढीत बसला होता. बुद्धीमती नेहमीप्रमाणें भोजन घेऊन आली. राजाला पाहून ती मुद्दाम खोडसाळपणानें म्हणाली, पिताजी ! ‘ उठा ! विलंब लावूं नका. भात मऊ आहे. त्याचें यौवन नष्ट होण्यापूर्वींच आपलें भोजन उरकून घ्या. ’ बुद्धीमतीचें उद्गार ऐकून राजा आश्चर्यानें तिच्या तोंडाकडेच पाहात राहिला. त्यास भाताचें यौवन म्हणजे काय ? आणि तें नाहींसें तरी कसें होतें याचें कोडें पडलें ! त्यानें बुद्धीमतीस विचारलें, भद्रे ! भाताचें यौवन म्हणजे काय ? तेव्हां ती उपहासात्मक रीतीनें हंसून म्हणाली, भाताचें यौवन म्हणजे त्यांतून निघणाऱ्या गरम वाफा, त्यांचा गरम-पणा. आणि एवढी साधी गोष्ट कां तुम्हांला कळूं नये ? मला तर बाई तुम्ही निव्वळ वेडे दिसतां ! ! ’

तिसऱ्या दिवशींची गोष्ट? बुद्धीमतीनें राजाची परीक्षा घेण्यासाठीं म्हणून भिंतीवर चित्रपटाचे पडदे सोडले. ते इतके हुबेहुब रंगविलेले होते कीं, सहज ती कोणी भिंतच आहे असें समजे. नंतर ती राजास म्हणाली पहा, भिंतीवर किती उत्तम चित्र काढलें आहे तें ! राजास खरें वाटलें. त्यानें सहज पडदा एका बाजूनें उचलून पाहिला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो त्यास भिंत चित्रविरहित असलेली दिसून आली. नंतर दुसराहि पडदा उघडला. पण त्यांतही त्याची फसगत झाली. त्याचा चेहरा पाहाण्यासारखा झाला. तेव्हां बुद्धीमती म्हणाली, आपण फारच मूर्ख दिसतां! एवढी साधी गोष्ट देखील आपणास समजूं नये महा आश्चर्य होय. प्रथम दिवसापासूच ती राजाचा पाणउतारा करीत असे. पण राजा शांतपणें हा प्रकार सहन करीत होता. पण आतां त्याचा राग अनिवार झाला. रागानें डोळे लाल झाले. तो खेकसून म्हणाला, 'दुष्टे! चांडाळणी तूं कोणाला बोलतेस! माजून गेली आहेस. तुझी जिभली उपटून हातांत दिली पाहिजे, पण ती शांतपणें राजास म्हणाली, 'राजा, विनाकारण आपण मजवर कां रागावतां? मी आपणांस असें काय बोललें? खरें तेंच सांगितलें. फुकाची स्तुति, वाहवा करणें या गोष्टीं मला आवडत नाहींत. आपल्या घरीं या गोष्टी बोला! मला हें बिलकूल आवडणार नाहीं. कारण मोराचा पिसारा खरा कां खोटा हें तुम्हांला सहज ओळखतां आलें नाहीं. भाताचें यौवन—उष्णता ही साधी गोष्ट कळली नाहीं. आणि माझ्यावरच रागावतां हें काय सत्त्यतेला धरून आहे? राजा तिच्या या स्पष्टोक्तीनें तर स्तंभितच झाला. तिच्या अंगप्रत्यंगाचें निरीक्षण करूं लागला. त्याच्या मनांत तिच्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न झाला. बुद्धीमती जात्याच सुंदर होती. तिची बुद्धीमत्ताहि वाखाणण्याजोगी होती. तें तिचें चातुर्य व रूप पाहून तर राजा वेडावून गेला. तो बेभान झाला. चंदनाचें पाणी मुखांवर शिंपडल्यानंतर कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला. त्यानें विचित्रास तिची मागणी घातली. थोरा घरीं आपली मुलगी पडावी असें कोणांस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटत नसतें ? त्यांतून प्रत्यक्ष राजानें मागणी घातल्यामुळें तर त्यास आनंद झाला. त्यानें मोठ्या आनंदानें मागणीचा स्वीकार केला. लग्नसोहळा मोठ्या थाटामाटानें उरकण्यांत आला. लग्नोत्तर राजानें सर्व राजांच्या समक्ष तिला आपली पट्टराणी बनविलें. 'आतां काय बाई तूं पट्टराणी झालीस म्हणून इतर राजराण्या तिची निर्भत्सना करीत व परत जातांना आणखी त्याचप्रमाणें म्हणत व तिच्या डोक्या-वर चापटचा मारून जात. याप्रमाणें नित्य तिची पूजा होई.' पण बुद्धीमती समजूतदार असल्यामुळें कोणासहि कांहीं बोलत नसे. आपल्या नशीबाला दोष देऊन रडे. व नित्य जिनमंदिरांत जाऊन 'माझ्यासारखी स्त्री जन्मास घालूं नकोस!' म्हणून आत्मनिंदा करी. ह्यामुळें दिवसेंदिवस कृष होत चालली. राजानें तूं अशी खराब कां दिसतेस ? कोणी तुला कांहीं बोललें काय ? कां कोणी त्रास तर देत नाहीं, मला सांग म्हणजे त्याचा मी बंदोबस्त करतो.' ती शांतपणें म्हणे कीं मला कोणीही त्रास देत नाहीं व मला कांहीं-एक होत नाहीं ? कोणी बोलत नाहीं ! पण या उत्तरानें राजाची समाधानी झाली नाहीं. तो तें कारण शोधून काढण्याच्या मार्गास लागला. त्यास चैन पडेना. तेव्हां हा प्रकार काय आहे ? हें पाहा-ण्यासाठीं चित्रशाळेंत तो लपून बसला. नित्याप्रमाणें बुद्धीमती तेथें येऊन जिनापुढें बसून आपल्या दोषांची आलोचना करूं लागली. तितक्यांत राजराण्याही तेथें आल्या. त्यांनीं नेहमींप्रमाणें तिचा उप-हास केला व जातां जातां तिला चापटचा मारल्या. राजा आडून हा प्रकार पाहात होताच. तो तात्काळ पुढें आला. त्यांना आडवून त्यानें दोरीच्या फटकाऱ्यानें चोप दिला. कडक शिक्षा दिली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजानें बुद्धीमतीची पूजा केली व तिला आपल्या हातांतील कंकण अर्पण केलें. तिनें आपली स्वतःची निंदा करून ज्याप्रमाणें पूज्यता प्राप्त करून घेतली तद्वत्तच् साधूंनीं आपली आलोचना--निंदा-करून जगांत पूज्यता प्राप्त करून घ्यावी.

कथा १५ वी.

' प्रियवीरा. '

फार जुनी गोष्ट ! त्यावेळीं दुर्योधन राजा साकेंत नगरींत राज्य करीत होता. त्याच्या राणीचें नांव श्रीधरा होते. त्याच नगरींत एक ब्राह्मण उपाध्याय राहात असे. त्याचें नांव सुमित्र. तो अतिशय विद्वान्, वेदविद्यापारंगत होता. वयानें वृद्ध होता. त्याची स्त्री प्रियवरा तरुण होती. तारुण्याचा बहार नुकताच दरवळूं लागल्यानें ती मोठ्या तोऱ्यानें शृंगार करून गांवांत भटके. उपाध्यायाच्या घरीं अग्निमित्र नांवांचा शिष्य राहात होता. त्याचा व प्रियवरेचा चोरटा संबंध जुळला. फक्त त्याच्या प्रेमांत सुमित्राचा कांटा होता. त्यामुळें त्यांना उजळ माथ्यानें घरांत वागतां येईना. तेव्हां एके दिवशीं दोघांनीं संगनमत करून रात्रीला त्यास मारून टाकलें. नंतर प्रियवीरेनें तें प्रेत डोक्यावर घेऊन त्यावर छत्री झांकली. व स्मशानांत टाकण्यासाठीं चालली. स्मशानांत गेल्यावर तें प्रेत तिनें डोक्यावरून खालीं टाकण्याचा प्रयत्न केला. पण देवतांनीं तिला कुंठित केलें. तें प्रेत कांहीं केल्या खालीं पडेना. आतां आपलें छिद्र उघडकीला येणार म्हणून ती मोठमोठ्यानें रडूं लागली. तेव्हां देवता तिला म्हणाली वये ! तूं आपल्या स्वेच्छा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटत नसतें ? त्यांतून प्रत्यक्ष राजानें मागणी घातल्यामुळें तर त्यास आनंद झाला. त्यानें मोठ्या आनंदानें मागणीचा स्वीकार केला. लग्नसोहळा मोठ्या थाटामाटानें उरकण्यांत आला. लग्नोत्तर राजानें सर्व राजांच्या समक्ष तिला आपली पट्टराणी बनविलें. 'आतां काय बाई तूं पट्टराणी झालीस म्हणून इतर राजराण्या तिची निर्भत्सना करीत व परत जातांना आणखी त्याचप्रमाणें म्हणत व तिच्या डोक्या-वर चापटचा मारून जात. याप्रमाणें नित्य तिची पूजा होई.' पण बुद्धीमती समजूतदार असल्यामुळें कोणासहि कांहीं बोलत नसे. आपल्या नशीवाला दोष देऊन रडे. व नित्य जिनमंदिरांत जाऊन 'माझ्यासारखी स्त्री जन्मास घालूं नकोस!' म्हणून आत्मनिंदा करी. ह्यामुळें दिवसेंदिवस कृष होत चालली. राजानें तूं अशी खराब कां दिसतेस? कोणी तुला कांहीं बोललें काय? कां कोणी त्रास तर देत नाहीं, मला सांग म्हणजे त्याचा मी बंदोबस्त करतो.' ती शांतपणें म्हणे कीं मला कोणीही त्रास देत नाहीं व मला कांहीं-एक होत नाहीं? कोणी बोलत नाहीं! पण या उत्तरानें राजाची समाधानी झाली नाहीं. तो तें कारण शोधून काढण्याच्या मार्गास लागला. त्यास चैन पडेना. तेव्हां हा प्रकार काय आहे? हें पाहा-ण्यासाठीं चित्रशाळेंत तो लपून बसला. नित्याप्रमाणें बुद्धीमती तेथें येऊन जिनापुढें बसून आपल्या दोषांची आलोचना करूं लागली. तितक्यांत राजराण्याही तेथें आल्या. त्यांनीं नेहमींप्रमाणें तिचा उप-हास केला व जातां जातां तिला चापटचा मारल्या. राजा आडून हा प्रकार पाहात होताच. तो तात्काळ पुढें आला. त्यांना आडवून त्यानें दोरीच्या फटकाऱ्यानें चोप दिला. कडक शिक्षा दिली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विख्यात नगर होतें. तेथें सोमदत्त नांवांचा ब्राह्मण राहात असे. तो व्याकरण, छंद, वेदशास्त्र, व कलांचा ज्ञाता होता. त्याची भार्या सोमिल्ला सुंदर व प्रेमळ होती. त्याला वेदस्मृति विशारद अग्निभूति व वायूभूती असे दोन पुत्र होते. त्या भावांचें एकमेकांवर निरतिशय प्रेम होतें.

त्याच नगरींत विष्णुदत्त नांवांचा एक धनाढ्य ब्राह्मण राहात असे. त्याच्या भार्येचें नांव विष्णुश्री. विष्णुश्री, चतुर, सद्‌गुणी होती. विष्णुदत्ताकडून कर्ज घेऊन सोमदत्त व्यापारासाठीं परदेशास जाण्यास निघाला. रस्त्यांतून जात असतां चोरांच्या टोळीनें त्याचे-वर हल्ला करून त्याला लुटलें. सोमदत्ताला मोठी चिंता पडली. तो संसाराला त्रासला. इतक्यांत भद्रबाहुमुनि तेथें आले. त्याना नमस्कार करून त्याचेजवळ सोमदत्तानें दीक्षा ग्रहण केली व तो तपश्चरण करूं लागला.

कांहीं दिवसांनीं सोमदत्तमुनी विहार करीत करीत देवकोट-पुरास आले. विष्णुदत्तास ही खबर कळली. ते रस्त्यांतून जात असतां त्यांना अडवून म्हणाला, ‘ सोमदत्ता, माझें धन दे, आणि नंतर पाऊल येथून पुढें टाक. त्याशिवाय तुला मी हलूं देणार नाहीं. हा प्रकार पाहून गांवांतील कांहीं शिष्टही तेथें गोळा झाले. रिकामटेकड्यांचीं कामें हींच ! थोडें कांहीं दिसलें कीं, ते आपला उद्योग सोडून तेथें जमलेंच म्हणून समजावें. मग सत्त्य कोठलें अस-णार ! ते हा काय प्रकार आहे म्हणून चौकशी करूं लागले. तेव्हां विष्णुदत्त मोठ्यानें ओरडून म्हणाला, ‘ बाबांनो ! ह्यानें माझेपासून व्यापारासाठीं कर्ज म्हणून पुष्कळसें धन नेलें आणि आतां हा परत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देण्याची वासना ठेवीत नाहीं, म्हणून मी त्यास म्हणत आहे कीं, माझें धन दिल्याशिवाय मी तुला येथून जाऊं देणार नाहीं. ते शिष्टहि तितकेच शहाणे होते. ते विष्णुदत्तासारखेंच बोलूं लागले. तेव्हां सोमदत्त त्यांचें भाषण ऐकून म्हणाला, ‘ सज्जन हो ! मी व्रती आहे. मजजवळ धन नाहीं. माझी मुलें माझें कर्ज सारण्यास समर्थ आहेत. ते तुझें कर्ज सारतील. मजजवळ धर्माशिवाय कांहीं नाहीं. विष्णुदत्ताला ते कबूल होईना. तो म्हणाला मी तुझ्या मुलांना जाणीत नाहीं. मी तुझ्यापासून धन घेणार ! पाहिजे तर तूं आपला धर्म विकून माझे पैसे दे. त्याशिवाय तुझी सुटका नाहीं. शिष्टांनींही विष्णुदत्ताच्या म्हणण्याला पुष्टी दिली. तेव्हां सोमदत्त मुनींनी त्यांस सांगितलें आपण उद्यां या म्हणजे मी आपला धर्म विकून तुझ्या पैशाची फेड करतों. तेव्हां सर्व आपापल्या घरीं निघून गेले.

मुनीहि स्मशानांत परत आले. ते देवतांना, लोकपालांना उद्देशून म्हणाले ‘ हे देवतांनों ! हे लोकपालांनों ! माझें म्हणणें ऐका ! माझें स्वरूप तुम्हांला उघडच आहे. माझीं हीं पंचमहाव्रतें, पंचसमिति, गुप्ती, द्वादशधर्म, तप, शील, गुण वगैरेपैकीं जें कांहीं तुमच्या उपयोगाचें असेल ते घेऊन मला धन द्या. देवतांनीं ही मुनीची वाणी ऐकून त्यांना कोठें तरी उपसर्ग होत असल्याचें जाणलें व त्यांनीं त्याचें निवारणार्थ पंचरत्नांचा एक तेजस्वी स्तूप खालीं पाठवून दिला. सकाळीं विष्णुदत्त नगरींतील लोकांसह आपलें धन वसूल करण्याचें अभिलाषेनें आला. दुरूनच तो स्तूप पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले. त्यांना पाहून सोमदत्त मुनी म्हणाले विष्णुदत्त ! हा रत्नांचा स्तूप घेऊन मला तूं आपल्या कर्जांतून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुक्त कर ! तेव्हां आकाशस्थ देवता त्या लोकाकडे पाहून म्हणाल्या जनहो ! ' स्मशानांत येऊन हे योगी आपल्या धर्माचा विक्रय करूं लागले. तेव्हां त्यांच्या संकट निवारणार्थ आम्हीं स्तूप घाडला आहे. तरी त्यांना हें अल्पसें द्रव्य घेऊन मुक्त करा ! त्यांच्या केसांचा अष्टांगुलींनें केलेला लोच जन हो ! अतिशय मौल्यवान आहे. त्या केसांची किंमत होणारी नाहीं. भव्याच्या संसाराचे उच्छेद कर-णाऱ्यांना जिनधर्माची किंमत त्रैलोक्याहूनाहि अधिक आहे. तेव्हां आम्हीं दिलेलें हें धन त्यापुढें अगदीं कमी किंमतीचें होय. तें घेऊन त्यांना मुक्त करा. ' एवढें बोलून त्यांनीं भक्तीभावानें त्या मुनींना नमस्कार केला. व त्या अदृश्य झाल्या. हा अतिशय पाहून विष्णु-दत्तादि लोक दिग्मूढ बनले. ते एकमेक परस्परांना म्हणूं लागले सर्व शुद्धींत तपशुद्धि प्रशंसनीय असतें. तपशुद्धि झालेल्यांना देवता देखील वंदन करतात. खरोखरी देवतांनीं पूजिलेला हा जिनधर्म उभयलोकीं सुख देणारा आहे. धनलोभापेक्षां धर्मलाभ होणें अत्यंत सुंदर. धनलाभ हा संसारवर्धक, जीववधबंधनस्वरूपी आहे. याप्रमाणें विचार करून विष्णुदत्त विरागी बनला. त्यानें सोमदत्त मुनीजवळ दीक्षा घेतली. कित्येकांनीं व्रतें ग्रहण केलीं. नंतर जिनधर्माची प्रशंसा करीत करीत सर्व लोक नगरीत परत आले. सोमदत्तमुनीबरोबर विष्णुदत्तमुनीनीं खडतर तप करून शेवटीं मोक्षपदाची प्राप्ती करून घेतली. देवदेवतांनीं त्यावेळीं वृष्टी केली. पुढें त्याच जागेवर तो स्तूप विकून कोटितीर्थ बांधण्यांत आलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १७ वी.

"अवेळीं शास्त्र पठण करणाऱ्याची कथा."

एका गांवांत वीरभद्र साधू राहात होता. तो अत्यंत सरळ हृदयीं होता. अवेळींच रानांत जाऊन तो नेहमीं शास्त्राध्ययन करीत असे. एके दिवशीं त्यास अकालीं रात्रींच्या वेळीं अध्ययन करतांना पाहिलें. तेव्हां त्यास उपदेश देऊन ही त्याची चूक सुधारण्याच्या हेतूनें श्रुतदेवींनें एका गवळणीचें रूप धारण केलें. डोक्यावर ताकाचें गाडगें घेऊन ती भटकत भटकत मुनीजवळ आली व 'परिपक्व कवठाप्रमाणें मधुर सुवास देणारे हे कांति—शक्तिप्रद ताक घ्या हो ताक घ्या,' असें म्हणत त्याच्याभोंवतीं घिरट्या घालूं लागली. हें ऐकून मुनी तिला म्हणाले बये! तुला वेड तर लागलें नाहीं ना? कां पिशाच्चाची बाधा झाली आहे? आहे तरी काय? खेट, खर्वट, गांवपत्तन, पूर वगैरे ताकविक्रीचीं ठिकाणें सोडून तूं या निर्जन अरण्यांत ताक घ्या, ताक घ्या, म्हणून ओरडत फिरतेस आणि तेंहि अशा भयाण रात्रीच्या समयाला! आणि तेंहि माझ्या सभोंवतीं! मी काय ताक घेणारा आहे? मग तूं हें असें वेड्यासारखें कां करते आहेस? देवी म्हणाली महाराज, 'मला वेड लागलें नाहीं. आपण मात्र वेडे बनलां आहांत. कारण मधुर, गंभीर व भव्यलोक-सुखद जिनाच्या मुखांतून निघालेले अघविनाशक असें हें श्रुतज्ञान अकालींच आपण पठन करीत आहांत यानें मोक्षप्रतिबंधकबंध होतो हें आपणांस कळत नाहीं काय? मग मी वेडी कीं आपण वेडे हें आपणच ठरवा! देवीचें हें सडेतोड उत्तर ऐकून मुनीमहाराजाचे डोळे उघडले. त्यांनीं आकाशाकडे पाहिलें तो स्वाध्याय वेळा टळून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गेल्याचें त्यांना कळून आलें. आपलें अध्ययन अकालीं घडल्यामुळें आपलें हातून अतिचार घडला म्हणून त्यांना विषाद वाटला. नंतर ते अध्ययन सोडून निद्रिस्त झाले. पहाट होतांच आपल्या गुरूंकडे जाऊन झालेल्या अपराधाची क्षमा याचून त्यानीं आलोचना केली. पुढें ते यथायोग्य काळीं अध्ययन करूं लागले. तेव्हां त्या देवींनें त्यांची पूजा केली. केव्हांहि द्रव्य–काल–भाव पाहूनच श्रुत-ज्ञानाचें पठण, पाठन करणें योग्य. त्यानेंच ज्ञानाची प्राप्ती होतें.

कथा १८ वी.

" अवेळीं अध्ययन करणाऱ्याची गोष्ट. "

अभिनंदन नांवांचा साधू एका गांवांत राहात होता. तो स्वभावानें आर्जवी पण विवेकशून्य होता. श्रवण नक्षत्रांवर स्वाध्याय करणें अत्यु-त्तम असें कोठें तरी त्यानें वाचलें--ऐकलें व तो त्याप्रमाणें अध्ययन करूं लागला. कालाकालाचा विचार न केल्यामुळें, त्यांतलें खरें रहस्य न समजतां तो अध्ययन करूं लागल्यामुळें त्याला सज्ज्ञानाची प्राप्ति होईना. तो असंतोषी राहूं लागला. शेवटीं आर्त्तध्यानांत मरून तो मंदाकिनीच्या जळांत एक मोठा मासा होऊन जन्मला.

एकदां गंगातीराला तो आला असतां एक मुनी शास्त्राचा पाठ करीत होते. त्यानें तो पाठ एकला. तों त्याला जातिस्मरण झालें. श्रुतपठणांत अतिचार घडल्यामुळें आपणांला हा जन्म मिळाला हें जाणून त्याला अतिशय दुःख झालें. आपली पूर्वीची सर्व हकिकत आठवून त्यानें आलोचना केली. नंतर सम्यक्त्वपूर्वक द्वादशाणुव्रतांचें ग्रहण केलें व मरून तो स्वर्गीं देव झाला. तेव्हां स्वहितसाधू इच्छि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

णारांनीं योग्यकाळीं अतिचार रहित शास्त्राचें अध्ययन करणें इष्ट. गुणदोषांचें समालोचन करून शास्त्राचें पठण पाठन करणें योग्य.

कथा १९ वी.

' मानी सुप्रतिष्ठ व विनयी राजा धनसेन. '

वत्सकावती देशांतील कौशांबी नगरींत राजा धनसेन आपल्या धनश्रीराणीसह राज्य करीत होता. धनश्री जैनधर्मानुयायी व सम्यक्त्वी होती. राजा भागवतधर्मी होता. तो त्या धर्माच्या साधूची मोठ्या भक्तीभावानें पूजा करीत असें. राज्याच्या पंक्तीला दररोज एक भागवत धर्माचा उपासक साधू येऊन भोजन करीत असे. त्याचें नांव सुप्रतिष्ट. त्याचा हा नित्याचा क्रम असे. त्याला जलस्तंभिनी नांवांची विद्या साध्य होती. तो त्या विद्येच्या सहाय्यानें यमुनेच्या पाण्यावर दर्भासन घालून पद्मासनस्थ बसून जप करीत असे. यामुळें लोक त्याला मोठा योगी समजत असत.

रथनपूरचा राजा विद्युत्प्रभ मोठा सम्यक्त्वी व द्वादशाणुव्रती होता. राणी विद्युत्वेगा भागवत–भक्त होती. ती सौंदर्यानें अत्यंत लावण्यंसपन्न होती. विद्युत्प्रभ आपल्या राणीसह जिनमंदिराचें दर्शन घेण्यासाठीं रथनपुरांतून निघाला. जातां जातां तो यमुनेच्या तीराला आला. यमुना दुथडी भरून चालली होती. सुप्रतिष्ट त्यावेळीं पाण्यावर बसून जप करीत होता. विद्युत्वेगेची दृष्टि त्याचेकडे गेली. ती आपल्या पतीस उद्देशून म्हणाली नाथा ! ' पाहिलें माझ्या धर्माचा हा साधू कसें तप करीत आहे तें ! त्याचें तपोवल पहा ! आपल्या धर्मतेजानें तो कसा पाण्यावर अधर बसला आहे. माघ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महिन्याची ही थंडी. पण तिकडे लक्ष्य न देतां तो शांतचित्तानें जप करीत आहे. खरे तपस्वी हे ! कोणाची प्राज्ञा आहे अशी तप करण्याची ? तपाचें हें तेज नव्हें तर काय ? ' हें भाषण ऐकून राजा म्हणाला प्रिये, हें कसलें तप ? याचें सामर्थ्य तरी कसलें ? त्याचें अंगीं ज्ञान तरी कोठें आहे ? राणीला या म्हणण्याचा राग आला. ती रागारागानें म्हणाली अहाहा ! कांहीं तरी बोलतां झालें. असले ज्ञानी तपस्वी तरी कोठें आहेत ? " ' प्रिये ! तुला अजून जगाचें ज्ञान नाहीं. तुला याच्या विद्येचें सामर्थ्य अजमावून पाहावयाचें असेल तर जरा थांब ! आपण त्याच्या तपाची परीक्षा घेऊं म्हणजे तुझी खात्री होईल. नंतर त्या दोघांनीं विचार करून डोंबाचा वेष घेतला. सुप्रतिष्ठ तप करीत होता त्याच्या वरच्या अंगाला जाऊन ते कच्ची चामडी धुवूं लागले. त्यामुळें पाणी गढूळ होऊन दुर्गंध सुटला. सुप्रतिष्ठ त्या दुर्गंधानें जेरीस आला. त्यानें ती जागा सोडली. व वरील बाजूस जाऊन तो तप करूं लागला. त्या जोडप्याला हंसू आलें. तेहि त्याच्या वरील अंगाला जाऊन चामडी धुवूं लागले. सुप्रतिष्ठाला त्यांच्या या कृतिमुळें फारच राग आला. तोंडानें शिवी-गाळ करीत तो वरच्या बाजूस जाऊन बसला. तेव्हां राजा आपल्या प्रियेला म्हणाला ' बघ, कसें हें तप आहे तें ? ही काय तपाची रीत आहे ? तपोबली साधू मोठ्या स्थिरपणें तप करीत असतात आणि याचें हें तप ! असो !

नंतर तेहि नदीच्या पैलतीराला गेले. तेथें राजानें आपल्या विद्येच्या सामर्थ्यानें एका सुंदर नगरीची रचना केली. त्या नगरीच्या चोहोंबाजूला चार वेशी होत्या. शहराभोंवतीं खंदक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व तट होते. शहरांत अनेक लहान मोठें प्रासाद होते. विहिरी च बागबगीचे यांनीं तें शहर सुंदर दिसत होतें. ही सुंदर नगरी पाहून सुप्रतिष्ट आश्चर्य चकित झाला. त्याचें लक्ष्य डोंबाकडे गेलें. अद्याप पावेतों माझ्या नजरेस कधींच ही नगरी आली नाहीं. एवढेंच नव्हें तर इतर ठिकाणींही मीं कधीं पाहिली नाहीं. आज-पावेतों ही येथें नव्हती आणि आतांच कोठून आली. खात्रीनें हे ह्या डोंबाचेंच काम असलें पाहिजे. मग हा तर माझ्याहि पेक्षां विद्येनें अधिक दिसतो. आपली ही विद्या त्याच्यापुढें अगदीं कुच-कामाची होय. मला ही विद्या सहज प्राप्त करून घेतां येईल. यांत कठिण तें काय ? याप्रमाणें विचार करून तो जप सोडून उठला व डोंबाजवळ आला. नंतर त्यास प्रमाण करून म्हणाला, ' हे सज्जना ! आपण आपली ही विद्या मला द्यावी. म्हणजे मीहि आपणाप्रमाणें अशी उत्तम नगरी उत्पन्न करून लोकांचें मनरंजन करूं शकेन. तेव्हां त्यास डोंब म्हणाला भो साधुवर्या ! आम्हीं चांडाळ आपण ब्राह्मण. त्यांतून आपण महान् तपस्वी ! आमचा आपणांस विनय करावा लागेल. कारण विनयावाचून कोणतीच विद्या प्राप्त होत नसते हें आपण जाणताच ! विद्या साध्य करण्या-पुरतां आपणाला आमचा विनय करावा लागणारच ! पण विद्या साध्य झाल्यानंतर आपण आमच्याशीं विनयानें वागणार नाहीं. मग ती विद्या नष्ट होईल. तेव्हां ती शिकून न शिकून सारखीच ! सुप्रतिष्ट वुचकळ्यांत पडला. त्याची इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिति झाली. विनयाशिवाय सिद्धि होणें नाहीं. हें त्यास पटलें. पण आपण ब्राह्मण आणि चांडाळास नमस्कार करूं तर आपलें प्रभुत्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोठें राहिले ! बरें आपण विद्या साध्य करून न घ्यावी तर आपलें महत्त्व वाढणार नाहीं आणि कदाचित् हा आपले तेंज दाखवून माझी येथें जमलेली प्रतिष्ठा नष्ट करील ! तेव्हां विद्या साध्य करून घेतल्या शिवाय दुसरा मार्गच नाहीं आणि त्यासाठीं या चांडाळाचा विनय करणेंच इष्ट. कारण जगांत भावी परिणामाकडे लक्ष्य देऊन वागणें श्रेयस्कर असतें. एखाद्यास गाढवाप्रमाणें ओरडून धनलाभ होत असला तर त्याप्रमाणें ओरडणें योग्यच ! कारण धनसंपत्ती हीच इहपरलोकाची दात्री होय—खाण होय. एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " कृत्वा गर्दभरटितमपि त्वं जनमनुरंजय मित्र । येन धनानि भवन्ति तवोच्चैर्यानि हितान्युभयत्र ॥" असा पोक्त विचार करून त्यानें त्यांना प्रदक्षिणा घालून नम्रपणानें साष्टांग नमस्कार केला व म्हणाला भो प्रभो ! ' आपण ती विद्या मला द्यावी. ' डोंबानें त्यास विद्या अर्पण केली. नंतर ते दोघेहि तो आपल्याशीं कसा विनयानें वागतो हें पाहण्याचा विचार करून तेथून निघून गेले.

सुप्रतिष्ठानें ते निघून गेल्यानंतर आपणांस विद्या प्राप्त झाली किंवा नाहीं हें परीक्षून पाहण्यासाठीं त्या विद्येच्या सहाय्यानें एक सुंदर नगरी उत्पन केली. ती पाहून त्यास अत्यानंद झाला. ती विद्येनें पुन्हां नष्ट करून तो धनसेन राजाकडे गेला. राजा त्याला पाहतांच उठून सामोरा गेला. त्याचें त्यानें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. सुवर्णासनावर बसविल्यानंतर नम्रपणें नमस्कार करून तो म्हणाला भगवन् ! आपणांस एवढा अवधि आज कां बरें लागला ? भोजनाची वेळ टळून गेली. कांहीं संकट तर ओढवलें नव्हतें ना ? आपल्या कार्यांत, तपांत, विघ्न तर आलें नाहींना ! '

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजन् ! आमच्या तपांत विघ्न तें कोण करणार ? आणि केलें तरी आम्हीं त्याची परवां करीत नाहीं. आज तसें कांहीं नव्हतें पण आज आम्हांला आमच्या अविरत तपाचें फळ मिळालें ! ' तेव्हां राजानें मोठ्या उत्कंठेनें विचारले महाराज ! ' आपणांस काय फळ-प्राप्ति झाली ती मला कळण्यासारखी आहे काय ? ' ' राजन् ! सांगून काय उपयोग ? प्रत्यक्ष कृतीनेंच तुला पाहावयास मिळेल. राजा आज तुला तुझ्या अंत:पुरांतील परीवारांसह एवढेंच नव्हें तर तुझ्या झाडून साऱ्या नगरवासी लोकांसह आज मी माझ्या मठांत जेवण्यास येण्याचें आमंत्रण देण्यास आलों आहे. तरी सर्व परिवारां-सह येण्याचें करावें. ' राजाला सत्कुदर्शनीं सुप्रतिष्ट आपली थट्टाच करीत आहे असें वाटलें. त्यानें विचारले ' महाराज, आपणांकडे यावें याचा अर्थ काय ? ' "याचा अर्थ हाच कीं माझ्याकडे जेवा-वयाचें आमंत्रण मी देत आहे एवढेंच ! " नंतर राजांच्या पंक्तीचा नित्याप्रमाणें पाहुणचार घेऊन तो आपल्या मठाकडे निघून गेला.

आपल्या पर्णकुटीस आल्यानंतर सुप्रतिष्ठानें आपल्या नूतन प्राप्त झालेल्या विद्येच्या साहाय्यानें त्या पर्णकुटीच्या जागेवर सुंदर नगरी उत्पन्न केली. तींत नानाप्रकारचे गगनचुंबी शिखर असलेले असे रम्य प्रासाद राजवाडे होते. लोकांनीं गजबजलेले रस्ते व बाजार होते. नगरी भोंवतीं भव्य खंदक होता. चारी दिशेला चार गोपुरें होतीं. हें पाहून तो आनंदानें फुगून गेला. आतां आपलें सामर्थ्य सर्व लोकांच्या नजरेस पडून आपली मान्यता वाढणार ! आपण मोठे तपस्वी ठरणार ! वगैरे मनोराज्यांत तो गढून गेला असतां राजा आपल्या नगरवासी जनांसह त्या नगरांत प्रवेश करता झाला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ती नगरी पाहून महाराजांच्या तपोबलाची जो तो मुक्तकंठानें स्तुति करूं लागला. जिकडे तिकडे गोंगाट सुटला. तेथील राजवाड्याच्या प्रशस्त अंत:पुरांत भोजनाचीं पात्रें वाढलीं होतीं. सर्व लोक आपापल्या पात्रांवर जाऊन बसले. भोजनपात्रें सुवर्णाची होतीं. वाढण्यास सुरुवात झाली. प्रथमतः पात्रांत मुगाची खिचडी वाढण्यांत आली. त्यावर तूप वाढण्याचें काम चाललें होतें. तों तें विद्याधर दांपत्त्य डोंबाच्या रूपांत तेथें येऊन दाखल झाले. सुप्रतिष्ठाची नजर त्याचेकडे गेली. पण तो आपल्या प्रतिष्ठेच्या गर्वांत त्यांना विसरून गेला. त्यांना नोकराकरवीं त्यानें हाकलून लावलें. त्याचा परिणाम एका क्षणांत तें नगर नष्ट झालें. तेथें भोजनाचीं पात्रें उरली ना तेथें बाजार राहिला. सर्व कांहीं एका क्षणांत होतें नव्हतेंसें झालें. नाहीं म्हणावयास सुप्रतिष्ठाची मूळची झोंपडी तेथें दिसूं लागली. मायावी लोक नष्ट झाले. त्यामुळें त्याचें तोंड काळे ठिक्कर पडलें. तेव्हां राजानें विचारलें महाराज, आपल्या कोणत्या पापाच्या उद्यानें हें असें घडलें बरें? आपल्याकडून विद्या साधण्यांत कांहीं दोष घडला काय? सुप्रतिष्ठाला आतां खरें सांगणें भाग पडलें. कारण आहे तीहि प्रतिष्ठा आतां नष्ट होईल अशी त्यांस भीती होती. तो म्हणाला राजा, आम्हां कृतघ्न माणसांचें शील कसलें? आतांच आपण ज्या डोंबांना पाहिलें त्यांनींच मला ही विद्या प्रदान केली. मी त्यांच्याशीं विनयानें न वागल्यामुळें हें असें घडून आलें आणि तसें न वागण्याचें कारण मी तुझ्या समक्ष जर त्याचा मान केला असतां तर माझी प्रतिष्ठा नष्ट झाली असती. त्याचा हा परिणाम होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजानें हें ऐकून घेतलें व तात्काळ त्या डोंबाजवळ गेला. त्यांना भक्तीपूर्वक नमस्कार केला व म्हणाला ' आपण दयावंत आहांत तेव्हां आपण ही विद्या मला शिकवावी. डोंब म्हणाला राजा ! तुला विद्या हवी असल्यास तूं आमचा विनय केल्याशिवाय तुला विद्या प्राप्त होणार नाहीं. कारण:—

विनयेन विना काश्रीःका निशा शशिनाविना ।
रहिता सत्कवित्वेन कीदृशी वा विदग्धता ॥

अर्थ:— विनयावाचून संपत्तीला, चंद्रावाचून रात्रीला (रजनीला) उत्तम कवितेवाचून भाषेला जशी शोभा येत नाहीं तद्वतच विद्या विनयावाचून कधीं प्राप्त होत नाही. नव्हें शोभत नाहीं. राजानें तें मान्य केल्यानंतर ती विद्या त्यास प्रदान करून तें दाम्पत्य तेथून निघून गेले.

इकडे राजा आपल्या विद्येचा प्रभाव अजमावून घरीं आला. सभास्थानीं तो बसला असतां तें डोंबदांपत्य तेथें आलें. त्यांना दुरून पाहतांच राजा उठून त्यांना सामोरा गेला. त्यांना तीन प्रदक्षिणा घालून त्यानें साष्टांग नमस्कार केला. त्याची विनयशीलता व भक्ति पाहून विद्याधरानें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. त्याचें दिव्य रूप पाहून सभेंतील सर्व लोक थक्क झालें. नंतर राजा त्यास नम्रपणें म्हणाला महाराज, आपण कोण ? देव आहांत कीं विद्याधर आहांत ? तेव्हां विद्युत्प्रभ विद्याधर राजांस म्हणाला, ' राजा, मी रथनुपुराचा राजा विद्युत्प्रभ आणि ही माझी भार्या विद्युत्वेगा आहे. तुझ्या विनयानें मी अति प्रसन्न झालों आहें. नंतर त्यानें राजांस सर्व हकिकत सांगून जैनधर्माचें महत्त्व पटवून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिलें व त्यांस जैनधर्माची दीक्षा दिली. विद्युत्वेगेला हा जैन-धर्माचा प्रभाव पाहून त्याबद्दल आदर वाटूं लागला व ती जैन-धर्मी बनली. सुप्रतिष्ठानें त्याच समयाला जैनधर्माची दीक्षा घेतली. राजास एक दिव्य मुक्ताहार व रत्नजडित कुंडलें देऊन ते विद्याधर दांपत्य आपल्या नगरीस परतले.

सुप्रतिष्ठानें आपल्या कृतघ्नवृत्तीला बळी पडून मिळविलेली विद्या व प्रतिष्ठा गमविली. पण तीच राजानें विनयानें प्राप्त करून घेतली. एवढेंच नव्हे तर तो विद्याधराकडून पुष्कळशी संपत्ति प्राप्त करून घेऊन आदर मिळविता झाला.

तात्पर्य— मोक्षाभिलाषी साधूंनीं, विनयाचा, मुक्तिमार्गाचा, विवेकाचा, विनय आदर करणें इष्ट होय. नव्हे हें त्यांचें मुख्य कर्तव्य होय.

———

कथा २० वी.

" ज्ञानाचरण कथा. "

अहिछत्रपुरांत राजा वसूपाल राज्य करीत असे. त्याची भार्या वसुमती व पुत्री सुमती नांवाची होती. राजानें एक मनोहर भव्य व अतिशय विशाल जिनमंदिर बांधविलें व त्याचें नांव सहस्र-कूट ठेवलें.

या जिनमंदिरासाठीं एक सुंदर पण भव्य पार्श्वनाथाची प्रतिमा करण्याचें ठरवून त्यांनीं या कामासाठीं एक कलाभिज्ञ शिल्पकाराची योजना केली. तो शिल्पकार नित्य मंदिरांत येऊन ती मूर्ति घडीत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असे. नित्याप्रमाणें तो एके दिवशीं मंदिरांत आला असतां मूर्ति विभंगून पडलेली त्याचे दृष्टोत्पत्तीस आली. तेव्हां त्यानें ती मातीच्या पिंडानें जोडून व्यवस्थित केली व आपले त्या दिवशींचें काम संपवून तो घरीं गेला. राजानें येऊन पाहिलें तों मूर्ती भंगलेली. त्याला शिल्पकाराचा राग आला. त्यानें त्यास हाकलून दिलें. याप्रमाणें पुष्कळसें शिल्पकार येऊन गेलें. पण त्यांच्या हातून कांहींकेल्या ती मूर्ति पूर्ण होईना. राजा शेवटीं कंटाळून गेला. मनुष्य कंटाळला म्हणजे वैतागतों आणि वैतागला म्हणजे जो येईल त्याचेवर रागावतो हा मनुष्य स्वभावच आहे.

कांहीं काळ लोटल्यावर एके दिवशीं एक शिल्पकार राजाकडे आला. राजा प्रथम त्याचेवर पुष्कळ रागावला. नंतर त्यास म्हणाला हें पहा ! माझ्याकडे आजपावेतों पुष्कळसें शिल्पकार येऊन गेले. त्यांचे हातून कांहींहि कार्य झालें नाहीं. तुझ्या हातून जर प्रतिमा पूर्ण होण्यासारखी असेल तरच तूं हें काम हातीं घे. नाहींपेक्षां तूं आलास तसा परत निघून जा. विनाकारण कार्य हातीं घेऊन त्यांत अपयश घेण्यापेक्षां त्या कार्यांत हात न घालणें बरें ! यावर तो शिल्पकार राजास म्हणाला हे राजन् ! मी प्रतिमा अवश्य पूर्ण करीन. जास्त सांगण्याची आवश्यकता वाटत नाहीं. राजानें त्यास तांदूळ दिलें; व जाण्यास सांगितले आणि आपण सभेंतून उठून राजवाड्यांत निघून गेला.

इकडे शिल्पकारानें जिनाची स्तुती केली. आचारवेदिन् मुनीचंद्र गुरूची यथाविधि भक्ति केली. गुरुभक्तीनंतर तो मुनीराजास म्हणाला महाराज ! तीन प्रकारच्या मकाराचा पंचोदुबरांचा, दही दूध व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्त्री सेवनाचा जोपर्यंत प्रतिमा ही पूर्ण होणार नाहीं तोंपर्यंत त्याग असावा असा नियम मला द्या. नंतर तो नियम घेऊन घरीं परतला. दुसरें दिवशीं त्यानें प्रतिमा घडण्याचें कार्य हातीं घेतलें. थोडक्यांच दिवसांत कल्पनेपेक्षांहि त्याला त्या कामांत यश आलें. प्रतिमा सुंदर व भव्य दिसूं लागली. राजा आनंदला त्यानें पुष्कळसें धन शिल्पकारांस देऊन त्याचा सन्मान केला. नियम घेऊन ज्याप्रमाणें प्रतिमा पुरी केली व त्यामुळें तो सन्मानास पावला त्याचप्रमाणें साधूंनीं आगमाचें अध्ययन नियमानुसार भक्तिभावानें करणें इष्ट ! श्रेयस्कर होय ह्या रीतीनें अध्ययन केलेला साधू नरवरांकडूनच नव्हे तर सुरवरांकडून पूज्य मानला जातो व क्रमानें मोक्षाचा अधिकारी बनतो.

कथा २१ वी

" ज्ञानबहूमान कथा. "

वाराणसीमध्यें राजा वृषभध्वज राज्य करीत असे. तो महापराक्रमी. त्यानें आपल्या पराक्रमाचे जोरावर पुष्कळसा देश जिंकून आपल्या राज्याचा विस्तार वाढविला होता. राजाची राणी वसुमति शील, गुण–संपन्न होती. तिच्या शरीराचा बांधा सुडौल, डोळे चंचळ, त्यांत तारुण्य तेव्हां ती अधिकच खुलून दिसे.

वाराणसीजवळच गंगानदीच्या तटाकीं पलाशकूट नांवांचें एक खेडे होतें. त्या खेड्यांत एक अशोक नांवांचा धनाढ्य सावकार राहात असे. त्याची भार्या नंदा त्याची फार आवडती होती. परंतु ती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संततीहीन होती. तेव्हां संततीसाठीं अशोकानें सचिवाची मुलगी सुनंदा इच्याशीं लग्न केलें. अशोकाचा धंदा गवळ्याचा होता. तो सुखानें आपली कालक्रमणा करी. त्याला दुःख असें ठाऊक नव्हतें. त्याचा स्वभाव मनमिळाऊ होता. त्यामुळें गांवांत तो पुढारी समजला जात असे. त्यास लोक फार मान देत असत. तो प्रत्येक वर्षीं वृषभध्वज राजाला एक एक हजार तुपाच्या घागरीं देत असे. याप्रमाणें तो सुखानें आपली कालक्रमणा करीत असतां पुढें सवती सवतीमध्यें क्षुल्लक गोष्टींवरून भांडणें होऊं लागलीं. सुनंदा जरा मानी स्वभावाची होती आणि त्यांतून ती नवपरिणीतवधू असल्यामुळें अधिकच तोऱ्यानें वागे. तेव्हां अशोकानें त्याची वाटणी केली. त्यांत अर्ध्या गायी सुनंदेस व अर्ध्या गायी नंदेस दिल्या.

नंदा आपल्या गाईंना व गुराख्यांना मोठ्या प्रेमानें वागवी. गाई चारण्यासाठीं ज्यावेळीं गुराखीमुलें रानांत घेऊन जात तेव्हां ती त्याच्या बरोबर गांवाच्या वेशीपर्यंत जाई. ती तेथें गुराख्याच्या हवालीं गुरें मोजून देई व नंतर मग घरीं परत येत असे. सायंकाळीं गुरें परत आल्यानंतर पुन्हा मोजून घेई. हा तिचा नित्याचा क्रम असे. गायींना ती पेंड, सरकी यथेच्छ खाण्यास देई. त्यांचें प्रेमानें पालन, पोषण करी. गुराखीमुलांना भोजनाच्या वेळीं दूध, दहीं, तूप यथेच्छ खाण्यास देई. त्यांचें राहण्याची, भोजनाची, व्यवस्था तिनें आपलें येथेंच केली होती. प्रत्यक्ष पोटच्या मुलाप्रमाणें त्यांचा सांभाळ करी. त्यामुळें गुराखी देखील मोठ्या प्रेमानें गाई राखीत. यांचा परिणाम गाई सुदृढ राहात. पुष्कळसें दूध देत. रानांत जातांना ती त्या गुराख्यांना दुपारच्या न्याहारासाठीं मोद-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कांची मिष्टान्नाची शिदोरी बांधून देत असे. त्यामुळें ते गुराखी त्या गुरांना ओढ्याच्या कांठीं जेथें कवळे हिरवेगार गवत असे तेथेंच नेऊन चारीत. नंतर ओढ्याच्या कांठीं बसून ते मिष्टान्न खात व वर गाईचें दूध प्राशन करीत. गायींना स्वच्छ पाण्यांनीं धुवत असत. रानांतून परत आल्यानंतर गुराख्यांना ती ऊठून पाय धुण्यास पाणी देत असे. ह्या साऱ्या गोष्टींमुळें ते गुराखी देखील तिच्याशीं मोठ्या प्रेमानें वागत. गायींची सर्व प्रकारची काळजी घेत असत. त्यामुळें दही, दूध हें नंदेला पुष्कळसें होई. नंतर ती त्याचें तूप बनवीत असे. दही, दूध, तूप यांची भांडी देखील ती अति स्वच्छ ठेवीत असे.

सुनंदा अशोकाची फार आवडती. तारुण्याच्या भरांत ती उन्मत्त-पणानें वागे. गुराख्याकडे, गायीकडे, ती मुळींच लक्ष्य देत नसे. त्यांना नीट बोलत नसे. गुरांना सरकी पेंड कांहींच खाण्यास देत नसे. नेहमीं भांडी अस्वच्छ राहात असल्यामुळें नेहमीं दूध नासे. गुराख्यांना भोजनास देत नसे. त्यामुळें गायीं दूध देईनाश्या झाल्या जे दूध निघे तेंहि भांडी चांगली नसल्यामुळें नासून जाई. त्यामुळें तिच्या घरीं दूध, दही, तूप यापैकीं कांहींच होईनासे झालें. साह-जिकच आहे. " बहुमानं विना लोके न स्नेहो जायते नृणां " बहुमानाशिवाय जगांत मानवांत स्नेह वाढत नाहीं.

कांहीं काळ या रीतींनें गेल्यानंतर अशोक सुनंदेस म्हणाला प्रिये वृषभध्वज राजास एक हजार घागरीं तूपाच्या देण्याचे दिवस जवळ येत चालले आहे तेव्हां तूं पांचशें घागरी दे. व नंदा पांचशें देईल. म्हणजे हजारांची भरती होईल. सुनंदा रागावून म्हणाली ' पांचशें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काय पण एक पळी भर देखील तूप आपल्या घरीं नाहीं. ही गोष्ट नंदेला लोकां करवी कळवीं. तिनें आपल्या नवऱ्याकडे हजार घागरी तुपाच्या पाठवून दिल्या. नंदेकडून घागरी आलेल्यापाहून अशोकानें सर्व गायी तिच्या स्वाधीन केल्या व आपणही सुनंदेला सोडून तिच्या घरीं राहूं लागला. सुनंदा अशा रीतीनें नागावली गेल्या मुळें आपलें आयुष्य झोंपडींत राहून घालवूं लागली. अशोक फक्त तिला खाण्यापुरतें पोंहोचवूं लागला. गायी, गुराख्याची नींट काळजी न घेतल्यामुळें तिला ही दुःसह स्थिति प्राप्त झाली. पण तीच नंदेनें आपल्या प्रेमळ, गरजू वागणुकीनें आपल्या पतीचें गमावलेलें प्रेम परत मिळविलें, हा सारा बहुमानाचा परिणाम.

जे साधू ज्ञानाचा बहुमान करीत नाहींत त्यांना या संसारांत असह्य दुःख होतें; पण जे बहुमानानें वागतात ते नंदेप्रमाणें इंद्राकडून देखील पुजिले जातात.

कथा २२ वी.

' गुरुनिन्हव कथा. '

अवंतीदेशांत उज्जयनी नांवाची नगरी होती. तेथील राजा धृतिसेन—धृतिषेण—त्याचे भार्येचें अमलमति आणि मुलाचें चंद्रप्रभ नांव होतें. अमलमति सौंदर्यानें जणुं अप्सराच होती. तशीच ती गुणी होती. ' खाण तशी माती ' या न्यायाला अनुसरून मुलगाही पण गुणीच निपजला.

विंध्यातटपुरींत सोमशर्मा ब्राह्मण राहात असे. त्याची भार्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सौम्या आणि पुत्र कालसंदिव. कालसंदिव हा सर्व शास्त्रांत प्रवीण होता. त्यास धनुर्विद्या पण उत्तम प्रकारें अवगत होती. अठरा भाषेचा तो जाणता होता. मतानें तो मीमांसक होता. कलाकुशल होता. राजानें कालसंदिवाची चंद्रप्रभाला शिकविण्यासाठीं उपाध्याय म्हणून योजना केली. चंद्रप्रभाला त्यानें सतरा भाषेंत पारंगत बनविलें. अठरावी भाषा यावनी शिकविण्याचा बराच प्रयत्न केला. पण ती त्यांस लिपी कांहीं केल्या उमगेना. शिकवून, सांगून तो शेवटीं कंटाळला. त्याचा राग अनावर झाला. रागाच्या भरांत त्यानें चंद्रप्रभाच्या डोक्यांवर लत्ता प्रहार केला. चंद्रप्रभाला कालसंदिवाचा राग आला. रागानें थरथर कांपत म्हणाला गुरुजी ! जर मला राज्याची पुढें प्राप्ती झाली तर मी हा आपला पाय कुऱ्हाडीनें तोडून टाकीन. गुरुला त्याच्या अज्ञानाची कीव आली. रागाच्या भरांत हा कांहीं तरी बरळतो हें जाणून घेऊन ते त्यास म्हणाले, ‘ चंद्रप्रभा ! तूं कदाचित् राजा झाल्यास माझा पाय तर तोडणार नाहींस पण उलट मोठ्या आदरानें माझ्या चरणाला पट्टबंध बांधशील ! ’ कालसंदिवानें पुढें वरीच मेहनत घेऊन त्यांस ती विद्या शिकविली. अशा रीतीनें त्याचा अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर कालसंदीव दक्षिण दिशेकडे निघून गेले. वाटेंत त्यांची व श्रुतसागरमुनीची भेट झाली. त्याचें मुखानें जिनधर्माचें श्रवण करून त्यांनीं दिगंबरीदीक्षा ग्रहण केली. आगमाचें यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेऊन ते तपश्चरण करूं लागले.

इकडे राजा धृतिषेण आकाशाकडे सहज पाहात असतां त्यांस एक मोठा, विमानाच्या आकाराचा ढग दिसला. त्याकडे तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सारखा पहात होता. कांहीं वेळानें तो ढग विरून गेला. याचा परिणाम धृतिसेनाचे मनावर झाला. तो तात्काळ विरागी बनला. त्यानें नंतर आपल्या मुलांस--चंद्रप्रभास बोलाऊन आणून त्यास सर्व मंत्रीमंडळासमक्ष राजपट बांधला व आपण सर्वसंगपारित्याग करून जिनदीक्षा ग्रहण केली.

चंद्रप्रभ राज्यावर आला. आनंदानें राज्यकारभार हाकीत आपला काळ मोठ्या सुखानें घालवूं लागला कांहीं दिवस गेल्या-नंतर एका यवन राजानें आपल्या दुतावरोबर संदेश पाठविला. त्याची लिपी यावनी होती. सामंतमंत्री यापैकीं कोणासही ती अवगत नव्हती. तेव्हां राजानें स्वतः तो संदेश वाचला. त्यावेळीं त्याला आपल्या गुरूचें स्मरण झालें. आपणांस गुरुंनीं जर त्यावेळीं लाथ मारून ही विद्या शिकविली नसती तर इतरांप्रमाणें आपणहि मूर्ख ठरलों असतो आणि लोकांच्या तोंडाकडे आपणांस पाह-ण्याचा प्रसंग आला असता. हा आपल्यावर त्यांचा केवढा बरें उपकार झाला. आपण त्यांना विसरून गेलों हें आपलें कृत्य योग्य ठरतें काय? असा विचार करून त्यानें आपल्या गुरूंच्या शोधा-साठीं तात्काळ देशोदेशीं आपलें दूत रवाना केले. नांवागांवाची चौकशी करीत ते दूत विन्यातटपुरास आले. कालसंदिवमुनी तेथें आसपासच राहत होते. दूतांनीं जाऊन त्याची भेट घेतली. त्यांना वंदन करून राजाचा निरोप कळविला व चलवण्याविषयीं नम्र-पणें प्रार्थना केली व म्हणाले, महाराज, आपण लवकर चलावे. कारण आपण जोपर्यंत येणार नाहीं, नव्हे आपले जोंपर्यंत दर्शन घडणार नाहीं तोंपर्यंत राजेसाहेबांनीं तांबूलादि भोज्यपदार्थांचा त्याग

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केला आहे. कालसंदिव त्या दूताबरोबर जाण्यास निघाले. राजवाड्यांत येतांच राजा मोठ्या आदरानें उठून त्यांना सामोरा गेला. भक्तिपुरस्सर त्यांना नमस्कार करून त्यांना उच्चासनावर आणून त्यानें विराजमान केलें व त्यांचे पादप्रक्षालन केलें. कर्पुरमिश्रित केशराची उटी पायांस चोळली. वाद्यें वाजूं लागलीं त्या वाद्याच्या गजरांत राजानें त्यांच्या चरणाला सुवर्णपट्ट बांधला. गुरूचरणाची पुष्प, धूप, तांबूल वगैरे पुजनीय द्रव्यांनीं पूजा केली. नंतर त्यांचे चरणांवर मस्तक ठेवून म्हणाला गुरुजी मला संसारार्णव तारिणी दीक्षा द्यावी. गुरूंनीं आपल्या दिव्यज्ञानांनीं त्याच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान करून घेऊन त्यास जिनदीक्षा दिली. घोर तपश्चर्यानें चंद्रप्रभमुनीचे शरीर दुधासारखें पांढरें दिसूं लागलें. तो पूर्ण इंद्रिय-निग्रही बनला. म्हणून त्याचें नांव श्वेतसंदिव ठेवण्यांत आलें.

कांहीं दिवसांनीं ते गुरु–शिष्य पताकावलि राजित राजगृही नगरीस आले. त्यावेळीं श्रीमहावीरस्वामीचे विपुलाचलपर्वतावर समवसरण आले होतें. त्यांना वंदन करण्यासाठीं ही गुरुशिष्यांची जोडीहि तेथें गेली. समवसरणाबाहेर श्वेतसंदिवाची व राजा श्रेणिक यांची गांठ पडली. राजानें त्यांना आपण कोणत्या गुरूंजवळ दिक्षा घेतली म्हणून विचारलें. तेव्हां मुनींना आपल्या गुरूचें नांव सांगण्याची लाज वाटूं लागली. ते म्हणाले राजा ! मी दुसऱ्या कोणाजवळ बरें दिक्षा घेणार ? ज्यांनीं या अखिल भूतलांला संतुष्ट केलें, जे ज्ञानाचे सागर महातपस्वी आहेत तेच महावीरस्वामी माझे गुरू होत. या खोट्या उत्तराचा परिणाम असा झाला कीं, त्याचे तोंड शरीर तात्काळ काळे ठिक्कर पडले. चर्या बदलून गेली. श्रेणिकाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हा प्रकार पाहून मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें गौतमस्वामींना येऊन ही हकीगत सांगितली. तेव्हां स्वामी त्यास म्हणाले, आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून यानें आपल्या गुरूचें नांव चोरून ठेवलें. त्याचा हा परिणाम असा झाला. नंतर श्रेणिक पुन्हां तेथून श्वेतसंदिवमुनीकडे आले व त्यास म्हणाले, ' मुनिराज ! हा आपल्या खोटें बोलण्याचा परिणाम होय. आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून आपण आपल्या गुरूचें नांव लपवून ठेवलें. त्यामुळें हें आपलें शरीर काळेठिक्कर पडलें आहे. तेव्हां आतां आपण आपल्या गुरूकडे जाऊन आपल्या दोषांची क्षमा मागा. आलोचना करा. यांतच आपलें कल्याण आहे. श्रेणीकाचें हें हितकर भाषण ऐकून ते गुरुकडे गेलें. गुरूंना त्रिवार नमस्कार करून आपल्या दोषाची क्षमा मागितली. आणि आलोचना केली. गुरूंनीं त्यास प्रायश्चित दिलें. त्याचें पालन उत्तम रीतीनें श्वेतसंदिवांनीं केलें त्यामुळें त्यांना लोकावलोकनिकज्ञान प्राप्त झालें व पुढें ते मोक्षाला गेले.

तात्पर्य— गुरूचा आदर करणें हें प्रत्येक मानवाचें परम कर्तव्य होय. श्वेतसंदिवानीं प्रथमपासूनच तें केल्यामुळें मध्यंतरीं हातून दोष घडले तरी ते मोक्षगामी बनले.

———

कथा २३ वी.

" व्यंजन-हीन-कथा. "

फार प्राचीनकाळीं मगध देशांतील रम्य राजगृहीं नगरींत वीरसेन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचें नांव वीर-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सेना होते. त्याचा पुत्र सिंह सिंहाप्रमाणेंच पराक्रमी होता. त्याच्या अध्ययनासाठीं सोमशर्मा नांवाच्या पंडिताची उपाध्याय म्हणून नेमणूक केली होती.

उत्तरेकडील भागांत पोदनपूर नांवाचे नगर होतें. तेथें त्यावेळीं राजा सिंहरथ राज्य करीत होता. तो सिंहतुल्य पराक्रमी होता. त्याची राणी सिंहसेना फार सुंदर होती. वीरसेनानें आपला पगडा आसमंतांतील सर्व राजावर बसविला होता. ते त्याला लवून वागत होते पण सिंहबल त्यास जुमानीत नसे. तेव्हां त्यास जेरीस आणून आपलें प्रभुत्व स्वीकारण्यास लावण्यासाठीं वीरसेन राजा आपल्या अफाट चतुरंग सैन्यासह पोदनपुरांवर चाल करून गेला. त्यानें नगरीला चोहोंबाजूंनीं वेढा घातला. वीरसेनाचें सैन्य जरी अफाट होतें तरी सिंहबल सहज वश होईल असा रंग दिसेना. आपलें दिवस येथें बरेंच मोडणार तेव्हां आपला मुलगा शिकतो किंवा नाहीं, त्याची काळजी सर्वजण घेतात किंवा नाहीं, याविषयीं राणी व मंत्री यांना पत्र पाठवून विचारणा करावी म्हणून त्यानें आपल्या दूतांकरवीं राजधानीस पत्र धाडले. त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होताः—

" स्वतिश्री महाशुभस्थाने पोदनपूरांहून शत्रुंजयी महाबलवान् राजराजेश्वर श्री वीरसेन महाराजाच्या रम्य सुशोभित राजवाड्यांनीं गजबलेल्या राजगृहीनगरींत राहणाऱ्या वीरसेना राणीसाहेब व मंत्रीगण मंडळ यांना आज्ञा की, आम्हीं इकडे गुंतणार तोंपर्यंत मत्प्रिय भावी युवराजाच्या शिक्षणाची योग्य ती व्यवस्था ठेवावी. तिकडे दुर्लक्ष्य करूं नये. आम्हीं शत्रूंचा संहार करून त्याचेकडून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंडणी वसूल करूनच येऊं. त्याशिवाय आमचें तिकडे येणें होणें नाहीं. तरी मुलाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष्य होऊं नये. आपणही सावध राहावें. ''

तें पत्र लिहून दूताच्या गळ्यांत बांधलें. दूत मजल दर मजल करीत राजगृहीस आला. सभेंत राणी वीरसेना, मंत्रीजनांसमवेत बसली होती. त्यांच्यासमोर आणून तें पत्र दूतानें ठेवलें. वाचणारानें तें वाचून दाखविलें कीं, सिंह राजपुत्राला पत्र पाहतांच आंधळें करा. हें ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलें. हा असा कसा हुकूम बरें ? त्याप्रमाणें न करावें तर राजा शासन करील ही भीति ! तेव्हां त्यांनीं मागचा पुढचा विचार न करतां राजपुत्राचे डोळे फोडले. सर्वांना अतिशय दुःख झालें. पण नाइलाज होता.

कांहीं दिवसांनीं राजा सिंहरथासारख्या प्रचंड शत्रूला जिंकून त्याचेपासून योग्य खंडणी वसूल करून राजधानीस परत आला. राजसभेंत बसला असतां त्यानें आपल्या पुत्रांस बोलाविणें पाठविलें. राजपुत्र येतांच त्यास प्रेमानें भेट दिली. त्याची नजर त्याच्या डोळ्यांकडे गेली. तों त्याचे डोळे फुटलेले पाहून त्यानें राणी व मंत्रिवर्गास हा प्रकार काय म्हणून विचारलें ! याचे डोळे कां फोडण्यांत आले ? तेव्हां ते म्हणाले राजन् ! आपल्याच आज्ञापत्रावरून आम्हीं हें काम केलें. राजाला अत्यंत राग आला. त्याचे डोळे रागानें लालबुंद झाले. तो मोठ्यानें ओरडून दरडावणीच्या स्वरांत म्हणाला ! सांगा कोणत्या शाहाण्यानें हें पत्र तुम्हांस वाचून दाखविलें. त्यास माझ्यापुढें आणा. लेखक सभेंतच बसला होता. त्याचें नांव सांगतांच तो उठून उभा राहिला. त्याला पाहून राजाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राग पूर्वीपेक्षांहि अनिवार झाला. तो भुंवया चढवून म्हणाला, 'दुष्टा, पापिष्टा, दुराचाऱ्या ! मी पत्रांत डोळे फोडण्यास आज्ञा केली होती काय ? तुझेंच हें कारस्थान होय. तूं भलताच अर्थ सांगितला असला पाहिजेस ! माझें पत्रांत काय मजकूर होता ते सांग पाहूं ? लेखक उत्तरला राजन् आपलें पत्रांत " सिंहमध्यापयद्भुतम्. " असें वाक्य होतें. त्याचा अर्थ सिंहाला लौकर शिकवा असा होतो; पण मी नजर चुकीनें त्या ठिकाणीं असें वाचलें कीं, ' सिंहमंध्यापयद्भुतम् ' त्यामुळें सारा हा अनर्थ घडून आला. आपल्या पत्राचा लेखकानें मूर्ख-पणानें केलेल्या अर्थाच्या अनर्थानें राजालाच काय पण सर्वांनाच सखेदाश्चर्य वाटलें. सर्वांनाच त्याच्या मूर्खपणाचा राग आला. त्यांनीं लेखकाची उघड उघड निंदा करण्यास सुरूवात केली. नंतर त्याची गाढवांवर बसवून डोक्यास बेलांचीं पानें बांधून गांवांतून धिंड काढली व त्यास देशांतून हांकलून दिलें.

तात्पर्य— लेखकाची व्यंजन सोडल्यामुळें अशी फजिती झाली. तेव्हां इहपरसुखाची, मोक्षाची प्राप्ती करून देणाऱ्या भव्यकर्ण-रसायन अशा जैनागमाचा अभ्यास करीत असतां साधूंनीं व्यंजना-कडे लक्ष द्यावें. व्यंजनाकडे दुर्लक्ष्य झाल्यास मूर्खपणा पदरीं पडून संसारार्णवांत सदाचे भटकत फिरावें लागेल.

कथा २४ वी.

" अर्थ-हीन-कथा. "

विनितादेशांत अयोध्या नांवांची नगरी होती. तेथील राजा वसुपाल. त्याची भार्या प्रिया वसुमती. यांच्या पोटीं वसुमित्र नांवाचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुत्ररत्न जन्मलें. त्याच्या शिक्षणासाठीं गर्ग नांवांच्या उपाध्यायाची योजना केली होती. गर्ग अत्यंत विद्वान् ब्राह्मण होता.

त्याचवेळीं अवंतीदेशांतील उज्जयनीनगरींत वीरदत्त राजा आपल्या वीरदत्ता प्रियेसह राज्य करीत होता. वसुपालानें आपल्या पराक्रमाच्या जोरावर सर्व राजांना त्रस्त करून त्यानां आपलें मांडलिकत्व स्वीकारविलें होतें. वीरदत्त फक्त हा त्यांस जुमानीत नव्हता. एवढेंच नव्हें तर प्रत्यहीं त्याच्या आज्ञेचा भंग करून त्याचा अपमान करीत असे. वसुपालानें त्याचा बिमोड करण्याच्या हेतूनें त्याच्या नगरीस आपल्या चतुरंग सैन्यासह येऊन वेढा दिला. दोन्ही पक्षांची सैन्यें समोरासमोर तळ देऊन पडलीं. उभयपक्षांत युद्ध सुरूं झालें. वीरदत्ताचा पराक्रम पाहून वसुपाल आश्चर्यचकित झाला. आपण वेढा घातला आहे तेव्हां आज ना उद्यां हा आपलें आधिपत्य, सार्वभौमत्व स्वीकारील अशी त्यास फार आशा होती. पण या साऱ्या गोष्टीं घडून येण्यास बराच काल मोडेल तेव्हां आपण आपलें राजधानीस दूताकरवीं पत्र पाठवून मुलाच्या शिक्षणाची योग्य ती खबरदारी घेण्यास लिहावें म्हणजे मुलाचें शिक्षण उत्तम प्रकारें होईल असा विचार करून दुताकरवीं त्यानें एक पत्र धाडलें.

" स्वस्तीश्री महाशुभस्थानें उज्जयनीनगरीहून वसुपालराजाचा अयोध्यानगरींत बसणाऱ्या राणीवसुमती व मंत्रीवर्यांना कुशलपूर्वक आज्ञा कीं वसुमतींचें शिक्षण उत्तम व्हावें यासाठीं गर्ग उपाध्यायाची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवावी. त्यांचा मानमरातब योग्य ठेवावा. कोणत्याहि प्रकारची उणीव भासूं देऊं नये. त्यांना कुंदकळ्यासारख्या उत्तम तांदळाचा भात आणि तोहि गरम खाण्यास

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्यावा. त्यावर भरपूर तूप, वरण वाढावें. त्यांच्या भोजनाकडे बिलकुल दुर्लक्ष्य करूं नये. "

दूतानें तें पत्र वसुमती आणि मंत्रीमंडळाच्या स्वाधीन केलें. लेखकानें वाचून दाखविलें. परंतु गर्गगुरूजींना उत्तम प्रकारच्या तांदळाचा भात खाण्यास द्यावा त्यावर तूप वाढावें व वरणहि वाढावें असा पत्राचा भाव असतांनाहि त्यानें त्याचा भलताच अर्थ करून सांगितलें कीं गर्गाचार्यांना सुवर्णाच्या ताटांतून सुवर्णासनावर बसवून भात वाढावा. त्यावर तूप वाढावें. नंतर त्यानां काळी शाई पिण्यास द्यावी. याप्रमाणें सर्वांना आज्ञा देण्यांत आली. गर्गांना रोज उत्तम प्रकारचा भात खाऊन, वर शाई पाजूं लागले. त्यामुळें दिवसेंदिवस त्याचें शरीर कृष बनूं लागलें. पण त्यांनीं मुलाच्या शिक्षणाकडे मुळींच दुर्लक्ष्य केलें नाहीं. त्यांनीं त्याला सर्व विद्येंत पारंगत बनविलें.

वीरदत्ताला पराभूत करून वसुपाल राजा नगरीस परत आला. आपल्या मुलासमवेत सभेंत बसला असतां गर्गाचार्यांना त्यानीं बोलावणें पाठविलें. ते आल्यानंतर त्यांचा यथायोग्य सत्कार करून त्यानां म्हणाला गुरूजी ! आपण असें कृष कां दिसतां बरें ? आपली येथें उत्तम व्यवस्था आहे ना ? कां कांहीं कमतरता भासते ? गर्ग उत्तरलें ' राया ! तुझ्या कृपाप्रसादें करून सर्व कांहीं बरें आहे. मला रोज येथें उत्तम सुवर्णाच्या ताटांतून जेवणास मिळतें. दूध, दहीं, घेवर, पुऱ्या, सर्व कांहीं खाण्यास मिळते. पण राजा तुझ्या घरच्या विशिष्ट प्रघातामुळें मला रोज भोजनोत्तर काळी शाई पिण्यास मिळते व ती मला रोज प्यावी लागते; आणि हेंहि तुझे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पत्र आल्यापासूनच सुरूं झालें आहे. त्याचा परिणाम माझ्या शरीरावर झाला आहे. त्यामुळें क्षयरोग जडला आहे. आणि हेंच माझ्या दुर्बलतेचें कारण होय. गुरूजींच्या तोंडचें उद्गार ऐकून राजा तर स्तंभितच झाला. बहुतेक हा लेखकाचाच शहाणपणा असावा असें त्यानें ताडलें. त्याला त्याचा अति राग आला. त्याकडे वळून म्हणाला ' दुष्टा ! बे अकल्या, तूंच माझ्या पत्राचा असा अर्थ करून सांगितलास ना बोल ! नाहींतर तुझा शीरच्छेद करीन. लेखक नम्रपणें कांपत कांपत म्हणाला ' राजन् ! मीच आपलें पत्र वाचून दाखविलें आहे. आणि आपल्या पत्रांतील ' शालिभक्तं....' वगैरेचा अर्थ उत्तम भात केला असून ' घृत....' चा उत्तम तूप व मषीचा अर्थ काजळ केला आहे आणि याच अर्थानुरोधानें मीं अर्थ सांगितला. मी चुकीस पात्र आहे आपण जी शिक्षा द्याल ती भोगण्यास मी तयार आहे. " तेव्हां राजा म्हणाला ' लेखका ! तूं शालिभक्त वगैरेचा अर्थ बरोबर केलास ! पण मषी शब्दाचा अर्थ करतांना चुकलास, मषी शब्दाचें दोन अर्थ होतात. एक काजळ व दुसरा उत्तम निवडलेली डाळ. आणि याच अर्थानें मी तो शब्द येथें योजला होता. विपरितार्थामुळें तूं दोषी ठरलास. " नंतर राजानें त्यास गाढवावर बसवून त्याची धिंड नगरींतून काढून हद्दपार करण्याबद्दल फर्माविलें.

विपरीत अर्थामुळें लेखकाला ज्याप्रमाणें वसूराजानें स्वदेशांतून हद्दपार केलें तद्वतच जैनागमनाचे यथार्थ ज्ञान करून न घेतां त्याचा भलताच अर्थ ग्रहण करून घेणाऱ्या मुनिवर्यांना संसारसागरांतच भटकावें लागतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi